२८३६
015942

# विद्यार्थ्यांचें नोटबुक

अथवा

## मराठी पहिले पुस्तकावर नोट.

त्र्यंबक नारायण लेले.

किंमत ४ आणे.

# विद्यार्थ्यांचें नोटबुक

अथवा

## मराठी पहिले पुस्तकावर नोट.

लेखक व प्रकाशक

त्र्यंबक नारायण लेले.

लश्कर ग्वाल्हेर.

( सर्व हक्क राखून ठेविले आहेत. )

सन १९११ इसवी.

किंमत ४ आणे.

हें पुस्तक त्र्यंबक नारायण लेले यांनीं पुणें येथें
त्र्यंबक हरी आवटे यांच्या "इंदिरा"
छापखान्यांत छापवून लश्कर ग्वाल्हेर येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

मुलांना शिकविण्याची देखील एक कला आहे. ही फार थोड्या लोकांना साधते. वाचन शिकविण्याचा साधारण प्रकार म्हणजे मुलांकडून धडा दोन चार वेळां वाचून घ्यावयाचा आणि दहा पांच शब्दांला प्रतिशब्द सांगावयाचे किंवा गद्यपद्यार्थ बोधांतून पाठ करावयाचे, असा आहे मुलाला शुद्ध आणि पद्धतशीर वाचन शिकवणें आणि कठीण शब्दांचे अर्थ सांगणें अवश्यक आहे, तथापि पुस्तक वाचनाचा वाचन हा कांहीं मुख्य हेतु नव्हे. शिक्षकानें धड्यांतील प्रतिपाद्य विषय, त्यापासून आपण बोध घ्यावयाचा तो, त्याची भाषापद्धति हीं सर्वां समजावून देऊन विषयाच्या अनुरोधानें अवांतर गोष्टीही सांगितल्या पाहिजेत. त्यापासून ज्ञानप्राप्तिबरोबरच मुलांची करमणूक होईल, त्यांचा बहुश्रुतपणा वाढेल, त्यांना जिज्ञासा उत्पन्न होईल, आणि त्यांचें मन विकास पावेल. पण अनुभव ह्याविरुद्ध आहे. मुलांचें शिक्षण असें होत नाहीं, ह्याचीं कारणें दोन असूं शकतात. शिक्षकांचा असा समज असतो कीं, लहान मुलांना समजण्याची शक्ति कमी असते; आणि दुसरें, शिक्षकाला मुलांस काय शिकवावें, त्याची माहिती नसते. मला वाटतें कीं, पहिलें कारण सर्वांशीं योग्य नाहीं. मुलांची समजण्याची शक्ति जरी बाळपणीं फार नसते तरी त्यांची जिज्ञासा फार प्रबल असते; म्हणून सोप्या भाषेनें आणि त्यांना कंटाळवाणें न होईल अशा रीतीनें त्यांना एकादा विषय समजावून दिला तर तो त्यांना समजल्याशिवाय कधीं रहावयाचा नाहीं. दुसरें कारण शिक्षकाला स्फूर्ति न होण्याचें, हें मात्र बरेंच बलवान् असलें पाहिजे; कारण, लहान मुलांना शिकवणारे शिक्षकही बहुधा अल्पवयी, अनुभव नसलेले, आणि परिमित शिक्षण मिळालेले असतात. त्यांना स्वतःच विविध विषयांचें ज्ञान असण्याचा संभव कमी आणि ज्यांना कांहीं थोडेंबहुत ज्ञान असतें त्यांना तें वेळेवर आठवून योग्य रीतीनें उपयोगांत आणावयाचें माहित नसतें. ह्याचा परिणाम असा

होतो कीं, मुलें चवथ्या इयत्तेंत जातपर्यंत बहुधा नुसतीं पोपटपंची करीत असतात. ही उणीव लक्ष्यांत घेऊन हे नोट अगर टिपा लिहिण्याचा मीं प्रयत्न केला आहे. ह्याला विद्यार्थ्यांचें नोटबुक म्हणण्यापेक्षां शिक्षकांचें नोटबुक हें नांव विशेष शोभण्यासारखें आहे. कारण तें शिक्षकांकरितांच आहे. तें पहिलें पुस्तक शिकणाऱ्या मुलाला वाचतां येणार नाहीं तथापि तें त्याला नुसतें ऐकूनही समजण्याला अडचण पडूं नये अशी त्याची रचना केली आहे. पहिली इयत्ता पूर्ण करण्याला तीन नाहींतर निदान दोन आवृत्त्या तरी पुस्तकाच्या कराव्या लागतात. तरी हे नोट सगळे दोन आवृत्त्यांत मिळूनही मुलांस शिकविण्यास हरकत नाहीं. शिवाय हे नोट म्हणजे एकप्रकारची सूचि आहे; त्यांवरून मुलाची ग्रहणशक्ति असेल त्या मानानें शिक्षकाला त्यांचा विस्तार किंवा संक्षेप करून ते समजावितां येतील. तिसऱ्या इयत्तेंत गेलेल्या मुलाला स्वतःही हें पुस्तक वाचून चांगलें समजेल, आणि तो ह्या श्रेणींत पोंहचला असतांही त्यास ह्या पुस्तकाचें वाचन पुष्कळ बोधपर, ज्ञानप्रद व मनोरंजन करणारें असें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. ह्याशिवाय ज्यांची मराठी भाषा नव्हे आणि मराठी भाषा बोलणारे लोकांचे आचार-विचारांशींही ज्यांचा चांगलासा परिचय नाहीं अशा लोकांना क्रमिक पहिलें पुस्तक नुसतें वाचून त्यांतलें स्वारस्य कळणार नाहीं. "सोनें लुटुनी सायंकाळीं" किंवा "दारीं, हरिखें ओवाळी" ह्यांपैकीं सोनें लुटणें आणि ओवाळणें ह्यांतील व इतर अशा अनेक गोष्टी ज्या ह्या पुस्तकांत आल्या आहेत त्यांतील इंगित समजण्याला ह्या नोटबुकाचें उत्कृष्ट साहाय्य होईल असेंही वाटतें. जर हें माझें अनुमान ईशकृपेनें खरें ठरेल तर पुढील पुस्तकांवरही त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें उत्तरोत्तर उपयुक्त व भारदस्त नोट लिहिण्यास मला उत्तेजन येणार आहे.

मु० सिपरी
१ जुलई १९१० } त्र्यंबक नारायण लेले.

# धड्यांची अनुक्रमणिका.


| धडा. | नांव. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | दसरा .... .... .... .... .... | १ |
| २ | वार .... .... .... .... .... | ९ |
| ३ | शाळा .... .... .... .... .... | १० |
| ४ | उपदेश.... .... .... .... .... | १२ |
| ५ | पोशाक.... .... .... .... .... | १७ |
| ६ | स्वच्छपणा .... .... .... .... | १९ |
| ७ | वाढदिवस .... .... .... .... | २३ |
| ८ | आपले आप्त .... .... .... .... | २५ |
| ९ | आई (कविता) .... .... .... .... | २८ |
| १० | वडिलांचा मान .... .... .... .... | ३० |
| ११ | वनभोजन .... .... .... .... | ३६ |
| १२ | घोडा-घोडा .... .... .... .... | ४१ |
| १३ | थोर मनाची मुलगी .... .... .... | ४५ |
| १४ | भाकरीचा खेळ.... .... .... .... | ४७ |
| १५ | प्राण्यांवर दया करा .... .... .... | ४९ |
| १६ | लपंडाव.... .... .... .... .... | ५२ |
| १७ | खरें बोलणें .... .... .... .... | ५२ |
| १८ | धनगराचा पोर .... .... .... .... | ५४ |
| १९ | रामदास स्वामी .... .... .... .... | ५५ |
| २० | दीनांची कींव करा .... .... .... | ५७ |
| २१ | देवाचा थोरपणा ( कविता ) .... .... | ५९ |
| २२ | सबक्तगीन .... .... .... .... | ६२ |
| २३ | छानदार घर .... .... .... .... | ६३ |
| २४ | साप आणि मुंग्या .... .... .... | ६४ |

२५ हावरा कुणबी .... .... .... .... ६७
२६ कावळ्याची युक्ति .... .... .... ६९
२७ शाळूचा हंगाम .... .... .... .... ७०
२८ शाळूचा हंगाम .... .... .... .... ७६
२९ भाताचा हंगाम .... .... .... .... ७७
३० चेंडू ( गाणें ) .... .... .... .... ७८
३१ सृष्टिज्ञान .... .... .... .... ७९
३२ पाऊस आणि पाणी .... .... .... ८१
३३ ढेंपूळ, दगड व रेती .... .... .... ८२
३४ चिकणमाती .... .... .... .... ८५
३५ धातु .... .... .... .... .... ८९
३६ चालू नाणीं .... .... .... .... ९८
३७ कुऱ्हाड आणि सुई .... .... .... १००
३८ बाग .... .... .... .... .... १०२
३९ रोपटें } .... .... .... .... १०४
४० वृक्ष
४१ वेल .... .... .... .... .... १०६
४२ आंबा .... .... .... .... .... १०७
४३ गाय आणि म्हैस .... .... .... १०९
४४ करडूं आणि कोकरूं .... .... .... १११
४५ दूध .... .... .... .... .... ११२
४६ कुत्रा .... .... .... .... .... ११३
४७ पांखरें .... .... .... .... ११६
४८ पोपट आणि कावळा .... .... .... ११८
४९ रंग .... .... .... .... .... ११९
५० पाळणा .... .... .... .... १२२

नारा...
२८७६५

# विद्यार्थ्यांचें नोटबुक.

## धडा १ ला.

### दसरा.

१ दसरा=दहावा दिवस. संस्कृत दशाहर. दसरे दोन प्रसिद्ध आहेत. एक ज्येष्ठांतील—ज्यास गंगा दशाहरा म्हणतात. दुसरा आश्विनांतील. ह्या धड्यांत दुसऱ्या दशाहराचें वर्णन आहे. दसरा हा हिंदूंचा एक सण आहे. विशेषेंकरून ब्राह्मणांचा, क्षत्रियांचा आणि क्षत्रियविहित कामें करणारांचा हा सण आहे. ब्राह्मणांचा ह्यामुळें कीं, ते नवरात्रांत व्रतस्थ राहतात. दशमीला नवरात्राची समाप्ति होऊन ब्राह्मणभोजनादिक होतें. क्षत्रियांचा आणि क्षत्रियविहित कामें करणारांचा ह्यामुळें कीं, दसरा हा विजयदिवस मानिला आहे. राजा रामचंद्र रावणाशीं युद्ध करण्याकरितां ह्याच दिवशीं किष्किंधेहून निघाला होता. तसेंच राजे लोक विजयाकरितां ह्याच दिवशीं प्रस्थान करीत असत. मराठी राज्यांत पेशवाईच्या शेवटापर्यंत ह्या दिवशीं फौज स्वारीवर निघत असे; म्हणून ह्या दशमीला विजयादशमी असेंही नांव पडलें आहे. साधारणपणेंही पावसाळा संपल्यावर उद्योगासाठीं बाहेरगांवीं निघण्याला हाच दिवस चांगला

समजला जाई. ह्या दिवशीं सीमोल्लंघन करावें, म्हणजे गांवची शींव तरी ओलांडून बाहेर जावें असा आचार आहे. आपण तिसरे प्रहरीं शिलंगणाला जातों तेंच हें सीमोल्लंघन.

क्षत्रिय आणि क्षत्रियविहित कामें करणारे लोक अद्यापही त्या दिवशीं आपलीं हत्यारें ( आयुधें ), घोडे, हत्ती, नगारे, डंका, निशाण ह्यांना सज्ज करून भूषवून पूजितात. तसेंच ते आपल्या दप्तराची जा करितात. महत्त्वाचीं आज्ञापत्रें, दानपत्रें, बाक्षिसपत्रें इ० वर सह्या करितात. सरदारांना, अधिकाऱ्यांना वगैरे कामें व वस्त्रें ह्या दिवशीं देतात, आणि तिसरे प्रहरीं लवाजम्यानिशीं स्वारी काढून सीमेबाहेर शमीपूजन करितात.

२ नवरात्र = नऊ दिवस. रात्रीं नवरात्रांत होमहवन इ. सर्व कार्यें रात्रीं होतात म्हणून त्यास नवरात्र म्हणतात. जेव्हां अशीं कामें दिवसा होतात, तेव्हां संख्येपुढें दिवस-वाचक शब्द घालितात. जसें सप्ताह, नवाह इ०. नवरात्रें दोन प्रसिद्ध आहेत. एक चैत्री, ह्यांत कालीची आराधना करितात. दुसरें हें आश्विनांतील, ह्यांत दुर्गेची आराधना करितात.

वर्षारंभ सांप्रत जसा चैत्रापासून धरितात तसा प्राचीन एका काळीं आश्विनापासून धरीत असत. वसंत आणि शरदृतूंच्या आरंभीं हवा पालटते. तेव्हां रोगांचा उद्भव होतो, त्यांची शांति व्हावी हाही उद्देश ह्या नवरात्रां-तील आराधनेचा असतो.

वर चैत्र, ज्येष्ठ, आश्विन अशीं नांवें आलीं आहेत तीं महिन्यांचीं आहेत. असे १२ महिने मिळून एक वर्ष होतें. १२ महिन्यांचीं नांवें–चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन.

पक्ष—दोन पक्ष मिळून एक महिना आणि पंधरा दिवसांचा एक पक्ष होतो. ज्यांत चंद्रमा रोज सायंकाळीं दिसतो आणि रोज रोज वाढत जातो त्यास शुक्ल पक्ष आणि ज्यांत चंद्रमा सायंकाळीं रोज उशीरां उगवतो आणि लहान लहान होत जातो तो कृष्णपक्ष. पंधरा दिवस चंद्रमा वाढत वाढत पौर्णिमेला पुरा झाल्यासारखा दिसतो. पुढें पंधरा दिवस लहान लहान होत अमावास्येला अगदीं दिसे-नासा होतो.

तिथी—प्रत्येक पक्षाच्या पंधरा तिथी असतात. तीथ म्हणजे दिवस. ह्यांची गणती अशी करितात—प्रतिपदा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी, दशमी, एकादशी, द्वादशी, त्रयोदशी, चतुर्दशी, शुक्लपक्षांतील पंधरावा दिवस ती पौर्णिमा आणि कृष्ण-पक्षांतील पंधरावा दिवस ती अमावास्या.

३ सण—आनंदाचा दिवस. निरनिराळया जातींचे निरनिराळे सणाचे दिवस असतात. जसें ब्राह्मणांची श्रावणी, क्षत्रियांचा दसरा, वैश्यांची दिवाळी, आणि शूद्रां-चा शिमगा. कांहीं सण सार्वजनिक असतात आणि कांहीं कौटुंबिक असतात. सार्वजनिक सण—होळी, दसरा,

राखी इ०. कौटुंबिक सण—वर्षगांठ(वाढदिवस), गणपति-उत्सव, पोळ्याची अमावास्या इ०.

हिंदुलोकांत बहुधा प्रत्येक महिन्यांत एकादा सण असतो.

१ चैत्र—गुढी पाडवा.
२ वैशाख—अक्षय्य तृतीया.
३ ज्येष्ठ—गंगा दशाहारा.
४ आषाढ—एकादशीचें पारणें, गुरुपौर्णिमा.
५ श्रावण—श्रावणी, राखी, नारळी पौर्णिमा.
६ भाद्रपद—गणेश चतुर्थी.
७ आश्विन—दसरा, दिवाळी.
८ कार्तिक—त्रिपुरी पौर्णिमा.
९ मार्गशीर्ष—चंपा षष्ठी.
१० पौष—संक्रांत.
११ माघ—वसंतपंचमी.
१२ फाल्गुन—होळी.

सणाच्या दिवशीं देवाच्या पायां पडावें, वडिलांच्या पायां पडावें, सुग्रास अन्न खावें, नवीन वस्त्र घ्यावें, गरिबाला कांहीं दानधर्म करावा, आपल्या इष्ट मंडळीला जेवायाला बोलवावें, व एकंदरींत दिवस आनंदांत घालवाव .

४ उजाडला = उदयास आला. पहांटेस दिसूं लागलें म्हणजे आपण उजाडलें म्हणतों.

५ दुपार = दोनप्रहर. दिवसाचे साधारण ३ भाग केले आहेत.

१ सकाळ—सूर्य उगवतो तो काळ.

२ दुपार—दोनप्रहर—सूर्य मध्य आकाशांत येतो तो काळ.

३ संध्याकाळ—सूर्य मावळतो तो काळ.

६ विजार = हा मूळ फारसी भाषेंतला शब्द ' इजार ' असा आहे.

७ गजनी = काबुलांतील एका शहराचें नांव. तेथें एक प्रकारचें रेशमी कापड तयार होतें. त्या कापडालाही ' गजनी ' म्हणण्याचा परिपाठ पडला आहे. असे आणखी-ही शब्द प्रचारांत आहेत. जसें सुरती — म्हणजे सुरतेस प्रथम इंग्रजी कंपनीनें पाडलेला आणि अद्याप चालत असलेला रुपया. कृष्णंभट्टी—म्हणजे तपकीर. पेड्रो म्हणजे चिरूट, पैठणी म्हणजे बायकांची नेसावयाची रेशमी जरीकाठी साडी.

८ विजार चढवणें, बूट चढवणें हे प्रयोग भाषेंत नवीन आहेत. जुनी चाल विजार घालणें, बूट घालणें, असें म्हणण्याची आहे.

९ शिंगी=घोड्याचे अगदीं लहान बच्चाला शिंगरूं म्हणतात. त्यांतील मादी ती शिंगी आणि नर तो शिंगा. घोड्याप्रमाणें आणखीही कांहीं जनावरांच्या बच्चांला विशेष नांवें आहेत. जसें— कुत्रीं-मांजरांचीं पिलें, गाईचें वांसरूं, म्हशीचें पारडूं, हरणीचें पाडस, शेळीचें करडूं इ०.

१० सजविली = भूषविली. खोगीर, पट्टा, लगाम इ० तर घोड्याच्या स्वारीला आवश्यकच आहेत. त्याशिवाय शोभेसाठीं घोड्याच्या गळ्यांत माळ, गंडा, किंवा गोंडा,

डोक्याला तुरा, तोंडाला मोहरा, पुठ्ठ्यावर गोंडे वगैरे घालीत असतात.

११ देशमुख—देशाचा मुखिया, स्वामी. मराठी राज्यांत देशमुख, देशपांडे, डबीर, पारनीस, फडनीस, बक्षी, इ० हुद्दे चालू झाले होते. त्यांकरितां नेमणुका होत्या, आणि कांहीं अधिकारही नेमून दिलेले असत. आतां त्यांतलें कांहीं राहिलें नाहीं; तरी तीं नांवें वंशपरंपरा आडनांवांसारखीं त्यांच्या वंशजांकडे चालू आहेत.

शिलंगणाला निघण्याचे वेळीं मंडळी कोणा एकाद्याच्या घरीं जमून तेथून मग जमावानें निघण्याची चाल आहे. देशी राजधानींत राजाच्या स्वारीबरोबर गांवकरीही जातात.

१२ वाजंत्री--बाजेकरी, बाजेवाले. उत्तरहिंदुस्तानांत तासेमरफे आणि दक्षिणेंत सनई वाजविण्याची चाल आहे. तरी आतां इंग्रजी बाजे सर्वत्र झाले आहेत आणि त्यांनीं जुन्या वाजंत्र्यांना मागें टाकिलें आहे. तासे कांहीं ठरींव पद्धतीप्रमाणें वाजवितात; त्यांस तालसूर कांहीं नसतो. ते वाजविणारे बहुधा मुसलमान जातीचे असतात, त्यांस तासेवाले म्हणतात.

१३ सोनें लुटणें—दसऱ्याला शिलंगण करून जावें आणि शमीच्या झाडाचें दर्शनपूजन करून कांहीं पानें लुबाडून आणावीं यास सोनें लुटणें म्हणतात. सोनें लुटून श्रीभगवतीचें दर्शन करावें. मग घरीं आल्यावर आपल्या घरच्या देवाला तें सोनें वहावें, व वडिलांना द्यावें; मग बहीण

किंवा घरांतील दुसऱ्या कोणी सुवासिनीकडून ओंवाळून घ्यावें आणि तिलाही तें आणिलेलें सोनें द्यावें.

कोणी सोनें म्हणून शमीच्या ऐवजीं आपट्याच्या झाडाचीं पानें देतात. कोणी जोंधळ्याच्या ताटाचीं पानें आणि कोणी नवरात्रांत देवीसमोर पेरलेलीं धान्यें उगवतात तींच उपटून सोन्या बरोबर देतात.

हें सोनें आपल्याहून मोठ्याला, लहानाला, आणि आपल्या इष्टमित्रांलाही द्यावें. आपल्या घरीं जे लोक सोनें द्यावयास येतील त्यांचें आगतस्वागत करावें आणि त्यांस अत्तर पानसुपारी द्यावी.

हें सोन्याचें देणें-घेणें बायकांत परस्पर होत नाहीं. पुरुषांनीं त्यांना द्यावें; पण त्यांनीं उलटून दुसऱ्यास देण्याची चाल नाहीं.

१४ पोषाक--पायांतील जोड्यापासून तों डोकीचे पागोट्यापर्यंतच्या वस्त्रांदिकांला पोषाक म्हणतात. हा मुळचा फार्सी शब्द पोषाक असा आहे. आपल्या भाषेंत वस्त्रें, कपडे हे शब्द अधिक रूढ आहे.

१५ काशी--हें वस्तुतः एका गांवाचें नांव आहे. माणसांचींही कांहीं नांवें गांवांवरून पडतात. जसें-गया, द्वारका, मथुरा इ. कांहीं नद्यांवरून पडतात. जसें—गंगा, यमुना, कावेरी इ०. कांहीं नांवें पक्ष्यांवरूनही पडलीं आहेत. जसें—मोरू, राघू, चिमणी, बगी, बग्या इ०.

१६ हरिखें—हर्षानें.

१७ ओंवाळणें—नीरांजन करणें. हें आयुष्यवर्धक असतें. हें मुलांना, पुरुषांना, बायकांना, सगळ्यांनाच केलें

जातें. ओंवाळावयाचें साहित्य. तबक किंवा ताम्हन, त्यांत एक निरांजन तेलवात लावलेलें, अक्षता, कुंकू, सुपाऱ्या, विड्याचीं पानें हें आहे. हे सर्व पदार्थ मंगलकारक आहेत. ओंवाळणें झालें म्हणजे ओंवाळणारीला कांहीं तरी पारितोषिक द्यावें. ओंवाळण्याचे कांहीं मान असतात. जसें— बहिणीनें भावास ओंवाळण्याचा, बायकोनें नवऱ्यास, आईनें मुलास इ०. ओंवाळण्याचे कांहीं प्रसंगही ठराविक आहेत. जसें--राखी, भाऊबीज, दिवाळी, पुण्याहवाचन, लग्न, मुंज इ०.

उतारा, निछावर किंवा सतका हा सुद्धां ओंवाळण्याचाच एक प्रकार आहे. पण त्याचे प्रसंग निराळे आणि वस्तूही प्रसंगविशेषें निराळ्या असतात. प्रसंग, जसें—विजय करून आला असतां, दुखण्यांतून उठला असतां,अरिष्टप्रसंग टळला असतां दृष्ट लागली असतां वगैरे. उताऱ्याचे जिन्नस—नाणें (मोहरा पुतळ्या वगैरे), भाकरी, तेल, उडीद, लिंबलोण मोहऱ्या, मिर्च्या, दहींभात इ०. रजवाड्यांत तर नुसतीं दोन्ही हातांचीं बोटेंच उतारून कपाळमुळांशीं मोडतात.

काशी बहिणीनें मोरू घरांत येण्यापूर्वी जें त्यास दारांतच ओंवाळिलें तें निरांजन केलें नाहीं तर वर लिहिल्याप्रमाणें कांहीं उतरून टाकिलें असलें पाहिजे.

१८ साकी—हें एका छंदाचें नांव आहे. छंद म्हणजे कवितेची चाल. छंदांचीं लक्षणें वृत्तदर्पण पुस्तकांत दिलीं आहेत.

---

## धडा २ रा.

### वार.

१९ वार=दिवस. दिवस जसे तिथींनीं मोजतात तसेच वारांनींही मोजतात. तिथीला आरंभ पाडव्यापासून होतो. वाराला रविवारपासून होतो. रवि, सोम, मंगळ, बुध, बृहस्पति, शुक्र, आणि शनि हीं नांवें ग्रहांचीं आहेत. सात ग्रह फार जुन्या काळापासून लोकांना माहीत आहेत; म्हणून सगळ्या जगांत ह्याच क्रमानें आणि नांवांनीं वार मोजण्याची चाल दिसून येते. भारतवर्षांत राहू आणि केतू ह्यांची आणखी ग्रहांत गणना झाली. तसें युरोपांत यूरेनस आणि नेपचून असे दोन ग्रह आणखी अंतरिक्षांत असल्याचें आढळून आलें. पण त्यांच्या किंवा ह्यांच्या नांवांवरून वारांत कांहीं भर पडली नाहीं. कदाचित् आणखीही ग्रह पुढें आढळून येतील.

दिवस नेमका सांगण्याची अगदीं सोपी युक्ति म्हणजे आज, उद्यां, काल, परवां, तेरवां इ० मोजून सागण; ह्या पुढील प्रकार वारांनीं मोजण्याचा, जसें, रविवारीं, सोमवारीं, इ०; पण वारांची एक आवृत्ति होऊन गेलेली असली तर मग तिथींनीं किंवा तारखांनीं मोजून सांगतात. जसें—अष्टमीला, चतुर्थीला, किंवा २० वीला, २५ वीला इ०.

२० सुट्टी=मोकळीक, सोडवणूक. इंग्रजी पद्धतीच्या शाळांस रविवारीं सुट्टी असते. रविवार इंग्रज लोक ईश्वराच्या उपासनेंत घालवितात. त्या दिवशीं ते व्यावहारिक कामें करित नाहींत. वेदशास्त्रांच्या शाळांस पाडव्याला सुट्टी असते. ते दिवशीं अभ्यास केला असतां शिकलेली विद्या कमी होते

असें म्हणतात. वाल्मीकिऋषींनें रामायणांत मारुतीनें लंकेंत सीतेस पाहिलें तेंव्हांचें वर्णन केलें आहे कीं, ती त्याला पाडव्याला विद्याभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याच्या विद्येप्रमाणें रोडावलेली दिसली. लहान गांवांतील शाळांत बहुतकरून हाटाचे दिवशीं सुट्टी देत असत. पण अलीकडे रविवारच सुट्टीचा दिवस नियमित झाला आहे.

२१ बाजार—हाट आणि बाजार हे शब्द एकाच अर्थाचे वाचक आहेत. तथापि हाट आठवड्यांतून एक दे दिवशीं जो बाजार भरतो त्यास म्हणतात. खेड्यांतून दर दहा पांच गांवांतून एकाद्या गांवीं असा हाट भरत असतो. त्यांत शेतकऱ्यांन लागणाऱ्या जिनसा विकावयास येतात; आणि शेतकरीही निर्वाहाचे जिन्नस, भाजीपाले, तूप इत्यादि ह्या बाजारांत विकून पैसे करितात.

२२ फुटाणे-भाजलेले चणे. शुक्रवार हा देवीचा, बालाजीचा आणि भैरवाचाही समजतात. ह्या वारीं ह्या देवांचे भक्त फुटाण्याचा नैवेद्य आपल्या देवास दाखवून ते लोकांना वांटीत असतात. कोणी ह्यांबरोबर गूळ किंवा बत्तासेही देतात. शुक्रवारीं फुटाणे खाणें लक्ष्मीकारक समजलें जातें.

---

## धडा ३ रा.

### शाळा.

२३ शाळा—हा शब्द पाठशाळा असा आहे. पाठ म्हणजे धडा आणि शाळा म्हणजे घर. पाठशाळा म्हणजे

धडा देण्या—घेण्याचें घर. शाळा शब्द जोडलेले आणखीही कितीएक शब्द आहेत. जसें—धर्मशाळा, रथशाळा, अश्व-शाळा, गोशाळा, यज्ञशाळा इ०.

अगदीं खेड्याच्या गांवठी पाठशाळेंत गुरुजी आणि विद्यार्थी तरटावर किंवा बसकरावर बसून शिकवितात, पण शहर गांवच्या व सरकारी शाळांतून बरेंच सामान असतें. जसें, मुलांस बसावयास लाकडी बांक, गुरुजीला खुर्ची, टेबल, गणित समजावून द्यावयाला एक मोठा लाकडी फळा, भूगोलाचे व देशाचे नकाशे, आणि आकृति दाखविणारे तक्ते, चेंडू इ०. त्याशिवाय थोर पुरुषांच्या तसबिरा टांगलेल्या असतात; आणि खेळायाचें सामान मलखांब, जोड्या इत्यादिही असतें. क्वचित् बाग किंवा फुलांच्या कुंड्या लावितात; आणि कोठें वाचण्यासाठीं पुस्तकें वर्तमानपत्रेंही ठेविलेलीं असतात. क्वचित् जागीं कांहीं धड्यांतील वस्तु किंवा प्रयोग प्रत्यक्ष दाखवून समजावून देण्याकरितां त्या त्या वस्तुही ठेविलेल्या असतात. कोठें कोठें शाळेजवळ मुलांस रहाण्यास घरें बांधितात, त्यांस बोर्डिंग हौस म्हणतात.

जुन्या काळीं मुलें गुरुजींच्या घरींच जाऊन रहात, आणि भिक्षा मागून निर्वाह करून विद्या शिकत; आणि शिकणें झालें म्हणजे गुरूला दक्षिणा देऊन त्यांचे आज्ञेनें घरीं जात.

भागवतांत कथा आहे कीं, श्रीकृष्ण सांदीपनी गुरूच्या घरीं उज्जनीस जाऊन विद्याभ्यासासाठीं राहिले होते; आणि रामानें विश्वामित्राबरोबर कितीएक दिवस वनांत राहून त्यापासून शस्त्रविद्या संपादन केली.

आतां सरकारानें शाळा स्थापिल्या आहेत. त्यांत सरकार आपल्याकडून वेतन देऊन गुरुजी चाकरीस ठेवितें आणि मुलांकडून महिन्याचे महिन्यास कांहीं रकम फी म्हणून घेत असतें. त्याशिवाय आणखी कितीएक लोक द्रव्यसाहाय्य देतात. ही सगळी रक्कम विद्याखात्याकडे खर्च पडते.

सरकारच्या नियमांस अनुसरून लोकांनींही अशा खाजगी शाळा काढिल्या आहेत. कधीं कधीं सरकार अशा खाजगी शाळेला मदत करितें.

---

## धडा ४ था.

### उपदेश.

( १ )

सकाळींच सूर्योदयापूर्वीं उठावें. सूर्य उगवतांना किंवा मावळतांना पडून राहूं नये.

२४ देव--प्रकाशणारा. सकाळींच उठून सूर्यास नमस्कार करावा, भूपाळ्या म्हणाव्या, देवाचीं गाणीं म्हणावीं, स्तोत्रें म्हणावीं; हें सगळें हळूहळू म्हणावें. फार मोठ्यानें म्हणूं नये.

२५ गुरु—आई, बाप, जो विद्या शिकवितो आणि जो आपलें पोषण करितो तो, या सर्वांस नमस्कार करावा.

२६ जीवेंभावें- मनापासून.

२७ वडील--आपल्याहून मोठे. घरांतून बाहेर जातांना आपल्या आईला, बापाला, किंवा जें दुसरें कोणी घरांत वडील असेल त्याला विचारून जावें. नाहीं तर त्यांना का-

ळजी राहते; आणि आपली त्यांना गरज लागली तर त्यांनीं कोठें शोधावें? तसेंच आपण जातों तें चांगल्या कामाला कीं वाईट कामाला हें त्यांना समजलें तर तीं आपल्याला वाईट कामाला जाऊं द्यावयाचीं नाहींत.

२८ रस्त्यानें चालतांना मध्येंच तमाशा पहात उभें राहूं नये. तमाशाच्या जागीं हलकट रिकामे लोक जमलेले असतात. त्यांचेपासून आपल्यास त्रास होईल. चालतांना धावूं नये. इकडे तिकडे पहात जाऊं नये. आपल्या रस्त्याकडे नजर ठेवावी. मागून एकादें घोडें, गाडी येते कीं काय हें पहात असावें. आपला पाय कुत्र्यावर किंवा इतर जनावरांवर पडूं देऊं नये, नाहींतर तें चावेल. फत्तर, दगड, कांटा पडलेला पहावा, नाहींतर ठेंच लागेल, किंवा कांटा मोडेल. फारच हळू चालूं नये. चालतांना खात खात जाऊं नये. रहदारीच्या रस्त्यावर फार लांब बोलत बोलत चालूं नये.

२९ तमाशा=चमत्कार. रस्तोरस्तीं वानर, अस्वल किंवा बोकड यांचा खेळ दाखविणारे, गारुडी, कोल्हाटणी, बाजीगर इ० अनेक चमत्कार करून दाखवितात. ते क्षणिक—खोटे असतात म्हणून त्यांस तमाशा असें नांव आहे. ज्यांत कांहीं काम खरेंच होत असतें त्यास खेळ म्हणतात.

३० शाळेमध्यें नेमिल्या वेळीं जावें. नाहींतर पाठाला आरंभ होऊन जाईल, आणि आपला पाठ अंतरेल. आपल्याला रेलवेनें कोठें जावयाचें झालें तर आपण कसे नेमिलेल्या वेळीं जातों. कारण आपण जर वेळ चुकलों तर

गाडी निघून जाईल. गाडी देखील प्रत्येक स्टेशनला येण्याचा आपला वेळ चुकवीत नाहीं म्हणूनच आपल्यालाही नेमिल्या वेळीं जातां येतें. सूर्य रोज नेमक्या वेळीं उगवतो म्हणून त्याच्या उगवण्याचा आपल्याला विश्वास आहे. आपणही जर स्वतः नेमानें सर्व कामें केलीं तर आपल्याला वेळ पुष्कळ मिळून कामें वक्तशीर होतील; आणि लोक आपल्यावर विश्वास ठेवतील.

३१ पाठाकडे लक्ष्य देत जावें. पाठ घेतांना आपलें सगळें लक्ष्य त्याकडेच असावें. मास्तर काय सांगतात तें समजून घ्यावें. त्यांच्या सांगण्यांत कांहीं राहून गेलें किंवा आपल्याला कांहीं समजलें नाहीं तर मास्तरांचें पाठ सांगणें झाल्यावर विचारून समजून घ्यावें. जागेवर आल्यावर घेतलेल्या पाठाचें लागलींच मनन करावें. जर कांहीं विसरलें असेल तर आपल्या वर्गातील सोबत्यांस विचारावें.

( २ )

खोटें=लबाड, जें खरें नाहीं तें.

चोरी=दुसऱ्याची वस्तु नकळत घेणें किंवा जबरीनें घेणें.

शिवी=अपशब्द.

कल्याण=बरें, श्रेय.

३२ खोटें कधीं बोलूं नये. कधीं म्हणजे केव्हांही आणि कशाकरितांही खोटें बोलूं नये. आपण खोटें बोलतों असें लोकांना समजलें म्हणजे मग ते आपण खरें बोललों तरी आपणावर सहसा विश्वास ठेवीत नाहींत; आणि मग लो-

कांची खात्री कशी करावी याची आपल्याला मुष्किल पडते. मग आपण शपथ खाल्ली तरी लोक विश्वास ठेवीत नाहींत.

जें काम आपण करूं कीं नाहीं, किंवा आपल्याच्यानें होईल कीं नाहीं याची आपल्याला शंका आहे, तें आपण करूं किंवा आपल्याच्यानें होईल असा भरंवसा लोकांस देऊं नये. समजा कीं, एका मुलाला पेन्सिल पाहिजे, व तुम्हीं त्यास ती शाळेंत द्याल असें सांगितलें; पण शाळेंत गेल्यावर तुम्हांस ती त्यास देतां आली नाहीं, तर पहा कीं, त्याचा केवढा खोळंबा होईल ?

२३ चोरी करूं नये. आपल्या वडिलांनीं पैसे ठेविले असतील त्यांतून त्यांस न कळत पैसे काढून घेऊं नयेत. कामाला पाहिजे असले तरी त्यांस विचारून घ्यावे. कोणी जर कांहीं वस्तु बाजारांतून मागविली तर दिलेल्या पैशांत शिल्लक राहील ती लागलीच हिशेबासह परत द्यावी. घरांतून कांहीं वस्तु—गूळ, खोबरें किंवा आणखी कांहीं काढून आणण्यास सांगितलें तर मध्येंच आपण कांहीं काढून ठेवूं नये किंवा खाऊं नये. कोणाची वस्त लपवून ठेवूं नये. नाहीं तर आपल्यावर चोरीचा आळ येईल. कोणाच्या खिशांत हात घालूं नये. कोणाचें दप्तर त्याला नकळत पाहूं नये. कोणाचें पत्र त्याच्या परवानगीशिवाय वाचूं नये. कोणाच्या वहींतलें कांहीं टिपण किंवा मजकूर त्याच्या परवानगीशिवाय उतरून घेऊं नये आणि पाहूं नये. कोणाचें बोलणें आड लपून उभें राहून ऐकूं नये. दोघें एकांतांत बोलत असलीं, तर आपण जवळ उभें राहण्याचा

प्रयत्न करूं नये. दर वेळीं दुसऱ्याजवळ उसनें मागत जाऊं नये. आंतल्या माणसांस न कळवितां एकदम घरांत जाऊं नये. हे सगळे चोरीचे प्रकार आहेत. ते आपण करूं नयेत.

३४ शिवी देऊं नये. शिवी देणें हलकटपणाचें काम आहे. त्या देणाराची योग्यता त्यावरूनच दिसून येते. आपल्याहून धाकट्याला फार तर वेडा, मूर्ख म्हणावें; पण गाढव, लुच्चा, हरामखोर, पाजी, असे हलकट शब्द बोलूं नयेत.

३५ कोणाशीं भांडूं नये. कारण भांडणांत प्रथम तूं--मी होतें, मग शिव्या शाप होतात, मग मारामारी होते, शेवटीं नाश होतो. भांडणाचा प्रसंग आपण होऊन आणूं नये. तो टाळीत असावें. तें झालेंच तर त्याची मजल लांब जाऊं देऊं नये. दुसरा भांडूं लागला तर आपण आपलें त्यापासून रक्षण करावें. त्यांत कधीं चुकूं नये.

३६ पाहिलें तें मागूं नये, मिठाईवाला आला कीं मिठाई घेऊन द्या; कलिंगडीं आलीं कीं कलिंगड घेऊन द्या; आणि आंबेवाला आला कीं आंबे घेऊन द्या; असें करूं नये. कोणास पैसे मोजतांना पाहिलें कीं, पैसा द्या असें किंवा बाजारांत गेल्यावर 'हें घेऊन द्या' 'तें घेऊन द्या' असें करूं नये. आपल्याला काय पाहिजे तें आपल्या वडिलांना चांगलें समजतें. ते तें सर्व घेऊन देतील. आपणच एकट्यानें कांहीं खाऊं नये व लेऊं नये, आपल्या भावंडांसहित खावें-ल्यावें. सगळें मलाच असें करूं नये.

३७ गोड फार खाऊं नये. फार गोड खाल्ल्यानें जीभ चटोर होते, गोडाची गोडी नाहींशी होते, म्हणजे गोड कमी लागूं लागतें, पोट दुखतें, जंत होतात, चटोरपणा वाढतो, खर्च फार होतो. हें सर्व दारिद्र्याचें व दुःखाचें लक्षण आहे.

---

## धडा ५ वा.

### पोशाक.

३८ आपल्या मूळच्या पोशाकांत परदेशीय लोकांच्या संसर्गानें नेहमीं फेरबदल होत गेले आहेत. आपली जुनी बंडी, चारबंदी किंवा बाराबंदी आहे. हिला घेर देऊन आंगरखा झाला; आणि आंगरख्याला घेर देऊन झगा केला. मुसलमानी अमदानींत कुडता आला, आणि आतां त्या जागीं बनियानी व सदरे आले आहेत. पट्टु किंवा पंचा हें कंबरेला गुंडाळण्याचें जुनें वस्त्र. नंतर त्या जागीं लांब रुंद धोतरें झालीं. मुसलमानींत पायमोजे झाले. आतां पाटलोण किंवा तुमानी आणि इस्टाकिण्या आल्या. तसेंच जोड्यांत आणि शिरोवस्त्रांत फेरफार झाले आहेत.

आपल्या पोशाकांत दोन्ही गोष्टी असाव्या. उपयोगिता असावी आणि शोभाही असावी. नुसत्या उपयोगितेकडे पाहूनही भागणार नाहीं, आणि नुसत्या शोभेनेंही चालणार नाहीं. पोशाक आपल्या देशाच्या चालीप्रमाणें असावा. त्यांत कांहीं देशी आणि विदेशी अशी खिचडी तरी करूं नये. शाळांतून वगैरे जर कांहीं विशेष प्रकारचे वर्दीसारखे कपडे घालणें भाग असलें तरी एरव्हीं

दुसऱ्या वेळीं आणि विशेषेंकरून लग्न, मुंजी व अशाच कार्यप्रसंगाला देशी चालीचींच वस्त्रें वापरलीं पाहिजेत.

पोशाक आपल्या योग्यतेस आणि धंद्यास साजेलसा असावा. तो सैल अंगांत खेळता असावा. हिंवाळा उन्हाळा जसा काळ असेल त्याला उपयोगी असावा. ज्या मुलाला नीट काठीसुद्धां धरितां येत नाहीं, कीं सरळ उभें रहातां येत नाहीं, कीं ज्याच्या नाकाचा शेंबूड निघाला नाहीं त्याला एकाद्या गोऱ्या सोलजरासारखा पोशाक करणें वेडेपणाचें आहे, विटंबन आहे, त्याची कांहीं शोभा नाहीं. पोशाकांत सारखेपणा ही पाहिजे. नाहींतर बंडी खादीची, त्यावर उपरणें जरीकाठी, विजार गजनीची आणि जोडा फाटका दोन आण्यांचा. पोशाक नीटनेटका व बेताचा असावा. अस्ताव्यस्त, लोळत लांबत राहणारा किंवा आखूड असूं नये.

बाहेर जावयाचा पोशाक निराळा असावा. घरांत घालावयाचीं कापडें निराळीं असावीं. बिछान्यांतलीं कापडें निराळीं आणि कामाकाजांत राबायचीं कापडेंही निराळीं असावीं. स्नानसंध्येचीं, व जेवणाखाणाचीं वस्त्रें निराळीं असावीं.

३९ बूट चढविला म्हणजे पायांस ऊब राहते....आपल्या देशांत गुडघ्याखालीं फारसें वस्त्र वापरीत नाहींत. पुष्कळ लोक तर नेहमीं नागव्या पायांनींच राहतात. तथापि डोक्याला घातल्याशिवाय बहुधा कोणी राहत नाहींत. इंग्रजी वैद्यशास्त्राचें मत असें आहे कीं, डोकें थंड आणि पाय ऊबदार ठेवावे. इंग्रज लोक प्रखर हिमकालांत देखील

डोकें झांकीत नाहींत. पायांचें जतन जोडा आणि त्याशिवाय लोकरीचे किंवा कातड्याचे मोजे घालून करितात. केव्हां केव्हां तर ते गुडघ्यापर्यंत उंचीचा बूट घालतात. आपल लोक डोकें ऊबदार ठेवितात, तेवढें पायांचें जतन करीत नाहींत. जोडा घालावयाचा तो ऊन, कांटे, खडे लागूं नयेत म्हणून घालावयाचा, उबेकरितां नाहीं. तुम्हांला देशी जोडा असला आणि बूट नसला तर तुम्ही त्याकरितां हट्ट करूं नका; आणि बूट घातला तरी लोकांच्या बसावयाच्या जागेवरून किंवा पांघरुणावरून बूट घालून फिरूं नका.

---

## धडा ६ वा.

### स्वच्छपणा.

४० कपडे स्वच्छ ठेवावे, आंग स्वच्छ ठेवावें आणि जागा स्वच्छ ठेवावी. त्यानें सुख होतें, आरोग्य रहातें, मनाला हुषारी वाटते.

कपडे स्वच्छ ठेवावे. भुईवर मातींत लोळूं नये. मळकट रकटावर किंवा जेथें तेथें बसूं नये. रंगीत भिंतींना, खांबांना, दरवाजांना खेटून बसूं नये. त्यांवर आंग घासूं नये. एक फडकें नेहमीं खिशांत किंवा कंबरेला खोंचून ठेवावें. घाम, शेंबूड, आंगावर उडून आलेला केर त्या फडक्यानें पुसावा. आंगांत घातलेल्या कपड्यानें,बाहीनें किंवा हातानें पुसूं नये. शेंबूड बाहेर शिंकरावा, मग फडक्यानें नाक साफ करावें.

केसांना किंवा आंगाला तेल किंवा हळद फारशी लावूं नये. त्यानें कपडे फार मळतात.

आंगांत घालायचे कपडे जेथें तेथें भुईवर, जांत्यावर, आढ्यावर, दिव्याजवळ टाकून देऊं नयेत. ते नेहमीं नेमक्या खुंटीवरून ठेवावे. फाजील कापडांची खुंटीवर गर्दी होऊं देऊं नये. सर्वच कपडे एकेवेळीं मळवून ठेवूं नयेत. कपडे बदलायाचा एक दिवस नेमून टाकावा. मळके कपडे वेगळे ठेवून वेळच्या वेळीं धुण्यास देत जावे.

कपडे आंगांत घालतांना झटकून ब्रशानें पुसून घालावे. जोडा रोज पुशीत जावा, आणि केव्हां केव्हां त्यास तेल किंवा रोगणाचा हात द्यावा. एकादा कपडा किंवा जोडा फाटला तर तो लागलींच शिवून घ्यावा, नाहींतर दिवसेंदिवस तो जास्त फाटून लौकरच कामांतून जाईल.

रेशमाचीं किंवा जरीचीं बहुमोल वस्त्रें फारच जपून वापरावीं. त्यांस डाग पडूं देऊं नयेत. पण तीं खराब होतील ह्या भीतीनें अगदीं बांधूनच ठेवूं नयेत. कारण फार दिवस ठेवणीनेंही असे कपडे खराब होतात, व आंगास येत नाहींत आणि कसरही त्यांस खातं, अशीं वस्त्रें फार जुनीं झालीं व डागावलीं व स्वच्छ होण्यासारखीं नसलीं तर मग तीं मंडळींत वापरूंच नयेत.

आंग स्वच्छ ठेवावें. सकाळींच उठल्याबरोबर स्नान करण्याचा नेम ठेवावा. स्नानाला पाणी पुष्कळ मिळण्यासारखें असेल तर घ्यावें. कंटाळा करूं नये. आणि सर्दी

होण्याची भीतिही बाळगूं नये. स्नान करणें म्हणजे कांहीं आंग भिजणें नव्हे. पण विनाकारण घागरीच्या घागरीही ओतीत बसूं नये.

पाणी फार कढत घेऊं नये; व तें आंगावर कांटा येईल इतकें थंडही नसावें. सुखानें घेतां येईल इतकें कोंबट किंवा ऊन घ्यावें.

हात, पाय, तोंड घांसून धुवून स्वच्छ केल्यावर आंगावर पाणी घ्यावें. संधींचे भाग—मांड्यांच्या संधी, खाका, हाता-पायांच्या बोटांच्या संधी व कानानाकांचीं भोकें चोळून स्वच्छ करावीं. शेंडी मोकळी करावी. रोज डोक्यावरून स्नानाची संवय ठेवावी. पण डोक्यावर ऊन पाणी फार घेऊं नये. त्या-पासून डोक्याला आणि डोळ्यांलाही उष्णता पोंहचते. सुट्टीच्या दिवशीं किंवा एरव्हीं फुरसत होईल तेव्हां हात-पाय-तोंडाला साबू लावून चोळून धुवावे. कधीं कधीं व थंडीच्या दिवसांत दररोज डोक्याला, तोंडाला, आणि हातापायांलाही स्नानापूर्वी तेलाचा हात लावावा आणि केस विंचरून टाकीत जावे.

स्नान करावयाचें तें दुसऱ्या कोणाचें आणि विशेषें-करून आपल्या घराबाहेरच्याचें ओलेतें चिरगूट गुंडाळून करूं नये. उघड्यांत स्नान करूं नये, ओल्या आंगावर वारें येऊं देऊं नये, फार वेळ ओल्यांत राहूं नये. स्नान झाल्यावर आंग स्वच्छ पुसावें. रात्रीस पांघरलेल्या मळक्या धोत्रानें, ओल्या आंगावरच्याच धोतरानें किंवा कशाबशा फडक्यानें आंग पुसूं नये. आंग पुसण्यासाठीं

एक फडकें चांगल जाड आणि लांबरुंद वेगळेंच असूं द्यावें. हें रोज धुतलें जाण्याची तजवीज ठेवावी. ओलेतें वस्त्र भुई-वर मातींत पडून राहूं देऊं नये. लागलींच उचलून पिळा करून ठेवावें.

नाकांत, कानांत, तोंडांत उठतां बसतां बोटें घालूं नयेत. नाकाचीं मेकडें वरचेवर काढूं नयेत. दांतांनीं नखें कुरतडीत बसूं नये. गुह्य भागाकडे हात वरचेवर नेऊं नये. लिहितांना बोटांना शाई लागूं देऊं नये. माती उकरीत बसूं नये. पातळ पदार्थ खातां पितांना चमचा वापरला तर चांगलें.

४ ३ जागा स्वच्छ ठेवावी. शाई सांडून, किंवा पेन्सलीच्या, कोळशाच्या किंवा खडूच्या रेघा ओढून बसायाच्या जागेंतील भुई किंवा भिंती खराब करूं नयेत. कागदाचे तुकडे आणि बोरूचे तुकडे इकडे तिकडे पसरून ठेवूं नयेत. त्याकरितां एकादी परडी ठेवून त्यांत सगळें टाकीत जावें. वस्तु सगळ्या नीटनेटक्या जागच्या जागीं ठेवाव्या.

पुस्तकें अभ्यासाचीं व एरव्हीं वाचण्याचीं तसेंच चित्रांचीं पुस्तकें किंवा चित्रें निरनिराळीं ठेवावीं. पुस्त-कांना कागदी पुठ्ठे घालावे. त्यांचीं पानें चोळवटूं देऊं नयेत. त्यांवर आणि आंत उगीच जेथें तेथें आपलें नांव सही वगैरे करून ठेवूं नये. आरंभीं एखाद्या पानावर नांव लिहिणें पुरे.

आंगांत घालायाचीं नेसण्याचीं व पांघरण्याचीं कापडें खुंट्यांवरून काठ्यांवरून ठेवावीं. बिछाना घडवंचीवर ठेवावा.

गलिच्छ=घामट, मळकट, घाणेरडा.
स्वच्छ=निर्मळ.
आवडणें=रुचणें, बरें वाटणें.
सर्व=सगळे.

---

## धडा ७ वा.

## वाढ दिवस.

४४ वाढ दिवस=वाढण्याचा दिवस, जन्मगांठ, वर्षगांठ इ०. प्रतिवर्षीं जन्म दिवसाला उत्सव करण्याची चाल बहुतकरून सर्व जातींच्या लोकांत आहे. ह्या करण्यापासून आयुष्य-वृद्धि होते असें म्हणतात. ज्याचा वाढदिवस असतो त्याला त्याचे इष्टमित्र त्या दिवशीं मेवामिठाई किंवा कांहींतरी वस्तु देतात; आणि त्यांनेही त्यांस गौरवपूर्वक बोलावून भोजन द्यावें आणि गरिबांना कांहीं दानधर्म करावा अशी चाल आहे.

४५ आपण जयंतीचे उत्सव करितों तेसुद्धां जन्म दिवसाचेच उत्सव असतात. ह्या जयंत्या कांहीं देवांच्या असतात. आणि कांहीं संत महात्म्यांच्या असतात. जसें, रामनवमी, गोकुळाष्टमी, गंगा दशाहरा किंवा शंकराचार्य, शिवाजीमहाराज, महाराणी व्हिक्टोरिया यांचे जन्मगांठीचे दिवस.

४६ वाढदिवस खरोखर क्षय दिवस आहे. तो आपल्या आयुष्याचीं किती वर्षें झालीं ह्याची आठवण करीत असतो. म्हणून दर एक वाढ दिवसाला हें आपण

अवश्य पहात असावें कीं आपण आजपर्यंत काय केलें— शरीरबळानें, द्रव्यानें, ज्ञानानें, आणि कीर्तीनें किती वाढलों, किंवा क्षीण झालों आणि पुढील वर्षांत आपल्याला जें करावयाचें त्याचा संकल्प करीत जावा.

हात मारणें=ताव मारणें=यथेच्छ-पुष्कळ घेणें.

सोंगट्या=नरदा, चौपट, चोसर.

मौज=गंमत, बहार.

झोंपाळा=झूला.

४७ खीर=दूध आटवून करितात. त्यांत शेरीं ५ तोळे तांदूळ आणि १० तोळे साखर घालतात. त्याशिवाय बेदणा, बदाम व पिस्ते यांचे तुकडे करून ते आणि एलचीही घालतात.

४८ करंज्या=मैद्याच्या करितात, किंवा खोबऱ्याच्या करितात. आंत खसखस, खोबरें, साखर—किंवा खडीसाखर आणि बदाम, पिस्ते यांचें सारण घालतात. उज्जनीस ज्या खोबऱ्याच्या करंज्या करितात त्यांच्यावर साखरेच्या पाकाचें आच्छादन असतें. आंत खोवा व इतर मसाला भरतात.

४९ खूप=हा मूळचा फार्सी शब्द ‘ खूब ’ असा आहे. खूब म्ह० पुरतेपणीं, यथायोग्य त्याचा केव्हां “उत्तम” “ फार चांगलें ” असाही अर्थ होतो. खूप ह्याचें आणखी विकृत रूप ‘ खप ’ असें होतें आणि त्यापुढें सूरत शब्द जोडून ‘ खपसूरत ’ शब्द करितात.

५० जुबिली—आपले देशांत प्रतिवर्षीं जन्मदिवशीं कोणाचा उत्सव करण्याची चाल आहे तशी मुदतीनें करण्याची नाहीं. युरोपांत असे उत्सव करितात त्यांस जुबिली म्हणतात. महाराणी व्हिक्टोरिया यांना गादीवर बसून ५० वर्षें झाल्याची जुबिली प्रथम हिंदुस्तानांत झाली. अर्थात् ती फार थाटाची झाली. २५, ४०, ५०, किंवा १०० वर्षांच्या मुदतीनें अशा जुबिल्या माणसाच्या किंवा एकाद्या प्रसंगाच्याही संस्मरणाकरितां होत असतात, आणि त्यांचीं नांवेंही निरनिराळीं आहेत. जसें—सिल्व्हर जुबिली, डायमंड जुबिली इ०.

---

## धडा ८ वा.

## आपले आप्त.

५१ (१) बापाच्या भावाला काका किंवा चुलता म्हणतात. चुलत्याची बायको ती चुलती, काकी किंवा काकू आणि त्यांचीं मुलें चुलत भावंडें.

बापाच्या बहिणीला आत म्हणतात. आतेचीं मुलें तीं आत-भावंडें (आतेच्या नवऱ्याला कांहीं ठरींव नांव नाहीं.)

बापाचा बाप तो आजा आणि त्याची बायको ती आजी.

बापाच्या बापाचा बाप तो पणजा, त्याची बायको पणजी.

(२) आईचा भाऊ तो मामा, त्याची बायको मामी, आणि त्याचीं मुलें मामे-भावंडें.

आईची बहीण ती मावशी आणि तिचीं मुलें तीं मा-

वस-भावंडें. ( मावशीच्या नवऱ्याला मावसा म्हणतां येतें परंतु प्रचारांत तसें म्हणण्याची चाल नाहीं. )

आईचा बाप तो आजा त्याची बायको ती आजी.

आईच्या बापाचा बाप तो पणजा आणि त्याची बायको ती पणजी.

(३) बहिणीचा नवरा तो मेहुणा, तिचीं मुलें तीं भाचा—भाची.

(४) बायकोची बहीण ती साली किंवा मेहुणी, बायकोचा भाऊ तो साला-शालक किंवा मेहुणा.

बायकोच्या बहिणीचा नवरा तो साडू.

बायकोचा बाप तो सासरा, त्याची बायको ती सासू, दुसरी वरची पिढी आजे-सासू-सासऱ्याची, तिसरी पणजे-सासू सासऱ्याची.

(५) नवऱ्याचा बाप तो सासरा, त्याची बायको ती सासू, दुसरी वरची पिढी आजे आणि तिसरी पिढी पणजे सासू-सासऱ्याची.

नवऱ्याची बहीण ती नणंद.

नवऱ्याचा भाऊ तो दीर, त्याची बायको जाऊ आणि त्यांचीं मुलें पुतणीं.

(६) मुलाचा मुलगा तो नातू, त्याची बायको ती नातसून, मुलाच्या मुलाचा मुलगा तो पणतू, त्याची बायको ती पंतीसून.

(७) मुलीचा नवरा तो जांवई, जांवयाचा बाप तो व्याही, त्याची बायको ती विहीण.

(८) भावाची बायको ती भावजय, तिचीं मुलें तीं पुतण्या-पुतणीं.

ह्यांशिवाय प्रत्येक नात्यांत सखे, सावत्र आणि चुलत असे तीन प्रकार असतात. सखे म्हणजे एका आईबापाचे, सावत्र म्हणजे दुसऱ्या आई किंवा बापाचे, आणि चुलत म्हणजे चुलत्याचे.

कांहीं नातीं अशीं असतात कीं, त्यांच्या वाचक शब्दानें हांक मारतां येते. जसें आजोबा, काका, मावशी, आई, मामा, सुनबाई, सासूबाई इ०; पण कांहीं अशीं असतात कीं, त्यांच्या वाचक शब्दानें हांक मारण्याची चाल नाहीं. त्याकरितां दुसरेच शब्द उपयोगांत आणितात. जसें,—बापाला बाबा.

बहिणीला धाकटी असली तर बहुतकरून ताई किंवा माई आणि वडील असली तर आका किंवा जिजी.

भावाला भाऊ किंवा ज्येष्ठ असला तर दादा.

दिराला भाऊजी.

भावजयीला वहिनी.

नणंदेला वन्सें.

जावेला बाई.

पुणें मराठी ग्रंथालय
१३७ ब, नारायण पेठ, पुणें

सासऱ्याला मामा, मामाजी किंवा मामंजी आणि बायकोच्या आईला मामी म्हणतात.

लग्नप्रसंगीं मुलाला वर, नवरदेव, मुलाच्या आईला वरमाय, आणि बहिणीला करवली म्हणतात. वराचे संबंधी

ते वऱ्हाडी आणि मंडळी जमून बराबरोबर लग्नाला येते आणि परत जाते तीस वरात म्हणतात.

५३ काका, काकू, बाबा, मामा, वहिनी, आई, दादा इ. शब्द कोणाही बिननात्याच्या पुरुषास किंवा स्त्रीस सन्मानार्थही लावितात.

---

## धडा ९ वा.

### आई.

५४ अंजनी गीत—हें एका छंदाचें नांव आहे. जसें—साकी, दिंडी, आर्या इ०. अंजनी हें मारुतीच्या आईचें नांव आहे, पण त्या नांवाचा ह्या गीताशीं कांहीं संबंध नाहीं.

नीज = झोंप.

गीत = गाणें.

रडवें = रडकें.

वदन = तोंड.

मटामट = भराभर.

अगणित = असंख्यात. ज्यांची मोजणी करितां येत नाहीं इतके.

अंतर = मन.

तृप्त = धालेली, संतुष्ट.

जपते = राखते, संरक्षण करते.

अतिशय = अत्यंत, फार.

झटते = यत्न करिते.

परोपरि = निरनिराळ्या प्रकारचे.

उपचार = प्रसन्नता किंवा सुखी करण्याचे उपाय.

गोंजारणें = कुरवाळणें, डोक्यावरून आंगावरून हात फिरवणें.

९५ लहानपणीं मुलांचें सगळें संगोपन आई करिते. ती तें केवळ आपलें मूल म्हणून मायेनें करिते. दुसरे हेतु सगळे गौण असतात.

मुलाला पाळण्यांत घालून ती त्यानें निजावें म्हणून गाणें म्हणते किंवा त्यास झोंके देत बसते. मूल रडूं लागलें तर तें भुकेनें रडतें असें समजून ती त्यास दूध पाजिते आणि उगें करिते. त्याला दुखणें आलें तर फारसें वारें लागूं नये किंवा गरमी होऊं नये म्हणून ती जपते; त्यास सुख व्हावें म्हणून वारंवार प्रयत्न करिते, आणि निरनिराळ्या प्रकारचीं औषधें आणि वरील उपाय करिते. मूल चालतांना पडलेंसें दिसलें तर त्यास उचलण्यास धांवून जाते, आणि पोटाशीं धरून आंगावरून हात फिरविते. तें हसलें तर तिला त्याचें कौतुक वाटतें आणि त्याचे किती जरी मुके घेतले तरी तिचें समाधान होत नाहीं. त्याचे सगळे कारभार तिच्या आंगावर होत असतात. ती त्याच्याकरितां आपल्या शरिराची फार तर काय, जिवाची देखील परवा करीत नाहीं. मूल ३।४ वर्षांचें होईपर्यंत तर त्यास जपतां जपतां तिची पुरे वाट होते. अशा आईच्या ममतेचें एका मुलाला स्मरण होऊन,

तो म्हणत आहे कीं, आईच्या अशा उपकारांस काहीं हद्द नाहीं; मी त्यांची फेड करण्यास केवळ असमर्थ आहें.

५६ आईनें आपल्याकरितां केलेल्या कष्टांचा आपल्याला मोबदला कांहीं करितां येत नाहीं; तरी पण आपल्याला कांहीं करितां येण्यासारखें आहे. तें हें कीं, आईचा अपमान करूं नये, तिला भलतें सलतें बोलूं नये, तिला सर्व प्रकारें सुखवावें. ह्याच्या उलट आपण केलें आणि आपल्यापासून आईला त्रास झाला, तर तिला फार दुःख होईल आणि आपण तिला जन्मलोंच नसतों तर बरें होतें, असेंही वाटेल.

---

## धडा १० वा.

### वडिलांचा मान.

मघा = थोडा वेळ पूर्वीं.

ओटी = ओसरी.

लोड = तकिया.

अदब = मान, नम्रता, मर्यादा. अदब हा शब्द फारसी आहे.

बस = पुरे. बसबस = पुरे पुरे. बस हा शब्द बैस ह्या अर्थींही वापरतात.

उलट जबाब देणें = उलटून बोलणें, प्रत्युत्तर करणें.

उलट = विरुद्ध.

अपमान = बेअदबी, उद्धटपणाची वागणूक.

घाई = त्वरा, जलदी.

( आई ) बोलली = पुष्कळसें म्हणाली, रागें भरली.

म्हणणें आणि बोलणें—म्हणणें हें कांहीं अंशीं सांगण्यासारखें आहे. पण बोलणें ह्यांत पुष्कळसें म्हणणें येतें, आणि तें कांहीं अंशीं संवादासारखें असतें; किंवा त्यांत एकच गोष्ट अनेक रितीनें सांगितलेली असते. जसें—

तो म्हणाला.

त्यानें एकदां ऐकलेलें सगळें म्हणून दाखविलें.

ते दोघे बोलत होते.

आज त्या खटल्यांत तो फार चांगलें बोलला.

बोलणें ह्यांत रागें भरणें असाही अर्थ केव्हां होतो. जसें—

"बोलणाराचें तोंड दिसतें. करणाराची करणी दिसत नाहीं."

५८ नाहीं धूत जा. जा आणि या हीं सारखींच पालुपदें आहेत. पण प्रेम दाखवावयाचें तर 'या' चा प्रयोग करितात. आणि रागाला 'जा'. जसें—चला तोंड धुवूं या. नाहीं धूत जा.

५९ मनाला लागणें = वाईट वाटणें. लागणें या शब्दाचा उपयोग निरनिराळ्या अर्थीं होतो. जसें—

मी बोललों तें त्यास लागलें.

त्याच्या पायाला लागलें.

हात गार लागतो.

तो त्याचा मामा लागतो.

मी कामास लागलों होतों.

तो लागून बोलला.

ज्याच्या जें हातीं लागलें तें त्यानें उपटलें.

झाड चांगलें लागलें.

फुलें काय चांगलीं लागलीं आहेत.

त्यांचें भांडण लागलें.

ग्रहण लागलें.

पावसाची एकसारखी झड लागली आहे.

त्यास पिशाच्च लागलें.

मी त्याचें कांहीं लागत नाहीं.

लागलेंच आणि लाग साधणें ह्यांचा संबंधही लागणें ह्याच शब्दाशीं दिसतो, पण अर्थ अगदीं निराळे आहेत.

६० घंटा—घटि, घटिका, घंटिका, घंटा अशीं रूपें झालेलीं दिसतात. पूर्वीं जुन्या काळीं प्रतिघटिकेस गजर मात्र करीत. म्हणजे त्यावरून लोकांना घटिका झाली असें समजे.

घंटेचा नाद देवपूजेंत भूत पिशाचांचें निर्गमन आणि देवांचें आगमन व्हावें म्हणून करितात. देवळांतून मोठमोठ्या घंटा लाविलेल्या असतात. देवालयांत आपण गेलों म्हणजे आपल्या आगमनाची खूण म्हणून आपण घांट वांजवितों. ह्या घंटा पुष्कळ लहान मोठ्या आणि निरनिराळ्या धातूंच्या असतात; पण फारकरून त्या कांशाच्या असतात. नारोशंकरी घंटा फार मोठी, मोठा शब्द करणारी म्हणून प्रसिद्ध आहे. कोणी फार मोठ्यानें बोलत असला तर विनोदानें त्यास ‘ नारो शंकरी घंटा ’ म्हण-

ण्याची चाल आहे. प्रभास येथें सोमनाथाचे देवळांत कोणे एके काळीं एवढी मोठी सोन्याची घंटा असे कीं, तिची जी ओढण्याकरितां सांखळी असे ती एक मण सोन्याची होती असें म्हणतात.

युरोपांत बहुधा लोकांच्या घरोघर घंटा लाविलेल्या असतात, आणि कोणी मनुष्य कोणाच्या घरीं गेला तर त्यानें हांक मारूं नये, घंटा वाजवावी अशी चाल आहे. इंग्रज लोकांच्या देवळांतूनही घंटा असतात.

आपल्या देशांतही आजकाल शाळांतून, स्टेशनावरून वगैरे घंटा ठेविलेल्या असतात; आणि निरनिराळे वेळ झाल्याचें दाखविण्याकरितां त्या वाजवितात. घोडे, गाड्या, बायसिकली, मोटरी, इत्यादिकांवर घंटा लावितात; म्हणजे रस्त्यानें चाललें असतां ओरडून सांगण्याचें कारण रहात नाहीं. रस्त्यानें ओरडून हांक मारणें असभ्यपणाचें समजलें जातें. गांवड्यांतून जसें एक दुसऱ्यास गागून हांक मारतो, तसें शहर गांवांत करीत नाहींत. शुशुशु करितात. किंवा शीळ वाजवितात, व तें माणूस ऐकण्याच्या टप्प्याबाहेर गेलें तर हांक मारण्याचा कोणी प्रयत्न करीत नाहींत.

अहो जाहो=अरे कारे ह्याचें बहुवचन.

काम=कर्तव्य, धर्म.

६१ वडिलांचा मान शरिरानें आणि भाषणानेंही राखिला पाहिजे.

वडील—ह्यांत आपल्याहून नात्यानें, विद्येनें किंवा अधिकारानें जे थोर तें सगळेच समजावे.

( १ ) शरिरानें मान राखणें.–

[ १ ] त्यांच्या समोर पडलें राहूं नये; किंवा लोळूं नये.

[ २ ] पाय पसरून आढी घालून किंवा मांडी वर चढवून बसूं नये.

[ ३ ] सभेचा, बैठकीचा वगैरे प्रसंग असल्यास तेथें, किंवा आपण बसले असूं त्या जागीं, किंवा आपले घरीं आपल्या वडिलांपैकीं कोणी आल्यास आपण उठून उभें रहावें, व लांबून नजरा नजर झाली तर थोडें सामोरेंही जावें. आपल्यावरच्या भागीं त्यांना बसवावें आणि ते बसल्यावर आपण बसावें.

[ ४ ] मोठ्यानें हसूं नये, पाहूं नये. हातवारे करूं नयेत.

[ ५ ] बोलतांना त्यांच्या चेहऱ्याकडे पहावें, पण नजरेला नजर लावूं नये.

[ ६ ] उघडें बोडकें बसूं नये.

[ ७ ] कपाळाला आढ्या घालूं नयेत. गालास किंवा डोक्यास हात लावून बसूं नये.

[ ८ ] भेटतांच लवून वंदन, रामराम, सलाम वगैरे यथायोग्य करावा.

[ ९ ] त्यांच्यावरच्या बाजूस बसूं नये. त्यांच्याहून उंच आसनावर बसूं नये, पुढ्यांत बसूं नये.

[ १० ] आढ्याकडे इकडे तिकडे पहात बसूं नये. कान आणि दृष्टि त्यांचेकडे असावी.

( २ ) भाषणानें मान राखणें.—

[ १ ] बहुवचनी संबोधून बोलावें.

[ २ ] हळू सावकाश बोलावें.

[ ३ ] उद्धटपणें बोलूं नये, किंवा उलट जबाब देऊं नये.

[ ४ ] ते रागें भरले असतां ऐकून घ्यावें. मग आपल्याला काय सांगायाचें तें सांगावें. शब्दाला प्रतिशब्द करूं नये.

[ ५ ] डौलानें त्यांस उपदेश करूं लागूं नये.

[ ६ ] ज्यापासून त्यांचें मन दुखवेल किंवा त्यांस संताप येईल किंवा त्यांची दुष्कीर्ति होईल असें कांहींच करूं नये.

वडिलांत आईचा अंतर्भाव आहे, परंतु आईशीं वागणुकींत वर जो बाह्योपचाराचा भाग सांगितला आहे तेवढयाची गरज नाहीं. तरी तिचा अपमान किंवा अमर्यादा ज्या कृतीनें किंवा भाषणानें होईल तें कधींही करूं नये. आई ही क्षमामूर्ति आहे. तिला आपण अगे, तू, तुला इ० एकेरी बोलतों तें निष्कृत्रिम, शुद्ध प्रेमाचें व एकात्मतेचें दर्शक आहे. तिचें हृदय आपण कधीं दुखवूं नये. तें जर खरोखरीच दुखवलें तर आपलें कल्याण खचीत होणार नाहीं.

... मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नं. २७६५



## धडा ११ वा.

### वनभोजन.

ओढा = नाला, ओहोळ.

फराळ = थोडें खाणें, उपहार.

६२ आहार=आपले लोकांत आहाराचे बहुधा दोनच प्रकार आहेत, दुपारचें जेवण आणि रात्रीचा फराळ. रात्रीचें थोडें खावें असें आपल्या वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे म्हणून रात्रीं फराळ करितात. फराळाला पदार्थ थोडे असतात आणि अल्प प्रमाणानेंही असतात. फराळाचा पदार्थ स्वतंत्रपणें खाण्यास रुचिकर असाही करितात. जेवणाचा पदार्थ नेमानें तसा नसतो. जसें फराळाचें तांदूळ आणि जेवणाचा भात. फराळ हा शब्द फलाहाराचा अपभ्रंश उघड दिसतो; पण हल्लीं रूढींत फराळ आणि जेवण यांत कांहीं भेद नाहीं. अन्न सारखेंच असतें. शिजवण्याच्या कृतींत काय तो भेद.

दुपारच्या जेवणाला उशीर असल म्हणजे सकाळीं फराळ करितात. अर्थात् मग रात्रीं आहा कांहीं नाहीं. अलीकडे सकाळचा चाहा हें एक नित्य आहारांतलें झालें आहे. तें इंग्रज लोकांच्या अनुकरणाचें फळ आहे.

६३ इंग्रज लोकांत पान आणि आहार दिवसांतून ४।५ वेळां करितात.

सकाळीं टी–चाहा.

दहा वाजतां ब्रेकफास्ट, फराळ.

दुपारीं टिफिन.

तिसरे प्रहरीं लंच–चाहा.

रात्रीं डिनर–जेवण.

६४ वनभोजन = वनांत केलेलें भोजन. उत्तर हिंदुस्तानांत वनभोजनाला पत्ती म्हणतात. त्याला आणखी सहल, गोट अशींही नांवें आहेत. वनभोजनाची चांगली गंमत म्हणजे निरनिराळ्या लोकांनीं आपापले स्वयंपाक करून मग एके जागीं बसून जेवणें. पण कधीं एकेच जागीं सगळा स्वयंपाक केलेला असतो, आणि कधीं तर बाहेरून शिजवलेलें अन्न आयतें आणून वनांत नुसतें खावयाचें असतें. ह्या धड्यांत हें तिसऱ्या प्रकारचें वनभोजन वर्णिलें आहे. वस्तुतः ह्या प्रकारच्या भोजनाला 'वनभोजन' म्हणण्यापेक्षां 'उपवन भोजन' किंवा 'उद्यान भोजन' म्हटलें पाहिजे.

६५ दामू आणि हरी हीं दोन्हीं नांवें विष्णूचीं आहेत. कृष्णानें दह्याचें मडकें रागानें फोडिलें म्हणून त्याची आई यशोदा हिनें दाव्यानें त्यास बांधिलें. किती दावीं बांधिलीं तरी तीं पुरेनात. दावीं सगळीं सरलीं आणि आई यशोदा दमलीसें पाहून कृष्णानें शेवटचें दावें पुरूं दिलें. जणूं काय त्याच्या उदरांत दावें होतें त्याची त्यानें भर घातली. असा चमत्कार कृष्णानें केला म्हणून त्यास दामोदर असें नांव पडलें.

हरि म्हणजे हरण करणारा दुःखपापांचें.

६६ पार=झाडाच्या मुळांस बांधलेला ओटा. हिंदु लोकांत पिंपळाला आणि वडाला पार बांधण्याचें मोठें पुण्य समजतात. म्हणून गांवांतून जागजागीं ह्या जातींच्या झाडांभोंवतीं ओटे बांधलेले असतात. खरोखरच वर चांगली सघन छाया आणि खालीं बसायला स्वच्छ, सारखी, चांगली जागा. ह्यांपासून पांथस्थाला किती सौख्य होतें !

पारंबी=वडाच्या जटेला पारंबी म्हणतात. पण "पारंबी" शब्दाचा 'पार' शब्दाशीं कांहीं संबंध दिसत नाहीं.

६७ दामूच्या मास्तरांनीं जें वनभोजन केलें त्यांत एकंदर जिन्नस हे आले होते–गूळपापडी, वांगीं पोहे, केळ्यांचें लोंगर, डाळें, रस आणि बरफी. ह्या पदार्थांचे करण्याचे थोडक्यांत प्रकार असे:—

( १ ) गुळ पापडी—गव्हांची कणिक तुपांत भाजून गुळाच्या पाकांत पाकवतात आणि वड्या करितात, किंवा तसाच भुगा ठेवितात, त्यास गुळपापडी म्हणतात.

( २ ) वांगीं पोहे—वांगीं ही फळभाजी प्रसिद्ध आहे. वांगीं आकारानें गोल किंवा लांबोळीं, आणि जांभळीं, हिरवीं, पांढरीं, लाल अशा चार निरनिराळ्या रंगांचीं असतात. पोहे आणि सबंध वांगीं फोडणीस घालून शिजवितात. ह्याचप्रमाणें बटाटे, तोंडलीं, मटारांचे दाणे, चण्याची डाळ किंवा दुसरे पदार्थही पोह्यांत घालितात.

( ३ ) पोहे—हे साळींचे उकडून कुटून कोंडा काढून तयार करितात. असेच साळींचे मुरमुरे व लाह्याही होतात, आणि साळी तशाच ( न उकडतां ) कुटून त्यांतले तांदूळ काढितात.

( ४ ) लोंगर=घड. केळीच्या चांगल्या घडास १५० पर्यंत केळीं येतात. केळीं अनेक प्रकारचीं असतात. तीं पाणथळ जागेंत चांगलीं होतात. सोनकेळीं किंवा वसईचीं केळीं उत्तम म्हणून प्रसिद्ध आहेत.

( ५ ) डाळें—डाळ हें सामान्य नाम आहे; परंतु डाळें म्हणजे फुटाणे भरडून सालें काढून होतात तीं. भट्टींत भाजलेले चणे ते फुटाणे. ज्या डाळयाचें सहज बोटांनीं रगडलें असतां पीठ होतें तें डाळें चांगलें.

( ६ ) उसाचा रस—हा ताजाच प्यावा. कांहीं वेळ झाल्यावर तो आंबून जातो आणि त्यांत कृमी पडण्याचाही संभव असतो. उसाचा रस कढवून काकवी, राब, गूळ आणि साखर करितात.उसांचेही अनेक प्रकार आहेत, पण त्यांत दोन मुख्य आहेत. एक पाढा किंवा जाडी ऊस आणि दुसरा लाल बारक्या. पहिला ऊस खाण्यामध्यें विशेष येतो आणि दुसरा गूळ-साखर करण्याच्या कामीं येतो.

( ७ ) बरफी—खवा आणि साखरेचा पाक मिळवून करितात. हा प्रकार बरफीचा सामान्य आहे. ह्याशिवाय गरीची ( ओल्या खोबऱ्याची ), आंब्याची, बदामाची अशी अनेक पदार्थांची बरफी करितात. कांहीं जागीं साखरेच्या ऐवजीं गूळही घालितात.

६८ ह्या धड्यांतील वनभोजनांतील विशेषः—

[ १ ] मुलांबरोबर मास्तरांनींही एक जिन्नस आणिला होता. पण मास्तर मुलांबरोबर खावयाला बसले नाहींत किंवा त्यांजवळून त्यांनीं कांहीं घेतलें नाहीं.

[ २ ] सर्वच जातींचीं मुलें एकत्र जमून त्यांनीं आपआपले पदार्थ सर्वांस वांटून खाल्ले. ह्या मुलांत एक भडभुंजाचाही मुलगा होता. अर्थात् शाळेंतील मुलांनीं आपापसांत लहान मोठा भाव किंवा उच्चनीच भाव ठेवूं नये.

[ ३ ] पदार्थ आणणारीं मुलें थोडीं होतीं, पण त्यांनीं थोर मनानें शाळेच्या दुसऱ्याही मुलांला आपल्या जिनसांचा भाग दिला होता.

६९ रामू, राम्या, रामजी हीं सगळीं नांवें रामाचीं आहेत. राम हा अयोध्येचा राजा दशरथ याचा मुलगा होता. हा विष्णूचा अवतार म्हणून याचें भजन देवाप्रमाणें करितात. रामाची कथा ज्या ग्रंथांत वर्णिली आहे त्याचें नांव रामायण.

७० खमंग—ज्यांत तिखटमीठ, मसाला यांचा चांगला मेळ झालेला असतो तें, स्वादिष्ट, चवदार, उद्दाम, चरचरीत, तरतरीत.

७१ हयबती—हैबत म्ह० दरारा, हा फारसी शब्द आहे. हैबताचें हैबती झालें; किंवा ‘ हयपति ’ चें तें रूप असेल; हय = म्हणजे घोडा, पति म्ह० स्वामी.

७२ भडभुंजा—भाड भाजणारा. भाड = चणे फुटाणे भाजायाचा मोठा चुला.

७३ माळू, माळोजी हीं माळा याचीं रुपें आहेत.

७४ नामी—सुंदर; नामी हा फारसी शब्द आहे. त्याचा वास्तविक अर्थ “ प्रसिद्ध ” “ कीर्तिमान् ” असा आहे. मराठींत हा शब्द सुंदर ह्या अर्थी वापरतात.

७५ मळा—उसाच्या शेताला मळा म्हणतात. सामान्यतः ज्यांत विहिरीचें पाणी देऊन शेती केलेली असते त्यास मळा म्हणण्याची चाल आहे.

७६ गुऱ्हाळ—उसाचा रस काढावयाचा चरक. हे प्रथम दगडी होते मग लांकडी झाले आणि आतां लोखंडी निघाले आहेत. ह्यांत एक ऊस झाला कीं दुसरा, दुसरा झाला कीं तिसरा ह्याप्रमाणें एकसारखें ऊस लावण्याचें काम चालू असतें. म्हणून जो माणूस मध्यें न थांबतां एकसारखा बोलत राहातो त्याच्या त्या बोलण्यास ‘ गुऱ्हाळ ’ म्हणण्याची चाल आहे. हेंच बोलणें वायफळ व अप्रयोजक गोष्टींनीं भरलेलें असतें तेव्हां त्यास ‘चऱ्हाट वळणें’ म्हणतात.

७७ मास्तर ह्याचा अर्थ मालक, स्वामी असा आहे. तथापि एकाद्या सार्वजनिक संस्थेचा जो मुख्य व्यवस्थापक त्यासही हा शब्द लावितात. जसें शाळामास्तर, पोस्टमास्तर, स्टेशनमास्तर, बाजारमास्तर इ०.

कळकळ = अगत्य, जरूरी बाळगणें.

बेत = विचार—काम करण्याचा. बातबेत--टापटोप. बेत ह्याचा अर्थ मोजणें असाही आहे. जसें आंगरख्याचा बेत.

पार पडणें = कडेस लागणें, शेवटास जाणें.

---

## धडा १२ वा.

## घोडा–घोडा.

७८ नाना—हिंदीभाषेंत धाकट्याला नाना म्हणतात. आणखी आईच्या बापालाही नाना म्हणतात. खानदेशांत लहानु,

लहान्या असें लाडकें नांव ठेवण्याची चाल आहे. तसेंच उत्तर हिंदुस्तानांत नाना, नानू हीं विशेष नांवेंही आहेत.

७९ मनी—मणिकराणिका. काशीस गंगेच्या एका घाटास नांव आहे. येथें एकदां विश्वेश्वराच्या कानांतील मणी पडला होता म्हणून ह्यास मणिकर्णिका असें नांव पडलें. काशींत एका विशिष्ट घाटाच्या लोड्या तयार होतात त्यांसही मणिकर्णिका म्हणतात.

८० घोडा—हें जनावर प्रसिद्ध आहे. लहान घोड्याला तट्टू किंवा बट म्हणतात; आणि मध्यम उंचीच्या घोड्याला आड—घोडें म्हणतात.

घोड्याच्या अनेक जाती आहेत. हिंदुस्तानांतील प्रसिद्ध जाती काठेवाडी, बालोत्रा, दखनी, भीमथडी, मेवाडा इ०.

विलायतेंतील जाती अरब, वेलर इ०.

ब्रम्हदेशांतील घोडं बहुधा उंचीला लहान असतात.

घोड्यांच्या रंगांचीं निरनिराळीं नांवें आहेत. जसें—कुमेद, बदामी, करडा, सोनसळा, सारंगा इ०; ह्या रंगांवरून त्यांच्या जातींची व गुणांची परीक्षा करितात.

घोड्यांच्या कांहीं चालीही प्रसिद्ध आहेत. कदम, तुर्की, लंगडा, भरधांव इ०. ह्या धड्यांत ‘ उडत चालली नाहींस ’ म्हणून म्हटलें आहे तो घोड्याच्या गतीचाच एक प्रकार आहे.

घोड्यांना कांहीं वाईट खोडीही असतात. चावणें, लात मारणें, वर स्वारी करूं न देणें, स्वारी केल्यावर मागल्या पायांवर वर येणें इ०.

इंग्रजींत घोडा या विषयावर मोठालीं स्वतंत्र पुस्तकें आहेत. त्यांत घोड्याला वळवावें कसें आणि त्यावर बसावें कसें ह्या संबंधानेंही पुष्कळ सांगितलेलें आहे. इंग्रजी रिसाल्यांत, तोफखान्यांत वगैरे माणसांप्रमाणेंच घोड्यांनाही कवाईत शिकवून तयार करितात.

घोड्यावर स्वारी तो दोन अडीच वर्षांचा झाल्यापासून करितात; आणि तो २० वर्षांचा होईपर्यंत चांगला काम देतो. इंग्रज बायका घोड्यावर एकीकडेच पाय टाकून बसतात.

घोड्यावर बसतात आणि त्यांस बग्यांसही लावितात; पण विलायतेस त्यांना नांगरांस जुंपतात आणि दुसरींही कामें बैलांकडून घ्यावयाचीं तीं घोड्यांकडून घेतात. आपल्या देशांत पूर्वकाळीं घोडे रथास मात्र जुंपीत असत. आणि रथांत बसण्याचा हक्क देव आणि राजे किंवा राजाचे सन्माननीय सेवक यांनाच असल्याचें दिसून येतें. साधारण लोकांना रथाचा हक्क नव्हता. पूर्वीं रथांना आणि आतां गाड्यांना एक पासून साहापर्यंतही घोडे जुंपितात. ज्यास्त घोडे लावणें हें सन्मानाचें चिन्ह आहे.

संस्कृतांत अश्वविद्येवरचे ग्रंथ फारसे उपलब्ध नाहींत. पण घोड्यांच्या शुभाशुभ चिन्हांवर आणि रोग-चिकित्सेवर कांहीं ग्रंथ प्रसिद्ध आहेत. नल राजा अश्वविद्येंत फार कुशल होता अशी कथा आहे. आजकालच्या काळांत बाबासाहेब आपटे म्हणून जयाजीमहाराजांच्या पदरीं ग्वाल्हेरीस एक सरदार होते त्यांचें नांव अश्व-विद्येसंबंधानें जग-विश्रुत आहे. प्रसिद्ध सरकसवाले विष्णूपंत छत्रे ह्या आपट्यांचे

शिष्य होते. मराठी राज्याच्या वेळीं घोड्यावर बसणें अगदीं सामान्य झालें होतें. पोरीसुद्धां घोडीं चांगलीं दामटीत असत.

आपल्या लोकांत घोड्यांच्या खाणाखुणांवरून शुभाशुभ मानण्याचे अनेक प्रकार आहेत. आणि त्यांवर श्रद्धा ठेवणारे लोक ते शुभाशुभ जाणणाऱ्यांच्या सल्ल्याशिवाय सहसा घोडा घेत नाहींत. जसें देवमण, कपाळीं टिळा हें चांगलें चिन्ह; आणि बालभोंवरी हें वाईट चिन्ह.

स्वारीच्या घोड्याचें साधारण सामान म्हणजे—खोगीर, लगाम, रिकेबी, पट्टा, इतकें असतें. घोड्याचें वशीकरण सगळें त्याच्या तोंडांत आहे. त्यासाठीं लगाम अनेक प्रकारचे करितात. कसाही बद घोडा असेना, त्याला एकदां लगाम घातला म्हणजे हवातसा ताब्यांत आणितां येतो. बैलाचें किंवा उंटाचें जसें नाक, हत्तीचें जसें गंडस्थळ, तसें घोड्याचें तोंड.

आजकाल यंत्रकलेमध्यें एंजिनांचा उपयोग होतो. त्या एंजिनाची शक्ति मोजण्याला घोड्याच्या शक्तीचें प्रमाण लावितात. जसें—अमुक हार्सपावरचें एंजिन, अमुक हार्सपावरची मोटार इ०. हार्स म्हणजे घोडा आणि पावर म्हणजे शक्ति. एक हार्सपावर किंवा अश्वबळाचें प्रमाण २० खंडी ९ शेर ओझें एक मिनिटांत एक फूट वर उचलण्यास लागणाऱ्या शक्तीबरोबर धरितात.

असें म्हणतात कीं, सूर्य रोज रथांत बसून नभोमंडलाची प्रदक्षिणा करितो. रथसप्तमीपासून त्याच्या रथाला घोडे जुंपतात. एथून पुढें उन्हाळा लागतो व दिवस मोठे होतात; आणि हिवाळ्यांत तो हरणाच्या रथांत बसतो

म्हणून त्या काळांत दिवस लहान असतो. देवांचा राजा जो इंद्र त्याच्याजवळ एक घोडा आहे त्याचें नांव उच्चैश्रवा.

मराठ्यांचे अर्वाचीन इतिहासांत महादजी महाराज आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई ह्यांचे घोडे प्रसिद्ध आहेत.

घोड्यांच्या किमती १०।१५ रुपयांपासून तों ३० हजारांपर्यंत देखील असतात.

८१ ह्या धड्यांत मनीनें नानाच्या कमरेला पट्टा बांधिला त्यालाच रशी बांधिली असेल. आणखी लगाम कशास घेतला होता, कोण जाणे! मुलांनीं घोडा–घोडा खेळतांना लगामाचा उपयोग करूं नये, गळ्याला किंवा तोंडांत रशी बांधून ओढूं नये, आणि एकमेकांच्या पाठीवर बसण्याचाही खेळ करूं नये.

८२ नाना आणि मनीला जेवण गोड लागलें तें कशानें? त्यांनीं खेळण्यांत श्रम फार केले होते म्हणून. मुलांनीं धांवण्या–पळण्याचा आणि चालण्याचा खेळ रोज खेळावा. त्यानें त्यांचें आंग चपळ राहतें, त्यांस भूक चांगली लागते आणि अन्नही आंगीं लागतें.

---

## धडा १३ वा.

### थोर मनाची मुलगी.

पेरू = जांब, जांबफळ, अमरूद.

धारवाडी = धारवाडच्या पेठेचा किंवा त्या नमुन्यावर केलेला.

८३ पेठ = बाजार. कांहीं जागीं कांहीं विशिष्ट पदार्थ तयार होतात, आणि त्या पदार्थांवरून त्या पेठेची प्रसिद्धि

होते. पेठ शब्द संस्कृत पीठ शब्दापासून झाला असावा. पीठ = आगर, स्थान. एका जागेच्यासारखे जिन्नस दुसरे जागीं होऊं लागतात तरी त्यांचें मूळ पेठेचें नांव चालू असतें. जसें पैठणी, महेश्वरी, येवली, बऱ्हाणपुरी, इ०. यावरून पेठेचा अर्थ वजा, घाट, घडण असाच घेतला पाहिजे. एका पेठेसारखा जिन्नस दुसऱ्या जागीं झाला तरी त्या पेठेची कांहीं विशेष खुबी त्यांत उतरत नाहीं. ह्याचें कारण त्या जागेच्या हवा-पाण्याचा गुण किंवा तेथील राहणाऱ्या लोकांची पिढीजाद आंगीं मुरलेली चतुरस्रता, वगैरे आहे.

८४ खण = चोळी करावयाचें कापड. ह्याचें प्रमाण नेहमीं एक हात लांबीचें असतें. मकर संक्रांतीला बायका गाडगीं-बोळकीं वाणांत देतात त्यासही खण म्हणतात. खण शब्दाचा एक अर्थ भाग, सोपा असाही आहे. जसें, ८ खणी किंवा आठ सोपी वाडा. खण शब्द दोन वेळां 'खणखण' असा म्हटला तर त्याचा अर्थ नाद, शब्द असा होतो; पण खणखणीत म्हणजे स्पष्ट.

आपलपोटी — आपल्यालाच सगळें हवें अशी हांव बाळगणारी.

८५ मनी आणि यमी दोघी मावस-बहिणी होत्या. त्यांच्या आया त्या बहिणी-बहिणी. यमी जशी आपलपोटी होती, तशीच जड बुद्धी आणि आळशीही होती. मनी थोर मनाची होती; तशीच शहाणीही होती. मनी आपला

विद्याभ्यास चांगला करी म्हणून तिला चांगलें बक्षीस मिळालें. यमी तसा अभ्यास करीत नसे, म्हणून तिला तसें बक्षीस मिळालें नाहीं.

८६ मनीची आई आणि यमीची आई ह्यांच्याही स्वभावांत आणि समजुतींत असाच फरक होता. यमी रडूं लागली, तेव्हां आईनें बक्षीस कां मिळालें नाहीं हें विचारून तें कसें मिळेल हें समजावून सांगायचें. नाहींतर तिला एक खण देऊन समजूत करायची होती. तें कांहीं न करितां ती आपली तिला घेऊन मनीच्या घरीं गेली. ती गेली ती तिचा खण घेण्याकरितांच होय. तिला जर लोभ नसता, तर तिनें एक चांगला उंची खण बरोबर नेऊन मनीला तिच्या खणाच्या बदली दिला असता. यमी जी इतकी वाईट स्वभावाची झाली होती, तिला पुष्कळ अंशीं तिची आईच कारण होती.

गोष्ट = कथा, हकीगत. पण गोष्ट शब्दाचा उपयोग केव्हां केव्हां उगाच पालुपदासारखा करितात. तसा येथें केला आहे.

---

## धडा १४ वा.

## भाकरीचा खेळ.

८७ भाकरीच्या खेळांत जर भाकर मुळींच येत नाहीं तर त्यास दगडफेकीचा खेळ कां म्हणूं नये!

८८ चपटे दगड घेण्याचें कारण असें कीं, ते

आंगठा आणि तर्जनी ( पहिलें बोट ) यांत गोल धरून जोरानें मारतां यावे.

जो तो – प्रत्येक.

८९ तळें – ज्यांत पुष्कळसें पावसाचें पाणी सांचतें असा मोठा खळगा किंवा खड्डा. ज्याच्या सभोंवतीं पर्वत असून त्यांचें वाहून आलेलें पाणी मध्यें खिंडींत सांचतें त्यास सरोवर म्हणतात. कांहीं तळीं हिंदुस्तानांतील प्रसिद्ध आहेत. जसें भोपाळचा ताल; पण आतां त्यांत पाणी मुळींच नाहीं. दहा पंधरा गांवें वसलीं आहेत. तरी ह्या तळ्याचे अवशेष इटार्सीहून भोपाळकडे जातांना रेल्वेंतून दिसतात. मेवाड देशांत ढेबरचा व काकरोलीचे ताल प्रसिद्ध आहेत.

९० बरोबर=योग्य. ह्या शब्दाचा उपयोग पूर्वी " सोबत " ह्या अर्थी मात्र करीत असत. अलीकडे " ठीक, " "योग्य" ह्या अर्थी करण्याचा प्रघात पडला आहे. हा मूळ फारसी शब्द 'बराबर' असा आहे. आणि त्याचा अर्थ त्या भाषेंत ' समान ' असा होतो.

९१ कोणचाही खेळ खेळायाचा तर त्यापासून दुसऱ्यास त्रास होऊं नये. हें नेहमीं लक्ष्यांत ठेवावें. खेळ दोन प्रकारचे असतात. कांहींपासून व्यायाम घडतो आणि कांहींपासून नुसती करमणूक होते. करमणुकीसाठीं देखील कोणास पाण्यांत ढकलणें, त्याच्या वस्त्रास आग लावणें इ० प्रकार करूं नयेत.

एका मोंगल राजाची गोष्ट सांगतात कीं, तो काश्मीरकडे स्वारीस गेला असतां एके दिवशीं एका उंच पर्वतशि-

खरावरून एक हत्ती खालीं आदळला; तो एका शिखरावरून दुसऱ्यावर आपटत आपटत खालीं येईपर्यंत त्याचा चूर होऊन गेला. तें पाहून त्या राजास अशी मौज वाटली कीं, त्यानें शेंपन्नास हत्ती त्या पहाडावरून एकामागून एक लोटवले आणि ते कसे किंकाळतात आणि आपटतात ह्याची मौज प्रहरभर पहात बसला. हें पर्वत-शिखर काश्मीरांत ' हाती मार ' ह्या नांवानें अद्यापिही प्रसिद्ध आहे.

९२ बेडूक बिचारे गरीब प्राणी! त्यांची शक्ति मुलांसमोरती काय चालणार ? म्हणून ते प्रथम कांहीं बोलले नाहींत. जेव्हां त्यांतले बरेच जखमी झाले आणि कितीएक मेले देखील, तेव्हां एका बेडकानें बोलण्याचें धैर्य केलें. त्या योगें त्या राहिलेल्यांचा पुढें बचाव झाला. पण हेंच तो बेडूक जर लौकर बोलता तर त्यांचें संरक्षण अधिक झालें असतें. निदान हे प्राणी इतके सहनशील आहेत असा त्या मुलांचा भ्रम तरी नाहींसा झाला असता.

---

## धडा १५ वा.

### प्राण्यांवर दया करा.

९३ लखू — लखन, लख्या, लखू, लक्ष्मण, लखबा, लक्ष्मणराव अशी नांवांची परंपरा होत जाते.

फुलपाखरूं — फुलांवर उडत फिरणारें पाखरूं, किंवा फुलासारखें चित्र-विचित्र रंगाचें पाखरूं, पतंग इ०.

९४ 'हाल' शब्द फारसी "हकीकतीचा" वाचक आहे. मराठींत ह्याचा उपयोग वेदना, यातना, दुःख ह्या

अर्थी होतो. मांसाहारी लोक भक्ष्य-प्राण्यांचा जीव घेतात, पण तेसुद्धां त्यांचे हाल करूं नयेत असें म्हणतात. त्यांतलें इंगित असें आहे कीं, आपला उपयोग असेल तर त्यांस एकदम मारावें. उगाच तखलीप देऊं नये. आणि कांहीं लोकांचा असा ग्रह आहे कीं भक्ष्य जनावरांना मुळीं आत्माच नसतो. नुसता प्राण त्यांच्यांत असतो. किती एक लोकांच्या मतें हिंसक प्राणी किंवा शिकार करण्याजोगे प्राणी ह्यांना आपल्या करमणुकीकरितां किंवा ते प्राणी दुष्ट म्हणून-च मारणें निर्दयपणाचें होत नाहीं. बुद्ध व जैन धर्माला मात्र ह्यांपैकीं कोणचाही प्रकार संमत नाहीं.

पितळी = पितळेची केलेली एवढाच ह्याचा अर्थ आहे. पण तो शब्द एका विशिष्ट घाटाच्या परातीला लावितात. असा अर्थ घेण्याला संस्कृत भाषेंत ' लक्षणा ' म्हणतात. जसें, त्याचें घर गंगेवर आहे. अर्थात् गंगा नदीच्या कांठीं आहे. ' गझनी ' ' दगडी ' हे शब्द असेच आहेत. ' गझनी ' शब्दानें एक प्रकारचें रेशमी कापड आणि ' दगडी ' शब्दानें दगडाचें केलेलें एक विशेष घडणीचें भांडें समजलें जातें. जसें—गझनीची विजार, लोणच्याची दगडी इ०.

गच्च=आंवळून.

बापडा=गरीब, दीन.

९५ फुलपांखरें किंवा पतंग धरून वर उडविले तर ते आपल्या इच्छेप्रमाणें उंच आकाशांत उडून जात नाहींत

म्हणून शोकी लोक त्यांच्या आंगाच्या आकारासारखे कागदाचे किंवा रेशमी कापडाचे पतंग करून ते उंच उंच उडवीत असतात. उन्हाळ्याच्या दिवसांतला हा एक खेळच आहे. शिवाय निरनिराळ्या ठिकाणीं पतंगांचा खेळ खेळण्याचा काळ ठरलेला आढळतो. पुणें येथें चतरशिंगीच्या जत्रेंत व त्या सुमारास पतंगांचा खेळ चालतो. तसेंच सोलापूर प्रांतीं नागपंचमीच्या दिवशीं नागोबाच्या पूजेच्या ठिकाणीं पतंग उडविण्याची चाल आहे. हा खेळ मोठ्या वयाचे अमीर उमरावही खेळतात. आणि पतंगांचे दोर करण्याचे उत्तर हिंदुस्तानांत कारखाने आहेत. मथुरेचा दोर फार प्रसिद्ध आहे.

९६ दोरा—बारीक शिवण्याच्या व ओवण्याच्या कामीं येतो. हा कापसाचा, रेशमाचा, तागाचा, वाकाचा वगैरे काढितात. दोरी म्हणजे सुतळी. ही दोऱ्यापेक्षां पुष्कळच जाड असते. दोरा हा शब्द पुल्लिंगी आणि दोरी स्त्रीलिंगी म्हणण्याचा परिपाठ आहे. बहुधा स्त्रीलिंगी शब्द पुल्लिंगी शब्दापेक्षां लहान, कमी बळाचे द्योतक असतात. जसें, रस्सा आणि रश्शी. पण दोरा आणि दोरी ह्यांत मात्र उलट अर्थ आहे.

९७ पांखरांना खडे मारावयाचे, रस्त्यानें चालतांना जेथें कोठें कुत्रें सांपडेल त्याला हाणायाचें, मांजरामागें धांवत जावयाचें—असे खेळ खेळूं नयेत.

———

## धडा १६ वा.

### लपंडाव.

कणगी-धान्य ठेवण्याची लहान कोठी.

गंपू=गणपतीचा संक्षेप. गणपती हा विघ्नहर्ता देव आहे. सर्व कार्यांच्या आरंभीं त्याचें स्मरण-पूजन करितात.

९८ खेळतांना चिडूं नये, हातघाईवर येऊं नये, खेळण्यांत सुद्धां लबाडी करूं नये. हारजितीचा खेळ असेल तेव्हां हारजीत कोणाची हें ठरविण्याकरितां तिऱ्हाईत पंच नेमावा हें बरें.

'हारीला' भीत नाहीं, किंवा 'हारेला' भीत नाहीं असेंही आपण म्हणतों. पण कांहीं शब्दांचीं रूपें इकारांत आणि कांहींचीं एकारांतच होतात. पहिल्या प्रकारचें उदाहरण.

सूय – सुईला, कुऱ्हाड – कुऱ्हाडीला, इ०.

दुसऱ्या प्रकारचें उदादरण—

भीक – भिकेला, माळ– माळेला, शीळ–शिळेला इ०.

---

## धडा १७ वा.

### खरें बोलणें.

रंगू – रंगनाथ शब्दाचा संक्षेप. श्रीरंग हें व्यंकटेश विष्णूचें नांव. रंगनाथ नांवाचे एक प्रसिद्ध साधुही होऊन गेले आहेत. रंगू किंवा रंगी हें मुलींचेंही नांव असतें.

९९ स्लेट एक प्रकारचा दगड आहे. ह्याचे थरच्या थर

सांपडतात. ते करवतून मोकळे करितात, व रंध्यानें तासून त्यांस नरम करितात. मग त्यास लाकडाच्या चौकटी लावून बाजारांत विकावयास आणितात. पूर्वी लांकडाच्या पाटीवर माती सारवून धूळ घालून बासांच्या (बांबूच्या) लेखणीनें लिहीत असत. अद्यापिही वर्णमाला, अंक इत्यादिकांला धुळाक्षर म्हणतात आतां लाकडी पाट्यांऐवजीं स्लेट पाट्यांवर लिहूं लागले. स्लेट पाटीवरचें लिहिणें संपलें म्हणजे शिसपेनसिलीनें कागदांच्या वह्यांवर लिहितात.

सच्चा = खरा.

वळण=रस्ता, शिस्त, रीत. वळण ह्याचा शब्दार्थ मोड, घुमाव असा आहे.

१०० यशोदाबाईची तारीफ त्या बाईनें केली ती अगदीं खरी होती. मुलास तिनें चांगलें वळण लावलें होतें, व खरें बोलण्याचें शिकविलें होतें. यशोदाबाई समंजस होती; ती त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवी, आणि त्यानें न कळत अपराध केला तर त्यास उगाच मारीत किंवा बोलत नसे.

१०१ यशोदा कृष्णाच्या आईचें नांव होतें. यशोदा ही नंदाची बायको होती. नंद-यशोदा गोकुळांत रहात. हल्लीं मथुरेजवळ गोकुळ म्हणून एक खेडेगांव आहे; त्यांत त्यांचा वाडा वगैरेंच्या जागा लोक दाखवितात.

## धडा १८ वा.

### धनगराचा पोर.

१०२ धनगर=शेळ्या-मेंढ्या राखणारा. हिंदुस्थानांत त्यास गडरिया म्हणतात. इंदूरचे होळकरमहाराज धनगर जातीचे आहेत. ते होळगांवचे राहणारे म्हणून त्यांस होळकर असें नांव पडलें.

१०३ पोर हा शब्द मुलगा आणि मुलगी दोघांनाही लावितात. जसें-तो पोर, ती पोर. तिरस्कारयुक्त म्हणावयाचें तर पोरगा, पोरगी असें म्हणतात. पण पोरका म्हणजे ज्याचे आई-बाप मेले आहेत असा मुलगा. अगदीं अधिक्षेपपर म्हणायचें तर पोरटें आणि ह्याचा प्रतिशब्द कारटें.

१०४ मुलगा—ह्या शब्दानें केव्हां वयोमान आणि केव्हां नुसतें नातेंच दाखविलें जातें. जसें—सकाळीं एक मुलगा आला होता. ह्यांत वयाचें अनुमान होतें. पण "दिलीपाचा मुलगा रघु-रघूचा अज" ह्यांत नुसतें नातें कळून येतें. मूल शब्द फारच लहान वयाच्या मुलास लावितात.

विश्वास=भरंवसा, खात्री.

थट्टा=विनोद, हंसें आणणारें भाषण किंवा चेष्टा.

कुणबी=शेतकरी. कुणब्याची बायको ती कुणबीण, पण कुणबीण हा शब्द साधारण दासी ह्या अर्थी वापरतात. कुणबा शब्द खटल्याचा, कुटुंबाचा वाचक आहे. त्याचें 'कुणबाऊ' असें एक रूप होत असतें. त्याचा अर्थ कुटुंबांत वापरण्यासारखा.

भयंकर=भीति उत्पन्न करणारा.

रान = जंगल. ज्यांत लहान लहान झुडपें असतात त्या भूमिभागास रान म्हणतात. ज्यांत झाडें साधारण मोठीं आणि निबिड असतात त्या भागास झाडी म्हणतात. अशा झाडींत पशु-पक्षी शब्द करीत असले आणि माणसें वावरत नसलीं तर तीस किर्र झाडी म्हणतात.

गाळण उडाली = भयाभीत झाला, जागच्याजागीं विरमला.

सावकाश = पुष्कळ वेळ, हळू हळू.

लांडगा = एक जंगली जनावर, हें मोठ्या कुत्र्याएवढें असतें. तोटा = नुकसान, कमीपणा.

---

## धडा १९ वा.

## रामदास स्वामी.

१०५ रामदास स्वामी हे साधु होते. स्वामी म्हणजे संन्यासी. ह्यांनीं कांहीं संन्यास केला नव्हता, तथापि हे आजन्म ब्रह्मचारीच राहिले, म्हणून ह्यांना स्वामी म्हणत असत. संन्यास हा एक आश्रम आहे. असे एकंदर ४ आश्रम आहेत. ते हे-ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, आणि संन्यास. संन्याशी लोक दंड-कमंडलु बाळगतात. शेंडी किंवा जानवें ठेवीत नाहींत. भगवीं वस्त्रें नेसतात आणि एकटे राहतात.

१०६ रामदास स्वामींना होऊन सुमारें ३०० वर्षें

झालीं. ज्या शिवाजीमहाराजांनीं मराठी राज्याची स्थापना केली, त्यांचे हे गुरु होते. ह्याच स्वामींनीं मराठी राज्यांत भगवा झेंडा आणि जोहाराऐवजीं रामराम म्हणण्याची चाल सुरू केली असें म्हणतात. यांस समर्थ असेंही म्हणत असत. ह्यांनीं एक भक्तीचा सांप्रदाय चालू केला. त्यांस रामदासी म्हणतात. ह्यांचा मुख्य मठ चांफळ येथें आहे. त्यांचे वंशज हल्लीं त्यांच्या गादीवर आहेत. ह्या सांप्रदायांत श्रीरामाची आणि मारुतीची उपासना असते.

१०७ शिष्यांनीं ऊस खाल्ले ते रामदास स्वामींनीं कांहीं त्यांस खाण्यास सांगितलें नव्हतें. पण त्या शिष्यांनीं चोरीचें काम केलें म्हणून गुरूला नुसत्या त्यांच्या संसर्गानेंही मार खावा लागला. ह्याकरितां वाईट मुलांची संगतीसुद्धां उपयोगी नाहीं. दारूच्या गुत्त्यावरून एकाद्या पेल्यांतून दूध नेलें तरी लोकांना दारूचा संशय येतो. अमुक मनुष्य अमक्याच्या संगतींत राहतो एवढें समजलें तर तो कसा असेल याचें अनुमान करितां येतें. म्हणून वाईट माणसांची संगति करूं नये, आणि त्यांच्या शेजारासही राहूं नये.

१०८ रामदासांना आपला अपराध कबूल होता म्हणून ते कांहीं बोलले नाहींत. नाहीं तर त्यांनीं आपल्या शिष्यांकरवीं ऊस खाऊन त्या शेतकऱ्यासच उलट चोप दिला असता. रामदास राजगुरु म्हणूनही त्या शेतकऱ्यावर रागावले नाहींत. म्हणजे शहाणे लोक दुसऱ्याच्या

जिवावर आपलें बळ दाखवीत नाहींत. असें करणें बाय-कांना कदाचित् शोभतें.

१०९ मोठे उदार मनाचे लोक ज्यांना सगळें जग आपल्या कुटुंबासारखें वाटत असतें ते अपकाराची देखील फेड उपकारांनीं करितात, असें रामदासांनीं आपल्या उदाहरणावरून दाखविलें.

इनाम-- बखशीस, बक्षीस शेत. इनाम करून द्यायचें म्हणजे त्या शेताची मालकी द्यावयाची आणि त्यावरचा सरकार साराही सोडून द्यायचा.

नवल-चमत्कार, आश्चर्य.

रडूं कोसळलें = रडें फुटून निघालें. घर कोसळलें म्हणजे एकाएकीं चोहींकडून मोडून पडलें.

धन्य = ज्यानें आपलें कर्तव्य केलें आहे असा, कृतकृत्य, प्रशंसेस योग्य, सभाग्य.

---

## धडा २० वा.

## दीनांची कींव करा.

११० सदु = सदाशिवाचा संक्षेप, सदाशिव हें महादेवाचें नांव आहे. महादेवाचें चित्र तुम्हीं पाहिलें असेल. त्याला शिव असेंही म्हणतात. महादेवाची सर्व लोक पूजा करितात. विशेषतः ब्राह्मण. पण त्याची मूर्ती क्वचित् असते. मंदिरांतून लांबट गोल अंड्याचे आकृतीचे पाषाण शाळुंकेंत बसविलेले असतात, त्यांस बाण किंवा लिंग म्हणतात. लिंग

म्हणजे चिन्ह. बाणाचे दोन प्रकार आहेत. एक नार्मदेय म्हणजे नर्मदा नदींत अमरकंटक पहाडाखालीं सांपडलेले आणि दुसरे स्फटिक. हे हिमालयांत वर्फ फोडून काढितात. पहिल्या प्रकारचे बाणच बहुधा सर्वत्र असतात. दुसऱ्या प्रकारचा म्हणजे स्फटिकाचा बाण उज्जनीस पिशाचमुक्तेश्वर घाटावर आहे. त्याची स्थापना शेवटचे बाजीराव पेशवे यांचे कन्येनें केली. नर्मदेच्या बाणाविषयीं एक म्हण पडली आहे कीं, “ नर्मदाके कंकर सबही शंकर ” म्हणजे मोठ्या घरचें सगळेंच मोठें, कुत्रें सुद्धां मोठें.

१११ महादेवाचीं मुख्य स्थानें १२ आहेत. त्यांस ज्योतिर्लिंगें म्हणतात. ह्यांतही हिमालयांतील केदार, काशीचे विश्वेश्वर, उज्जनीचे महाकाल, आणि ओंकारेश्वराचे ओंकारनाथ हीं स्थानें विशेष प्रसिद्ध आहेत. मेवाडांतील कांकरोली येथील एक लिंगाचें स्थान आणि नेपाळांतील पशुपति हीं स्थानेंही त्या त्या देशांत फार प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय आहेत.

११२ कित्येक लोक महादेवाचा नित्य पार्थिव [ मातीचा ] बाण करून त्याची पूजा करीत असतात.

११३ महादेवाच्या बायकोचें नांव पार्वती, त्याचे दोन मुलगे आहेत - १ गणपति आणि दुसरा स्कंद. महादेवाचें वाहन बैल, आयुध त्रिशूळ आणि अस्त्र पाशुपत आहे.

११४ निळू-निळकंठाचा संक्षेप; हें सुद्धां महादेवाचें नांव

आहे. एकदां महादेव हालाहाल विष प्याले. तें त्यांच्या गळ्यांतून उतरतांना त्याच्या रंगानें त्यांचा गळा निळा पडला म्हणून त्यांस नीळकंठ म्हणूं लागले. निळोबा नांवाचे एक प्रसिद्ध साधु होऊन गेले. त्यांनीं पुष्कळ अभंग केले आहेत.

दीन = गरीब, अनाथ, निराश्रित.

केवीलवाणें = दीनवाणें, कींव उत्पन्न करणारें.

संतोष = तृप्ति.

कल्याण = बरें.

हकीकत = वर्तमान, इतिहास. 'फारशींत हकीकतचा' अर्थ 'वास्तविक' 'वस्तुतः' असा आहे.

---

## धडा २१ वा.

## देवाचा थोरपणा.

नाठविसि = न आठविसि, आठवण करीत नाहींस.

कृपाळू = कृपावंत, दया करणारा.

देव = परमेश्वर.

जग = जगत्, दुनिया, विश्व.

एकला = एकटा.

तरु = झाड, वर = श्रेष्ठ, तरुवर = मोठें झाड.

मास = महिना.

जीवन = पाणी.

तयासि = तयाप्रति, त्याला.

दुग्ध = दूध.

उत्पत्ति = पैदास, उपज.

सवे = लागलेंच, बरोबर, एकदम.

दोन्ही = दोघांना, बाळाला आणि दुधालाही.

श्रीपति = लक्ष्मीपति, लक्ष्मीचा नवरा.

विश्वंभर = विश्वाला पोसणारा.

निरंतर = अंतर न करितां, सतत, नेहमीं.

ध्यान = उपासना.

आपुलिया = आपल्या.

बळ = शक्ति.

सखा = मित्र.

वाचा = बोलणें, वाणी.

साळुंकी=एका पक्ष्याचें नांव.

मंजुळ = गोड, मधुर.

वाणी = भाषण.

धणी = मालक.

वेगळा = निराळा.

पामर = हलकट, मूर्ख, नीच, सामान्य मनुष्य.

उत्तर = परोपरीचें भाषण.

कळा = कौशल्य, चातुर्य.

पांगूळा=पांगळा, पायांनीं ज्यास चलतां येत नाहीं तो.

११५ ह्या धड्यांत तुकारामाचे अभंग दिले आहेत. अभंग हें एका छंदाचें नांव आहे.

११६ तुकाराम एक साधु होता. त्यास होऊन आतां सुमारें ३०० वर्षें झालीं. त्यानें पुष्कळ अभंग केले आहेत.

३।४ अभंगांचें एक एक पद्य, ( किंवा ३।४ चरणांचा एक अभंग ) करून त्यांत शेवटच्या अभंगांत किंवा चरणांत त्यानें आपलें नांव खुणेसाठीं ठेविलें आहे. पंढरपुरास आषाढी आणि कार्तिकी एकादशीला दर वर्षीं मोठी यात्रा भरते. तींत वारकरी पंथाचे लोक " ज्ञानोबा तुकाराम, ज्ञानदेव तुकाराम " असें भजन टाळ वाजवीत मोठ्या प्रेमानें करीत असतात. हे तुकाराम मानवी शरिरासकट स्वर्गास गेले असें म्हणतात.

११७ ह्या धड्यांत दोन पद्यांत परमेश्वराचें वर्णन केलें आहे. पहिल्यांत त्याच्या पोषणशक्तीचें, आणि दुसऱ्यांत त्याच्या चातुर्याचें.

अभंग १.

दयाळू परमेश्वराला कारे तूं आठवीत नाहींस ? तो एकटा जगाला पोषितो. उन्हाळ्याच्या दिवसांत मोठाल्या झाडांना पालवी फुटते ती ओलाव्यामुळें. हा ओलावा त्यांला कोण देतो ? मूल जन्मतें तेव्हां त्याच्या आईच्या स्तनांला दूध एकाएकीं येऊं लागतें. मूल वाढत जातें तसतसें त्याला लागणारें दूधही वाढत जातें. हीं दोन्ही-मुलाला वाढवणें, आणि त्याचें भक्ष्यही लगेच वाढवणें कोण करितो ? हें सर्व तो जगताला पोसणारा परमेश्वर करितो. तो असा दयाळू आहे म्हणून त्यास निरंतर आठवावें.

आपण बोलतों तें आपल्या शक्तीनें नव्हे. ही त्या देवाची कृपा आहे. सांळुकी पक्षी मधुर बोलतो, तें त्याकडून बोलवणारा मालक निराळाच आहे. मज छोट्याशा

माणसाला परोपरीनें बोलण्याची शक्ति कोठें आहे ? पण त्या परमेश्वरानें मजकडून बोलविलें. त्या परमेश्वराचें चातुर्य किती अगाध आहे तें कोणाला ठाऊक ! तो पांगळ्याला पायां वांचूनही वागवितो.

---

## धडा २२ वा.

## सबक्तगीन.

पाडस=हरणाचें बच्चें.

११८ पैगंबर=पैगाम=संदेश. बर=आणणारा, नेणारा; पैगंबर=देवाचा संदेश आणणारा. महंमद पैगंबर यांनींच कुरान ग्रंथ लिहिला. त्यांना स्वतः फारसें लिहितां वाचतां येत नसे म्हणून कुरान त्यांनीं लिहिलें म्हणण्यापेक्षां देवानें तें त्यांचेकडून लिहविलें असें म्हणण्याचा परिपाठ आहे. कुरान हा हिंदु लोकांच्या वेदांप्रमाणें मुसलमानांचा देवदत्त धर्मग्रंथ आहे. कुरान वेदासारखाच स्वरांवर म्हणावा लागतो आणि त्यावर टीका हरुन-अल-रशीद यांच्या मुलीनें केली आहे असें म्हणतात.

११९ राजांच्या तीन श्रेणी आहेत.—

राजा किंवा सुलतान.

महाराजा किंवा शाह.

सम्राट्, चक्रवर्ति किंवा पादशाह.

१२० सबक्तगिनानें हरिणीवर दया केली, त्याचें त्यास उत्तम बक्षिस मिळालें. स्वप्नावर कोणी भरंवसा ठेवीत नाहींत; पण सबक्तगिनाचें स्वप्न खरें झालें, म्हणून ही गोष्ट त्यानें प्रसिद्धीस आणिली असावी.

१२१ वारसा=मालकी, सत्ता. वारसा जन्मसिद्ध असतो किंवा पुढें नात्यानें येतो. कोणी जन्मसिद्ध किंवा नात्यानें वारस झालेला नसेल तेव्हां कोणासही आपल्या इच्छेनुरूप वाग्दानानें आपला वारस करितां येतो. गझनीच्या सुलतानानें सबक्तगिनास ह्या तिसऱ्या प्रकारानें वारस केलें होतें.

---

## धडा २३ वा.

## छानदार घर.

छानदार=शानदार=शोभिवंत.

१२२ खरवस=गाईचें किंवा म्हशीचें दूध नासवून खरवस करितात. विशेषतः=ती विते तेव्हां पहिल्या ३ दिवसांतील दूध ह्या कामीं आणितात.

जोगतें=जोगें, योग्य.

१२३ ‘ पण ’ हा शब्द गुजराथींत ‘ ही ’ ‘ देखील ’ ह्या अर्थी वापरतात. सामान्यतः पण ह्याचा अर्थ परंतु असा आहे. उदाहरण—

१ मी होतों, तो पण होता ( देखील ).

२ मी होतों, पण तो नव्हता ( परंतु ).

चटदिशीं=चटकर, पटदिशीं, पटकन.

सांपळा=कोंडण्याचा पिंजरा.

१२४ ह्या धड्यावरून तुम्हांला हें शिकायचें आहे कीं, स्वतः अनुभव घेतल्याशिवाय किंवा परीक्षा केल्याशिवाय किंवा ज्यास अनुभव आणि परीक्षा आहे अशा एकाद्या

मनुष्याची सल्ला घेतल्याशिवाय एकाद्यावर नुसतें त्याच्या बाहेरच्या देखाव्यावरून तुम्हीं भुलून जाऊं नये; व कांहीं करूं लागूं नये.

१२५ तुम्हांला एकाद्या अपरिचित मनुष्यानें कांहीं खाण्यास दिलें तर तें तुम्हीं कधीं खाऊं नये. आपल्या वडिलांस तें नेऊन द्यावें आणि ते आज्ञा देतील तर खावें. तुम्हांला अशा कोणी मनुष्यानें तमाशा पाहण्यास, बाजार पाहण्यास बोलावलें तर जाऊं नये. त्यानें कपडे दिले तर घालूं नयेत. तुम्हांला ज्याचा भरंवसा नाहीं, ज्याशीं चांगली ओळख नाहीं तो कांहींही सांगेल तें आपला भरंवसा पटल्याशिवाय करूं नये.

---

## धडा २४ वा.

### साप आणि मुंग्या.

१२६. सापाला फणा नसते. ज्यास फणा असते त्यास नाग म्हणतात. सर्पांच्या आणि नागांच्या अनेक जाती आहेत. ह्यांचे पाय बाहेर दिसत नाहींत, आणि कानांचें काम हे डोळ्यांनीं करीत असतात म्हणून ह्यांस चक्षुश्रवा म्हणतात. सर्पांचा राजा शेष आहे. तो खालीं पाताळांत राहतो आणि त्याच्या डोकीवर ही पृथिवी आहे. ह्या शेषास १००० फणा आहेत अशी पुराणांत कथा आहे. सर्पाच्या दाढेंत विषाची पिशवी असते. तो प्रथम चावतो आणि मग तेथें त्या पिशवींतलें विष ओतितो.

पण कांहीं सर्प विषारी नसतात. सर्पाच्या आंगावर प्रतिवर्षीं कात येते. ती आली म्हणजे तींत तो कांहीं दिवस पडून राहतो आणि मग ती कात फोडून बाहेर पडतो. तेव्हां त्यास पुनः चांगली नवी टवटवी आणि शक्ति येते. कांहीं नागांच्या मस्तकांत मणी असतात आणि रात्रीचे ते चकाकतात अशी आख्यायिका आहे. नाग शब्द हत्तीचाही वाचक आहे आणि कांहीं गजेंद्रांच्याही डोकींत असे मणी असतात अशी समज आहे. सर्पांचें वैर प्रसिद्ध आहे. त्यांस कोणीं अपाय केलेला ते कधीं विसरत नाहींत. म्हणून लोक एक तर त्यास सतवीत नाहींत आणि सतविलें तर मग त्यास जिवंत सोडीत नाहींत. त्याचें तोंड उघडून त्यांत जर एक तपकिरीची चिमटी टाकली तर तो तत्काळ मरतो. ह्याप्रमाणें त्यास मारून त्याच्या आंगाच्या पिशव्या व इतर जिन्नस करण्याचे अलीकडे कारखाने निघाले आहेत. गरुड पक्ष्याचें आणि सर्पाचें हाडवैर असतें. सर्पांचे खेळ करणारे लोकांना गारुडी म्हणतात. ते सर्पाला युक्तीनें धरून त्याची ती विषदाढा काढून टाकितात. ती काढिल्यावर सर्पाच्या चावण्याची भीति रहात नाहीं. सर्पाचें आणि मुंगुसाचेंही हाडवैर असतें. तें जन्मतःच मांजर आणि उंदीर यांच्या वैराप्रमाणें असतें. मुंगूस सर्पाला मारून टाकितें. पण मुंगुसाला सर्प कितीही चावला तरी तें मरूं नये, अशी कांहीं योजना त्याच्या शरिरांत ईश्वरानें ठेविली आहे. कोणी म्हणतात कीं, त्यास विषघ्न वनस्पति माहीत आहे, तिचा तें अशा प्रसंगीं उपयोग करितें.

१२७ भिंतीवर कांचांचे तुकडे घालितात ते ह्याकारितां कीं त्यांवरून मनुष्यांस चढतां येऊं नये.

वेदना = दुःख.

कडकडून = सर्व कडांनीं, सर्व बाजूंनीं, पण कडकडीत ह्याचा अर्थ निखालस असा आहे. जसें कडकडीत एकादशी.

तुटून पडल्या = हल्ला केला.

गडबडां = वरखालीं.

झोंबणें = आंवळून धरणें, लटकणें.

१२८ ह्या धड्यापासून आपल्याला दोन गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

१ उद्धटपणें, दांडगाईनें वागूं नये.

२ शक्तीपेक्षां युक्तीनेंच काम अधिक होतें.

सर्प जो मुंग्यांवरून सरपटत गेला तो कांहीं त्यांला दुखवण्याकरितां नव्हे. पण त्याच्या उद्धटपणामुळें, दांडगाईमुळें, मुंग्यांना त्रास झाला. त्यानें आपल्या उन्मादांत त्यांच्याकडे कांहीं पाहिलें नाहीं. त्याचें फळ त्यास मिळालें तें ह्या धड्यांत सांगितलेंच आहे. म्हणून आपण दांडगाईनें लोकांच्या सुखदुःखांविषयीं बेपरवा राहून वागूं नये.

मुंग्या क्षुद्र प्राणी आणि सर्प म्हणजे त्यांना एक पर्वताची रांगच तरी त्याचें आपण काय करणार असें मनांत आणून मुंग्या त्याचा अपकार विसरून गेल्या नाहींत. तरी त्यांनीं आपल्या शक्तीस तो जड असें जाणून उगीच

 पुणे ... २० ... पेठ, पुणे २

त्याशीं विरोध करून आणखी आपला नाशही करून घेतला नाहीं. आपला डाव केव्हां लागेल ह्या पाळतीवर त्या राहिल्या. आणि जेव्हां त्यांच्या सामर्थ्याचा काल आल्याचें त्यांनीं पाहिलें, तेव्हां आपला सूड उगविला. तरी आपल्याला कोणीं दुष्टानें विनाकारण त्रास देऊं नये, अशी आपली इच्छा असेल तर आपण त्याशीं संगतीचा प्रसंगच येऊं देऊं नये. पण जर त्यानें होऊन अपाय पोंहचविलाच तर त्याचा प्रतिकार केल्यावांचूनही राहूं नये. पण प्रतिकार करतांना आपलें बळ आणि काळ यांकडे अवश्य दृष्टि द्यावी. दगडाशीं झुंजून आपलेंच डोकें फोडून घेऊं नये.

आणखीही एक गोष्ट ह्या धड्यापासून शिकण्यासारखी आहे. ती ही कीं, आपल्या शेजाऱ्याला आणि आपल्या जातीला संकटसमयीं आपण मदत करावी. पहा, मुंग्या सगळ्या मिळून जर त्या सापावर तुटून पडल्या नसत्या तर दोन चार किंवा दहापांच मुंग्यांकडून सापाचें कांहीं झालें नसतें. जुटीनें मोठीं कामेंही पार पाडतां येतात.

---

## धडा २५ वा.

## हावरा कुणबी.

हावरा=आधाशी.

काळ=दिवस. सुकाळ-चांगले दिवस. दुकाळ-वाईट दिवस.

१२९ सुकाळ किंवा दुष्काळ आपल्या देशांत पुष्कळ अंशीं पावसावर अवलंबून आहे. पाऊस वक्तशीर, बेताचा पडला तर धान्यें चांगलीं उगवतात, व धान्यें आणि पाणी

मुबलक असतें. तो जर अनियमितपणें, पाहिजे त्याहून कमी पडला तर धान्यें उगवत नाहींत व खावयास धान्य मिळत नाहीं आणि पिण्यास पाणीही मिळत नाहीं. पाऊस जर मनस्वी पडला तर धान्यें पेरण्यास वेळ मिळत नाहीं किंवा पेरलेलीं धान्यें गळून जातात. अशा वेळीं पिण्यास पाणी मुबलक असतें पण खावयास धान्य मिळत नाहीं.

सुकादुष्काळ—हा पाऊस न पडल्यामुळें किंवा फार थोडा पडल्यामुळें होतो. ओला दुष्काळ पाऊस फार पडून होतो.

१३० वरुण ही पाण्याची देवता. हिंदु लोकांत निरनिराळ्या जिनसेच्या निरानिराळ्या देवता आहेत. जसें, धान्याची देवता कुबेर, अन्नाची देवता अन्नपूर्णा, औषधींची सोम किंवा चंद्रमा, अग्नीची सूर्य, मृत्यूची यम इ०. त्या देवतांची आराधना केली म्हणजे त्या प्रसन्न होऊन ती ती जिन्नस देतात किंवा तिजसंबंधाचें भय-दुःखनिवारण करितात.

प्रार्थना=मागणी मागणें, येथें हा शब्द स्तुति ह्या अर्थीं आहे.

झरा=उकाळा. जमिनींतून पाणी झरून त्याची धार बनते आणि ती वाहूं लागते त्यास झरा म्हणतात.

लोंढा=पूर.

शेत पिकेल=येथें शेत म्हणजे शेतांतील धान्य. पिकणें ह्याचा क्वचित् अर्थ पांढरें होणें असाही होतो. जसें “ केस

पिकणें " आणखी पिकणें म्ह० समृद्धि येणें, चंगळ होणें, जसें " त्याचें आतांशा चांगलें पिकलें आहे."

आदळली=आपटली, जोरानें पटकली.

१३१ आपल्याला आवश्यक तेवढेंच मिळविण्याचा आपण प्रयत्न करावा. ज्यापासून आपल्या स्वतःवर किंवा आपल्या कुटुंबावर संकट येईल असें कांहीं मागूं नये, किंवा मिळविण्याचा प्रयत्न करूं नये. काशींत एक आख्यायिका प्रसिद्ध आहे कीं, पेशव्यांचे एका उपाध्यानें एकदां त्यांच्या करमणुकीकरितां रुपयांनीं स्नान करणें पतकरलें. तेव्हां रुपयांच्या घागरी भटजी बुवांच्या डोक्यावर ओतण्यांत आल्या. रुपयांची धार त्यांच्या डोकीवर जखम करूं लागली असतांही द्रव्यलोभानें ते कांहीं बोलले नाहींत. शेवटीं एवढा मार बसला आणि डोक्याला जखम झाली कीं ते बेशुद्ध होऊन पडले आणि थोडेच दिवस आजारी राहून शेवटीं मेले. ह्याप्रकारें त्यांनीं द्रव्य पुष्कळ मिळविलें खरें पण त्यापायीं त्यांचे प्राण गेले.

---

## धडा २६ वा.

### कावळ्याची युक्ति.

पण फुकट—परंतु निरर्थक गेले.

युक्ति लढविली-लढवणें ह्याचा अर्थ भांडवणें असा आहे.

युक्ति=योजना. आपल्या प्रतिस्पर्ध्यास जेरीस आणण्यास कुस्तीबाजाला जसे अनेक डावपेंच करावे लागतात, तसें एकाद्या कार्याच्या सिद्धीकरितां जेव्हां अनेक युक्त्या करा-

ण्या लागतात, तेव्हां त्या करण्याला युक्ति लढवणें म्हणतात.

धूर्त=युक्तिवान्.

१३२ प्रत्येक जातींत कांहीं प्राणी धूर्त म्हणून नांवाजलेले आहेत. जसें, पक्ष्यांत कावळा, जनावरांत कोल्हें, हलक्या पेशांच्या लोकांत न्हावी वगैरे.

१३३ आपल्याला कोणचेंही कार्य साधायचें तर तें नेहमीं एकाच युक्तीनें साधेल असें नाहीं. तरी त्याकरितां अनेक युक्त्या योजाव्या म्हणजे एकादी तरी साधते. पण नीच अयोग्य अशी कोणचीही युक्ति करूं नये; आणि आपल्या कार्य साधण्याचें जें मूळ कारण तें कायम राखून होईल तितकें कार्य साधावें. त्याचा नाश करूं नये. ह्या धड्यांत कावळ्यानें तें मडकें फोडून पाणी वाहवण्याचा प्रयत्न केला नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याची आहे.

---

## धडा २७ वा.

## शाळूचा हंगाम.

१३४ शाळू—शीत शब्दाचें प्राकृत रूप शी, शीय असें आहे. ह्या शब्दापासून शियाळू व शाळू असें रूप झालें असावें. शाळू म्हणजे शीत काळांत येणारीं धान्यें आणि उन्हाळू म्हणजे उन्हाळ्यांत येणारीं धान्यें. फारसींत शाळूस रबी आणि उन्हाळूस खरीफ म्हणतात. उन्हाळू म्हणून

ज्यांस म्हणतात तीं वस्तुतः पावसाळ्यांत येतात, तथापि उन्हाळ्यांत त्यांचा आरंभ होत असतो म्हणून त्यांस उन्हाळू असें नांव पडलें आहे.

हंगाम=मोसम, वेळ. जसें, कापणीचा हंगाम, पेरणीचा हंगाम इ०.कांहीं कामांचे ठरींव वेळ असतात त्यांस हंगाम म्हणतात. जसें, धान्य खरीदीचा हंगाम, लाट साहेबांचा सिमल्यास राहण्याचा हंगाम, इ०.

ताटें=धान्याच्या काठ्या. धान्य कापून घेतल्यावर नुसत्या काठ्या राहतात त्यांस कडबा म्हणतात.

गडी=कामकरी नोकर. किती एक गडी असले म्हणजे ‘ गडी माणसें ’ असें म्हणतात. गडी, संवगडी ह्याचा अर्थ—बरोबर खेळणारे, मित्र असाही होतो.

१३५ चव्हाण, गावडा, पवार इ० आडनांवें आहेत. आडनांवानें घराणें ओळखतां येतें. आडनांवें कांहीं कारणांनीं पडलेलीं असतात. कांहीं गांवांच्या नांवांवरून पडतात, आणि कांहीं धंद्यावरूनही पडतात. कांहीं फार जुनीं आडनांवें आहेत आणि कांहीं अगदीं नवीं आहेत. जसें, घांसवाला, बाटलीवाला, रेडीमनी, श्राफ इ०. हीं नांवें उघड नवीं आहेत.

कारणावरून पडलेलीं नांवें—मोदी, फडके, फाळके, रास्ते इ०.

गांवांच्या नांवावरून पडलेलीं—भाटवडेकर, तळेंकर, मुधोळकर इ०.

धंद्यावरून पडलेलीं—कात्रे, चित्रे, भाटे, डबीर, पारसनीस, मुजूमदार, कुळकर्णी, देशमुख, देशपांडे इ०.

ब्राह्मण आणि मराठे यांचीं आडनांवें लावण्याची चाल बरीच जुनी दिसते. अलीकडे इतर लोकही आपलीं आडनांवें शोधून काढून आपल्या नांवापुढें लावूं लागले आहेत. इंग्रज लोक प्रायशः आडनांवानेंच ज्यास्त प्रसिद्ध असतात. आपण साहेब लोकांचीं नांवें ऐकतों तीं वस्तुतः त्यांच्या घराण्यांचीं नांवें असतात. मुसलमान लोकांत आडनांवें लावण्याची चाल फार विरळ आहे.

१३६ आडनांवाला हिंदी भाषेंत गोत म्हणजे ( गोत्र ) म्हणतात. राजपुतान्यांतील रजपूत राजांचे जे असे गोत आहेत त्यांच्या कितीएक कथा इतिहासांत प्रसिद्ध आहेत. जसें, शिसोदिये, राठोड, चौहान, परमार, साळुंकी इ०. हे रजपूत आणि दक्षिणेंतील मराठे यांच्या कितीएक गोत्रांत सादृश्य आहे. कितीएक आडनांवें मराठ्यांचीं आणि ब्राह्मणांचींही एक आहेत. जसें, फाळके.

१३७ शेतकरी लोक सकाळींच थोडेंसें खाऊन बाहेर पडतात. त्या खाण्यास न्याहारी म्हणतात. दुपारीं सैंपाक झाला म्हणजे शेतकऱ्याची बायको किंवा दुसरें कोणीं जीं माणसें शेतावर काम करीत असतात त्यांसाठीं शेतावर भाकरी घेऊन येतो. शेतकरी ती खाऊन घटकाभर स्वस्थ होतो आणि पुनः कामास लागतो.

जेवण = अन्न – जेवणाचा पदार्थ, भोजन. जेवणखाण, गांवजेवण, डोहोळेजेवण;

ह्यांतले ‘ जेवण ’ शब्दाचे प्रयोग
लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत.

१३८ आंग धुणें आणि आंघोळ करणें एकच आहे. पण पहिला शब्द बहुत करून बायकांनीं आणि दुसरा शब्द पुरुषांनीं वापरण्याची चाल आहे. स्नान करणें हें संस्कृत रूप आहे. पाण्यांत डुबून स्नान करणें सर्वांत उत्तम स्नान आहे.

झुणका – कांदे, लसूण, तिखट, तेल, थोडें बेसन घालून भाजून केलेले मिश्रणास झुणका म्हणतात.

चटणी – चाटणाचे पदार्थ बोटांनीं चाटून खायचे असतात. ‘ चाटण ’ चें चाटणी, चटणी, झालें. चटणी-बरोबरचें तें रायतें, लोणचें, आणि कोशिंबीर. रायतें शब्द हिंदी आहे. राई ( मोहोरी ) घातलेलें तें रायतें; आणि लोण (क्षार) घातलेलें तें लोणचें. पण कोशिंबीर शब्दाची उपपत्ति कळत नाहीं. हीं सगळीं भाजीच्या खालच्या दर्ज्याचीं तोंडीं लावणीं आहेत.

१३९ हिंदूंच्या अन्नांत बहुधा ३ प्रकार असतात.– ( १ ) मुख्य अन्न, जसें भात भाकरी इ०; ( २ ) कालवण– वरण, कढी, आमटी, दूध, दहीं, तूप, इ०; ( ३ ) तोंडीं लावणीं– ह्यांत भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, लोणचीं, पापड, कुर्डया, भजीं, इ० येतात.

चाखणें – रुचि पहाणें, स्वाद पहाणें इ०.

चाखली नव्हती–चाखण्याइतकी देखील खाल्ली नव्हती.

खरपूस – चांगला लाल होई असा. भाकर खरपूस भाजली. 'त्यानें त्याचा खरपूस समाचार घेतला '= आंग चांगलें लाल होई तों मारिलें, किंवा चांगला संताप येईसें बोलला.

शेतकरी लोक बहुधा खावयाचें तें एकदां खाऊन घेतात आणि मग एकदांच पाणी पितात. साधारणपणें उत्तम प्रकार जेवणाचे मध्यें पाणी पिण्याचा आहे.

शाळू उपटून टाकूं=शेतांतील ताटें उपटून टाकूं. शाळू हें जोधळ्यांचेंही वाचक आहे. कांहीं ताटें अशीं असतात कीं, त्यांचीं कणसें कापून घेतां येतात. कांहींना उपटून काढावें लागतें.

१४० खूष—हा शब्द फारसी भाषेचा 'खुश' असा आहे. त्याचा अर्थ आनंदित, हर्षित. खुश शब्दाशीं संयुक्त असा एक ' खुशाल ' शब्द मराठींत आहे. तो मूळचा ' खुश हाल ' असा आहे. ह्याचा अर्थ ज्याचा काळ चांगला आहे तो. आपलेकडे ' खुशाल ' म्हणजे क्षेम कुशलसंपन्न असें समजतात. पण ' कुशल ' शब्दाशीं ह्याचा कांहीं संबंध नाहीं.

१४१ पुरणपोळी—पुरण म्हणजे भरण. पोळीच्या आंत कांहीं जिन्नस भरून केलेली जी पोळी ती पुरणपोळी. पुरणाच्या पाटल्या म्हणजे वर सोन्याचा पत्रा आणि आंत शिसें, रेशिम किंवा दुसरें कांहीं भरतीस घालून केलेल्या पाटल्या. दक्षिणेंत नुसत्या ' पोळी ' शब्दानेंही पुरणपो-

ळीचा अर्थ समजला जातो. जसें, आज पोळीचें जेवण होतें.

१४२ पोळ्यांत अनेक प्रकारचीं पुरणें घालितात. तरी पुरण शब्दानें सामान्यतः चण्याची डाळ शिजवून तींत गूळ किंवा साखर मिळवून वाटून गोळा करितात, तो समजण्याची आहे. चण्याच्या डाळींत गूळ मिळवायाचा तो डाळ शिजवतांनाच घालितात. साखर डाळ वाटतांना तींत मिळवितात. पोळ्या नुसत्या गूळ घालूनही करितात. त्या गुळाच्या पोळया; आणि तूप साखर आणि थोडें सपिठ मिळवून केलेल्या त्या साखरेच्या पोळया. ह्याचप्रमाणें सांज्याच्या पोळया, खोब्याच्या पोळया इ०. दक्षिणेंत पुरणपोळयांना उत्तम पक्वान्न म्हणून मान आहे. तो उत्तम गुळामुळें आहे. तसा गूळ उत्तर हिंदुस्तानांत नाहीं म्हणून तिकडे पुरणपोळयांचें नांवही कोणास माहीत नाहीं.

१४३ ह्या धड्यांत रामजी चव्हाण आणि त्यांचीं मुलें स्वतः गड्यांबरोबर शेतांत खपत होतीं. तसेंच चव्हाणांचे घरून अन्न आलें तें गडीमाणसांसकट सर्वांनींच कांहीं पंक्तिप्रपंच न करितां एकेजागीं बसून खाल्लें. ह्या गोष्टी ध्यानांत ठेवण्याच्या आहेत. गडी इतकें मन लावून खपत होते आणि चव्हाणाला शेतीपासून जो इतका चांगला नफा झाला ह्याचें कारण रामजी चव्हाणाचा मनमिळाऊपणा होय.

# धडा २८ वा.

## शाळूचा हंगाम.

गाडी जुंपली, गाडी जोतली = गाडीला बैल जुंपले.

खळें=तांटें सुकविण्याची आणि कणसांतून दाणे वेगळे करण्याची जागा.

पेर = ढेर, ढीग पसरलेला.

मळणी = कणसें मळून चोळून दाणे काढणें.

पात = बरोबर जुंपलेल्या बैलांची रांग.

तिवडा = खळयाच्या मध्यभागींचा खांब.

वावडी = तिपाई घडवंची.

मदन = भुसकुटासहित धान्य.

टोपली = पांटी.

वावडणें =वाऱ्यांत उडवणें, ह्यायोगें भुसकटापासून धान्य वेगळें होतें.

रास = राशी. ढीग.

सांज = संध्याकाळचा वाचक गांवठी शब्द. सांज-ह्या शब्दापुढें सकाळ शब्द आला म्हणजे त्याचा अर्थ " आजउद्यां " असा होतो.

मापूं लागला=मापट्यानें मोजूं लागला. दक्षिणेंत वजनाबरोबर मापांचाही पुष्कळ प्रघात आहे. गांवढ्यांतून तर मापटींच असतात.

रिचवणें = सांचवणें.

मातेरें = माती, केर, कचरा.

यंदा = ह्यावर्षी, यंदा हा शब्द आवंदा असाही लिहितात.

हातीं लागणें = पदरीं पडणें, प्राप्त होणें.

करुणा = दया.

---

## धडा २९ वा.

## भाताचा हंगाम.

अंगविक्षेप = आंग हालवणें.

भात = साळी.

पचंग बांधणें = पासोडी किंवा धोतर खांद्यावरून खाकेखालून छातीवर कंबरेपर्यंत बांधणें. पंच + अंग असें असावें.

खसा खसा = कापतांना शब्द होतो तो.

चूड = मूठ – भाताची एके जागीं केलेलीं दहा पंधरा रोपें.

झप झप = लवकर लवकर, भराभर.

उडवी = गरी, गंज.

पाळिंज = भुसकूट.

काम उडवून देणें = भराभर हाता निराळें करणें, संपवणें, शेवटास नेणें.

कडपी = पेंडी.

खपा = झटा, मेहेनतीनें करूं लागा.

कसून = झटून.

झोडणी = झापटणें, बडवणें.

बरकत = समृद्धि.

माचुंडा = पेंढी. भाताचें गवत ४।६ काड्यांनीं बांधितात तो.

वारवणें = वावडणें, वाऱ्यावर धरून ओतणें.

बहाद्दर = शूर. हा मुळचा बहादुर असा फारसी शब्द आहे.

१४४ ह्या धड्यांत ज्या कामाचें वर्णन आहे त्याला किती तरी अनुरूप शब्द आणि छंदरचना केलेली आहे. ती खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. ज्यांना शेती काय तें माहीत नाहीं किंवा ह्या धड्यांत वर्णिलेलें काम ज्यांनीं डोळ्यांनीं पाहिलें नाहीं त्यांला त्याची मौज वाटणार नाहीं, तरी त्यांला त्या कामाचें साधारण चित्र डोळयांपुढें उभें राहिल्याशिवाय राहणार नाहीं.

---

## धडा ३० वा.

### चेंडू.

वाट करणें = रस्ता देणें.

उशी घेतो = वर उडतो.

सावध = हुषार, जागता.

उसळणें = आपटला असतां वर उडून येणें, विखुरणें.

१४५ मिस = कुमारिका. हा इंग्रजी शब्द आहे. इंग्रजींत मुलाला मास्टर, मुलीला किंवा

अविवाहित स्त्रीला मिस, विवाहित स्त्रीला मिसेस आणि पुरुषाला मिस्टर या पदवींनें संबोधितात.

हें चेंडूचें पद्य सगळें हुबेहूब चेंडूच्या खेळाचें चित्रच दाखवितें आहे कीं काय असें वाटतें. इतकें तें उत्तम साधलें आहे.

---

## धडा ३१ वा.

### सृष्टिज्ञान.

१४६ रंगोपंत = ब्राह्मणांच्या नांवांपुढें पूर्वीं भट्ट, शर्मा, उपाध्याय, दीक्षित, वाजपेयी इ० शब्द लावीत असत. अलीकडे पंत, बा, जी, राय, राव, असे शब्द जोडूं लागले. पंत हा शब्द नेहमीं ओकारांत आणि क्वचित् इकारांत शब्दापुढें लावितात. जसें धोंडोपंत, मोरोपंत, हरिपंत इ०. केशवपंत, नारायणपंत असें म्हणत नाहींत. पण सखारामपंत, दामोदरपंत असें म्हणण्याची चाल आहे.

ह्याशिवाय बाबा, बुवा, बापू, भाऊ, भैया, तात्या, दादा, आपा, अण्णा, असेही आणखी शब्द जोडण्याची चाल आहे. जसें, रामचंद्र बाबा दिवाण, सखाराम बापू, जिवबा दादा, लखबा दादा, परशराम भाऊ, चिमाजी अपा, परशराम तात्या, विठोबा अण्णा इ०. आणखी ह्याही शब्दांपुढें साहेब असा एक शब्द असतोच. साहेब हा मुळचा फारसी

शब्द साहब =मालक असा आहे. युरोपियन लोकांची मंडळी म्हणावयाचें झालें तर ' साहेब लोक ' एवढेंच म्हणतात.

चांदवा = छत.

गोपू = 'गोपाळ' शब्दाचा संक्षेप. गोपाळ हा कृष्णाचा वाचक शब्द झाला आहे.

१४७ गरगरीत=गरगर—गोल चक्राकार परिभ्रमण. गरगरीत ह्याचा अर्थसुद्धां गोल, वाटोळा असाच आहे. अभिप्रतभावाचें ठासून वर्णन करायचें झालें तर त्याच्या वाचक शब्दापुढें त्याच अर्थाचा आणखी एक शब्द लावितात. जसें, लाल भडक, पांढर फटफटीत, कोरा करकरीत, काळा कुळकुळीत, हिरवा गार इ०.

पुनव = पौर्णिमा. बायका आणि अडाणी लोक पौर्णिमेला पुनव आणि अमावास्येला अंवस म्हणतात.

सोनी मुलीचें, आणि सोन्या मुलाचें नांव असतें. सोहोनी हें आडनांवही आहे.

१४८ आकाशांत सूर्य, चंद्र, तारे आणि ढग आपल्याला दिसतात. ह्या सर्वांत ढग आपल्याला फार जवळ आणि तारे फार दूर आहेत. आपल्याला हे तारे लहान दिसतात पण ते तेवढेच नाहींत. ते आपल्या सगळ्या पृथिवीहून फार फार मोठे आहेत. ते लांब असल्यामुळें आपल्याला एवढे लहान दिसतात. पुष्कळ ताऱ्यांचें अंतर विद्वान् लोकांनीं काढिलें आहे; पण त्यांची गणना कोणी करूं शकत नाहीं.

---

## धडा ३२ वा.

## पाऊस आणि पाणी.

पागोळ्या = वळचणी कौलांपासून पावसाच्या धारा पडतात त्यांस म्हणतात.

अंमळ=थोडा.

१४९ ढगांनीं सूर्य झांकिला. ढग सूर्याच्या आड आला असें आपली म्हणण्याची चाल आहे. वस्तुतः तो आपल्या दृष्टि आड येत असतो. कारण ढग इतके लहान आणि इतक्या फार अंतरावर आहेत कीं ते सूर्याला कधीं झांकूं शकत नाहींत.

१५० थेंब गळूं लागले = थेंब पडूं लागले. गळणें ह्याचा अर्थ थेंब थेंब पडणें असा आहे. जसें, तांब्या गळतो, गच्ची गळते, पागोळ्या गळूं लागल्या. गळणें ह्याचा अर्थ 'थकणें' 'निर्जीव होणें' असाही आहे. जसें "हाहा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला" पण गाळणें म्हणजे छानणें आणि गळ म्हणजे लोखंडाचा आंकडा.

लोंढा = एकदम जोरानें वाहून आलेला मोठा प्रवाह.'ओंढा' आणि 'लोंढा' ह्यांतील फरक लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

१५१ आजकाल पाऊस मोजण्याचे गलासानीं पाऊस किती झाला हें मोजितात. त्याचें प्रमाण १०० सेंटाचा १ इंच असें आहे. तुम्हीं असें म्हणतांना ऐकिलें असेल कीं, आज इतके इंच पाऊस झाला असेल. पाऊस मोजण्याच्या

रितीनें प्रत्येक देशाच्या साधारण पावसाचें प्रमाण ठरविलें आहे. त्यावरून त्या देशांत पाऊस पाहिजे किती हें समजून घेऊन जरूर तितका झाला कीं नाहीं हें पाहण्यास सांपडतें.

१५२ असें म्हणतात कीं, पूर्वीं पाऊस फार पडत असे. १०।१२ दिवस एक सारख्या झडी लागत. पण तसा प्रकार आतां नाहीं. फार तर २।३ दिवसांहून अधिक झड लागत नाहीं. असेंही म्हणतात कीं, उंच पर्वतावर पाऊस पुष्कळ पडतो, त्यापेक्षां मैदानांत कमी पडतो. तसेंच जेथें जंगल असतें त्या भागांत पाऊस अधिक पडतो. समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशालाही पावसाचें मान मोठें असतें. मुंबईस पाऊस शें-सवाशें इंच होतो, आणि माळव्यांत त्याचें साधारण प्रमाण ४० इंच आहे. मारवाडांत तर तो १०।१५ इंचच पडतो.

---

## धडा ३३ वा.

### ढेंपूळ, दगड, व रेती.

ढेंपूळ – ढेंकूळ, मातीचा मोठा खडा.

भुसभुशीत = ज्याचे कण एकास एक फार संघटित झाले नाहींत असा.

विरघळणें = कण विरणें—कण मोकळा होणें. शरमणें, अभिमान—गलित होणें. जसें—तो जागच्या जागीं विरघळला.

रुजणें = मूळ कायम होणें.

जोतें = घराच्या भिंती ज्या दगडी चौथऱ्यावर रचतात तो चौथरा.

वाळू = रेती.

१९३ शाई वाळण्यासाठीं वाळू घालणें = आजकाल वाळू घालण्याची चाल पसंत करीत नाहींत. आणि शाई पातळ असल्यामुळें त्यावर रेती कार्यही करीत नाहीं. म्हणून टीप कागदानें ( ब्लॉटिंग पेपरनें ) टिपण्याची चाल आहे.

ज्या वेळीं घट्ट शाईनें बोरूनें लिहीत असत तेव्हां वाळू घालीत असत. वाळूंत गुलालही मिळवीत. त्यामुळें मूळच्या काळ्याभोर तेजस्वी शाईला वाळूनें चकाकी आणि शोभा येत असे. कागदावर घालावयाची वाळू अर्थातच फार बारीक असावी लागते.

दगड, रेती, आणि माती ह्यांची परंपरा आहे. दगडांची रेती होते, रेतीची माती आणि मातीचा पुनः कालांतरानें दगड होतो.

दगडाचीं सामान्यतः ३।४ रूपें दिसतात.

( १ ) गोटे.

( २ ) फुटलेले फत्तर.

( ३ ) चौके ( चिरे ), पट्ट्या, तुळया.

गोटे नदींत किंवा पर्वतांच्या पायथ्यांशीं सांपडतात. दुसऱ्या दोन प्रकारच्या दगडांच्या खाणी असतात. गोटे बहुधा लहान असतात; फुटलेले फत्तर पुष्कळ मोठेही खाणींत

आयते फुटलेले सांपडतात. पण चौके ( चिरे ), पट्या, तुळ्या वगैरे कापून फोडून काढाव्या लागतात. पट्या १५ हात व क्वचित् याहूनही लांबीच्या निघतात; आणि त्यांवर कितीही ओझें पडलें असतां त्या तुटत फुटत नाहींत. फत्तराचा साधारण असा धर्म आहे कीं, तो फुटेल पण नमावयाचा नाहीं. तसेंच तो पाण्यावर तरंगत राहत नाहीं. तळाशीं जातो.

दगड लाल, काळे, पांढरे, पिंवळे, टिपके दिल्यासारखे असे अनेक प्रकारचे निघतात. आग्र्याचा किल्ला सगळा लाल दगडांनीं बांधिलेला आहे.

कांहीं दगड नरम असतात आणि कांहीं फार कठिण असतात. नरम दगड लांकडासारखा करवतानें कापतां येतो. कठिण दगड टांकीनें फोडल्याशिवाय फुटत नाहीं. कांहीं दगड इतके टणक असतात कीं, ते एकावर एक घासले देखील जात नाहींत. अशाच दगडांचे वैद्य लोक औषधें खलण्यासाठीं खलबत्ते करितात.

एका प्रकारच्या दगडांतूनच हिरे, पाच, माणकें, अशीं रत्नें निघतात. एक गारगोटीचा दगड असतो त्याचे कांचेसारखे दिव्य चश्मे बनवितात. संगमरवर जातीचा एक दगड असतो तो घासल्यानें फार गुळगुळीत आणि तेजस्वी होतो. त्याच्या खाणी जयपूरचे राज्यांत आहेत. आग्र्याचा मुकरबा ( मुकब्बरा ) ह्याच दगडांचा बांधलेला आहे. ह्याला किंमत फार पडते म्हणून अलीकडे हा दगड इटली देशांतून इकडे येऊं लागला आहे. तो इतक्या लांबून येऊनही जयपूरच्या

दगडापेक्षां स्वस्त पडतो. ह्याच दगडाच्या सुंदर मूर्ति व पुतळे करितात. हा दगड बहुधा काळा आणि पांढरा दोनच रंगांचा असतो.

दगडांचा उपयोग इमारती व नद्यांचे पूल बांधण्याच्या कामीं होतो. पण त्याशिवाय त्यांचे पेले, पाट, टेबलें, बेंचें, चौरंग, गुलदस्ते, चित्रें इत्यादि अनेक जिन्नस करितात. दगडी पट्ट्यांना कोरून त्यांच्या निरनिराळ्या वेलदार अशा जाळ्या बनवितात. लष्कर, आग्रा, मथुरा ह्या भागाला असें जाळीकाम पुष्कळ पाहण्यांत येतें.

---

## धडा ३४ वा.

### चिकण माती.

१५४ चिकण-माती=जिच्यात वाळू थोडी असते. जिचे रज एकमेकांला ज्यास्त चिकटलेले असतात ती.

कुंभार=कुंभ-कार, घडे बनवणारा. वाडा = मोहल्ला, आळी. म्हारवाडा इ० शब्द असेच आहेत.

१५५ कुंभारासारखे एकच धंदा पिढीजाद करणाऱ्या लोकांच्या जातीच वेगवेगळ्या झाल्या आहेत-जसें,

सोनार=सुवर्णकार, सोनें-चांदीचे अलंकार घडणारा.

लोहार=लोहकार, लोखंडाचे जिन्नस करणारा.

चांभार= चर्मकार, कातडें तयार करणारा इ०.

१५६ कुंभार, सोनार, लोहार इ० शब्द-प्रयोग एकसारखे झालेले असून त्यांचें संस्कृत शब्दांशीं फार साम्य आहे.

पण कांहीं शब्द चमत्कारिक बनलेले आहेत. जसें—सुतार, ( ह्या शब्दांत लाकडी काम करणारा असा कांहीं अर्थ निष्पन्न होत नाहीं. संस्कृतांत तर त्वष्टा शब्द ह्याचा वाचक आहे ) शिंपी इ०. माळी, तांबट, कासार हीं रूपें स्वतंत्र झालीं आहेत. न्हावी हा शब्द ही सुतार शब्दाप्रमाणें ' हजाम ' ह्या अर्थी रूढ झाला आहे.

टणक = कठिण.

१५७ मेण= मधमाशा करितात. तें मधाच्या मोहोळांत निवतें. तें फार मऊ असतें. मेण जखमेला भरून आणितें. मेणबत्ती आपण जाळतों ती पूर्वी मेणाचीच बनत असे. आतां ती चरबीची बनवितात. बायका आधीं मेण लावून त्यावर कुंकू लावितात. ओलें कुंकू तेल घालून करूं लागल्यापासून मेण-कुंकवाची चाल कांहींशी कमी होत चालली आहे. मेणाचीं आजकाल सुंदर चित्रें करूं लागले आहेत. मेण विरघळवून कापडावर पसरतात, अशा तयार केलेल्या कापडास मेणकापड म्हणतात. मेणांतून पाणी आंत शिरत नाहीं.

१५८घाट—घटना,आकृति.नदीच्या किंवा पर्वताच्या उताराlaही घाट म्हणतात. बोलण्यांतही घाट शब्द येतो. जसें, " त्यानें असा घाट घातला तेव्हां " घाट शब्दाचा उपयोग पालुपदासारखाही करितात. जसें ' थाट-घाट '.

१५९ अवा किंवा आवा= ढीग. तरी सामान्य ढिगाला आवा म्हणत नाहींत. अवा शब्द विशेषार्थीच रूढ आहे.

आवा लुटवणें--संक्रांतीला बायका कुंभारानें लाविलेला अवा लुटवीत. पण आतां ही चाल नाहींशीच झाल्यासारखी झाली आहे. आतां सुवासिनी घरींच कांहीं जिन्नस बायकांना देतात, [ लुटवीत नाहींत ]. कुणबाऊ भाषेंत अवा, आवा बायकोला म्हणतात.

१६० मातीचीं बहुतेक सर्व प्रकारचीं भांडीं होतात. ह्याशिवाय कवलें, विटा आणि चित्रेंही करितात.

१६१ मातीचीं भांडीं अन्न शिजवण्याला, पातळ पदार्थ ठेवण्याला, आणि सांठवणीचें धान्य भरून ठेवण्यालाही उपयोगीं पडतात. मातीच्या भांड्याला लाखेची कल्हई करितात; त्यायोगें क्षार किंवा मधुर पदार्थ त्यांत न बिघडतां कितीएक दिवस ठेवतां येतात. बरण्या प्रचारांत येण्यापूर्वीं लाखलोटीं मडकींच ह्या कामाकरितां घेत असत. हिंदुस्तानांत आणि विशेषतः संयुक्त प्रांतांत बाजारांत लहान मोठे जिन्नस देण्याघेण्यांत मातीच्या भांड्यांचा फार उपयोग करितात. तेथें तूप आणायाला भांडें धरून नेण्याची आवश्यकता नसते. तुपाबरोबर भांडें बिनाकिंमतीनें मिळतें. फार तर काय, पण काशीस एका शिवराईचे वासाचे तेलालासुद्धां वाटी न्यावी लागत नाहीं. त्याच्या बेताच्या मातीच्या लोट्या केलेल्या असतात, त्यांतून तें देतात.

मातीचीं भांडीं भाजून पक्कीं करितात, तरी तीं आपलेकडे अद्यापि मजबूत आणि सुबक बनविण्याची विद्या लोकांना माहीत नाहीं. म्हणून शोभेच्या आणि स्वच्छते-

च्या कामीं आपल्याइकडील भांड्यांचा उपयोग होत नाहीं. त्याकरितां चिनी भांडीं उपयोगांत येतात. जसें, चहाचे प्याले, बशा, गुलदस्ते इ०.

१६२ कवलें--हीं सपाट असतात किंवा नालासारखीं अर्धवर्तुळ असतात. बहुतकरून सपाट असतात, त्यांना कवलें आणि नालाच्या आकृतीचीं असतात, त्यांस नळे म्हणतात हीं, पाऊस आंत येऊं नये म्हणून छपरावर घालितात. कौलांपेक्षां नळे जास्त मजबूत व टिकाऊ असतात; तसे ते किंमतीलाही महाग असतात. अलीकडे मंगलोरी कौलें म्हणून एक प्रकारचीं कौलें निघालीं आहेत. तीं बहुधा बंगल्यांवरून घालतात. हीं कौलें गांवठी कौलांपेक्षां अधिक लांब, रुंद, टणक आणि फार मजबूत असतात. जेथें दगड विपुल असतो, तेथें दगडी पट्ट्यांचें छपर करितात, आणि हलकें सुशोभित छप्पर लोखंडी पत्र्यांचें होतें. स्लेटींचे फ़त्तर किंवा रबराचे तक्ते घालूनही छप्परें करितात. शहरांतून आतां कौलारें बहुतेक नाहींशीं होत चाललीं आहेत. तसेंच बंगल्यांना गवताचीं छपरें घालीत, तीही चाल मोडत चालली आहे.

१६३ विटा—कच्च्या आणि भाजून पक्क्या केलेल्या, दोन्ही प्रकारच्या उपयोगास येतात. लग्ना-मुंजीला वेदी म्हणून जो ओटा करितात तो कच्च्या विटांचा करण्याची चाल आहे. विटांचा उपयोग इमारती कामाकडे होतो. फरस किंवा पटावालाही विटा घालितात. मंगलोरचीं जशीं कौलें तशा विटाही निघाल्या आहेत. त्या निरनिरा-

ळ्या रंगांच्या आणि वेलबुट्टीच्या करितात. त्या गालीच्यासारख्या फरसाला आणि भिंतीलाही लावितात.

विटकरीनें धातूचीं भांडीं घासलीं असतां स्वच्छ चकचकीत होतात.

१६४ चित्रें—मातीचीं फार सुबक चित्रें करितात. १००।१५० रुपयांपर्यंत मातीचें एकेक चित्र विकतें. मुरादाबाद, बनारस इ० शहरें ह्यासंबंधानें प्रसिद्ध आहेत. तरी चिनी चित्रें अधिक सुबक, टिकाऊ आणि पक्क्या रंगाचीं असतात म्हणून त्यांचा खप फार होतो.

१६५ मातीचे आणखीही संसारोपयोगी कितीएक जिन्नस करितात. जसें—चिलमा, पंख्या, फुलांचे कुंडे इ०.

---

## धडा ३५ वा.

### धातु.

१६६ सोनें—ह्याचे तुकडे बाजारांत विकण्यास येतात, त्यांस फांसे किंवा लगड म्हणतात. सोन्याच्या उत्तममध्यमपणाची परीक्षा त्याच्या कसावरून करितात. कस लावण्याचे काळे दगड असतात त्यांस कसोटी म्हणतात. त्यांवर सोनें घांसलें असतां लागलीच रेघ उमटते. ती जितकी ज्यास्त पिंवळी असेल तितकें सोनें उत्तम. ह्या उमटलेल्या रंगास कस म्हणतात. त्या रंगाच्या मानाप्रमाणें त्यास नंबर दिले आहेत. ५२ कशी सोनें उत्तम असें म्हणण्याची जुनी चाल आहे. अलीकडे १०० नंबरी सोनें उत्तम समजतात. त्याशिवाय त्याच्या उत्तम-

मध्यमपणाचें प्रमाण त्याच्यावर लागलेल्या छापावरूनही करितात. जसें—चिंतू छाप इ०. सोन्यांत तांबें व इतर धातु ह्यांचें मिश्रण जितकें ज्यास्त तितकें सोनें हिणकस आणि त्या मानानें त्याची किंमतही उतरते.

१६७ सोनें विस्तवानें जळत नाहीं. तें जसजसें तापवावें तसतसा त्याचा मळ किंवा आंत मिळविलेले दुसरे धातु जळून सोन्याचें अस्सल स्वरूप निघतें. सोन्याचे कागदापेक्षांही पातळ असे पत्रे करितां येतात; त्यास वर्ख म्हणतात. ते औषधाकारितां म्हणून खातात. सोनें शक्तिवर्धक आहे. पण वर्खाच्या रूपानें खादलेलें सोनें पचत नाहीं, किंवा तें पोटांत राहत नाहीं. त्याच्या संसर्गाचा गुण होईल तेवढाच. बाळंतिणीला कढत पाण्यांत सोनें बुडवून तें पाणी पिण्यास देण्याची चाल आहे. सोन्याची अगदीं केसाइतकी बारीक तार निघते. ती रेशमास गुंडाळून त्याचे गुच्छ बनवितात त्यास जरतारी किंवा कलाबतू म्हणतात. पैठण्यांचे पदर, कांठ, पागोट्यांचे पदर व अनेक दुसऱ्या कापडांतही जरतार घालितात.

१६८ पूर्वी हिंदुस्तानांत सोन्याचें नाणें असे. अगदीं अलीकडील नाणें ‘ होन ’ या नांवानें प्रसिद्ध असे; पण तें आतां बुडालें.

मुसलमानी अमदानींत सोन्याच्या मोहरा करूं लागले. अकबरी व जयपुरी मोहरा प्रसिद्ध आहेत. त्यांत सगळें सोनेंच असतें आणि तें उत्तम प्रतीचें असतें. ह्या मोहरा ऋद्धिदायक म्हणून अजून लोक बाळगतात. सोनार लोक

तशा मोहरा खासगी रीतीनें स्वतः पाडूनही त्या अकबरी किंवा जयपुरी म्हणून विकतात, आणि भोळे लोक रुपया आठ आणे त्यांस ज्यास्त देऊनही त्या घेतात. जुन्या मोहरांना ३००-४०० वर्षे झालीं असतां व नवीन मोहरा पडणें बंद झालें असतां अद्यापिही मोहरा हव्या तितक्या मिळतात, जर ह्या नकली मोहरा निघाल्या नसत्या तर अस्सल मोहरा कधींच व्यवहारांतून नाहींशा झाल्या असत्या. मोहरांना सोन्याचे दांडे लावून त्यांच्या आंगठ्या बायका हातांत घालितात, किंवा घालीत असत. कारण आतां नव्या नव्या आकृतींच्या इंग्रजी घडणीच्या आंगठ्या निघाल्यापासून मोहरेच्या आंगठीची हौस नाहींशी होत चालली आहे. राजपुतान्यांत कांहीं ठाकूर श्रीमान् लोक मोहोरांचा उपयोग बटनाच्या कामीं करितात. कोणी एका दिल्लीच्या बादशाहाची गोष्ट सांगतात कीं, त्याच्याकरितां खिचडी तयार करीत. तिच्या फोडणीला पांचसात मोहराच घालीत असत, आणि त्या खिचडींत मसाले इतके पडत कीं, त्याबरोबर त्या मोहरा गळून किंवा विरून जात.

पोर्तुगीज लोक इकडे आले तेव्हां त्यांनीं सोन्याच्या पुतळ्या इकडे आणिल्या. पुतळ्यांच्या माळा त्या ह्याच पुतळ्यांच्या. लहान मुलींच्या गळ्यांत ताइतासारखी एकादी पुतळी बांधितात. आणि मुलांचें पुतळ्यांचें गांठलें करीत असतात.

अलीकडे इंग्रजींत ' साव्हरिन ' ह्या नांवाचें सोन्याचें नाणें चालू झालें आहे. त्याची ठरींव किंमत १५ रु.

ह्याचें चित्र ह्या धड्यांत दिलें आहे. इंग्लंडांत पुष्कळ नाणीं सोन्याचीं चालतात. जसें पौंड, गिनी, क्राऊन इ०.

१६९ श्रीमान् लोक सोन्याचे अलंकार आणि भांडीं-ही करितात.

[१] बायकांचे अलंकार---

डोकीचे--केकत, केवडा, राखडी, नाग, फुलें, बिंदीबिजवरा.

कानांचे--बुगड्या, बाळ्या, बहिरव, किंवा कर्णफुलें.

नाकाचे--नथ, लौंग.

गळ्याचे--ठुशी, वजरटीक, सरी, माळा, मणी, मंगळसूत्र.

दंडाचे--वाकी.

हाताचे--गोट, पाटल्या, तोडे, बांगड्या, जवे, लसण्या, कांकणें.

कंबरेचे--पट्टा.

[२] पुरुषांचे अलंकार---

कानांचे--भिकबाळी, कुंडलें, चौकडा.

हाताचे-- बाजुबंद पोंहची, सलकडीं, पवित्रक.

[३] उभयतांस सामान्य--आंगठी, सल्ले, कंठी, गोफ इ०. ह्याशिवाय मुलांमुलींचे निरनिराळ्या आकृतींचे आणि नांवांचे अलंकार करितात.

सोन्याच्या अलंकारांत आणखी मोतीं किंवा हिरे इ० रत्नें घालून आणखीही त्यांस शोभा आणितात.

सोन्याचे सर्व अलंकार बहुतकरून कमरेच्या वरच्या भागांत घालावयाचे असतात. कांहीं क्षत्रिय राजे मात्र आपल्या वंशपरंपरा हक्कानें सोन्याचा तोडा पायांत घालितात. ह्याशिवाय आणखी कितीएक अलंकार भिन्न देशांत व भिन्न लोकांत करितात. ह्यांचीं नांवें आणि घाटही निरनिराळे असतात.

१७० आंगावर सोनें घालून वापरल्यानें तें पुष्कळ झिजतें. कोणी कोणी लोक आंगावर सोनें आदरपूर्वक घालितात. तें याकरितां कीं, सोन्याचें पाणी आंगावर पडावें, सोन्याचा स्पर्श सदोदित आंगाला असावा, कारण तो लक्ष्मीकारक आहे.

१७१ श्रीमान् लोक सोन्याच्या देवांच्या मूर्तीही करितात. अयोध्येस रामाची आणि पुण्यास पर्वतीवर पार्वतीची व गणपतीची सोन्याची मूर्ती असल्याचें प्रसिद्ध आहे. बडोद्यास तर सोन्याच्या तोफा केलेल्या आहेत !

१७२ सोन्याचीं भांडीं—बहुधा ताटें, वाट्या, गिलास, हजारे, अत्तरदाण्या, आणि देवाचीं उपकरणीं इ० करितात. आणखी छड्या, चंवऱ्या, मुकुट, सिंहासनें, तजाबेरीच्या चौकटी इ० अनेक पदार्थ सोन्याचे करितात. ह्याशिवाय इतर कांहीं धातूंच्या भांड्यावर सोन्याचें पाणी चढवितात त्यास मुलामा म्हणतात. ह्या मुलाम्यानें भांडें सोन्यासारखें दिसूं लागतें.

१७३ सोनें खाणींत मातीबरोबर मिसळलेलें सांपडतें. कांहीं नदींच्या वाळूंतही तें कणरूपानें सांपडतें असें म-

णतात. ह्याशिवाय सोन्याविषयीं दोन आख्यायिका प्रसिद्ध आहेत. एक, परीस नांवाच्या दगडानें लोखंड घासलें असतां त्याचें सोनें होणें, व दुसरी, रसायन क्रियेनें तांब्याचें सोनें होणें, ह्यास किमिया म्हणतात. पुष्कळ लबाड लोक साधुवैराग्यांचे सोंगानें भोळे लोकांस किमियेच्या नादीं लावून त्यांजवळ असेल नसेल तें बुचाडीत असतात.

१७४ रुपें=चांदी. रुप्याच्या आणि सोन्याच्या किंमतींत १५।२०पटींची तफावत असते.म्हणजे चांदी इतकी स्वस्त असते. चांदीच्या ढेपा किंवा विटा बाजारांत विकावयास येतात.चांदींत गांवठी आणि चिनई असे दोन भेद आहेत. गांवठी चांदी शुद्ध नरम आणि शुभ्र असते. ती वापरण्यांत काळी पडत नाहीं. चिनई चांदी त्यापेक्षां अंमळ कठिण व अशुद्ध असून वापरण्यांत काळी पडते. चांदीचेही सोन्याप्रमाणें ठोकून ठोकून कागदापेक्षां बारीक पत्रे करितां येतात. अशा पत्र्यांना चांदीचे वर्ख म्हणतात. त्यांचा औषधाचे कामीं उपयोग होतो. चांदीची बारीक तार काढून सुताबरोबर किंवा रेशमाबरोबर गुंडाळतात, व फितीसारखे विणतात त्यास गोटा म्हणतात, आणि नुसते गुच्छ बनवितात ती जरतार किंवा कलाबतू. ही कापडें विणण्यांत उपयोगांत आणितात. सोन्याचा कलाबतू पिवळा आणि चांदीचा पांढरा असतो.

१७५ रुप्याचें नाणें हिंदुस्तानांत सर्वत्र चालू आहे. तें रुपया, अधेली, पावली आणि चवली या रूपानें आहे. रुपयांत असलेल्या चांदीचा आणि त्याच्या किंमतीचा मेळ नाहीं.

त्याच्या वजनाइतकी चांदी १०—११ आण्याला येते. पण रुपयाची किंमत सोळा आणे सरकारानें ठरविली आहे. हीं नाणीं ज्या कारखान्यांत पाडितात त्यास टांकसाळ म्हणतात. प्रत्येक नाण्याचें वजन तंतोतंत सारखें उतरावें म्हणून फार खबरदारी घ्यावी लागते. चांदीचा रुपया बनविण्यांत फायदा असतो म्हणून कितीएक लोक चोरून छपवून रुपये घरीं पाडितात आणि युक्तीनें प्रचारांत आणितात. असें करणें राजकीय गुन्हा आहे. त्याकरितां शिक्षा सांगितलेली आहे.

१७६ चांदी खाणींत मातीबरोबर सांपडते. त्याशिवाय लोकांचा असा समज आहे कीं, किमयेनें पाऱ्याची चांदी करितां येते. कांहीं वनस्पति आहेत त्यांचा रस पाऱ्यावर ओतून आंच दिली असतां त्याची शुद्ध चांदीची ढेप उतरते. पण ही भ्रांति आहे.

१७७ चांदीचे अनेक प्रकारचे अलंकार आणि भांडींही करितात. गरीब लोकाचे सर्व दागिने बहुधा चांदीचेच असतात. श्रीमान् लोकांचे प्रायशः कमरेपासून खालच्या भागांत घालावयाचे दागिने चांदीचे असतात.

१७८ चांदीचीं भांडीं बहुधा लहान मोठीं सर्व प्रकारचीं करितात. चांदीही वापरण्यानें झिजते, पण सोन्यापेक्षा फार कमी.

१७९ जर्मन सिल्व्हर म्हणून एक विलायती चांदी आहे. ही चांदी सौंदर्याला आणि गुणालाही खऱ्या चांदी-

पेक्षां पुष्कळच हलक्या प्रतीची असते. हिचीं भांडीं पुष्कळ करितात, आणि त्यांचा खपही पुष्कळ होतो. कारण थोडक्यांत चांदीसारखीं भांडीं वापरायाला मिळतात म्हणून गरीबगुरीब लोकदेखील हीं भांडीं पुष्कळ घेतात.

१८० अल्यूमिनम हाही एक धातु चांदीसारखाच पांढरा परंतु मलिन १०।१२ वर्षांपासून सांपडला आहे. ह्यानें भांड्यांच्या कामांत जर्मन सिल्व्हरलाही पुष्कळ मागें टाकिलें आहे.

१८१ तांबें—आपले पैसे आणि पया तांब्याच्या केलेल्या आहेत. विजेची तार खांबांवरून लावलेली असते ती तांब्याची केलेली असते. तांब्याचीं भांडीं करितात. पण त्यांत पदार्थ कळकतो म्हणून त्याचीं भांडीं सैंपाका-जेवण्याच्या कामीं आणीत नाहींत. तथापि वल्लभ-सांप्रदायी आणि माध्व लोक हटकून ह्याच धातूचीं भांडीं वापरतात. पाणी काढण्याच्या, सांठवण्याच्या, आणि तापविण्याच्या कामीं सर्वत्र तांब्याच्याच भांड्यांचा उपयोग करितात. ही धातु टणक असते आणि फार कमी झिजते. पाणी तापवण्याचे हांडे तर तीन तीन पिढ्यांचे म्हणजे ६० वर्षांपूर्वींचे कितीएक लोकांच्या घरीं पहाण्यांत येतात.

१८२ तांब्यांत कांहीं प्रमाणानें शिसें मिळविलें म्हणजे ती मिश्र पितळ धातु होते. पितळेचीं अनेक प्रकारचीं भांडीं आणि उपकरणीं बनवितात. चांगलीं सुबक डौलदार अशीं भांडीं करण्याविषयीं नाशिक फार प्रसिद्ध आहे. अलीकडे सांगली येथेंही पितळेचीं उत्तम भांडीं होऊं लागलीं आहेत.

१८३ तांबें जाळून राख करितात, त्यास ताम्रभस्म म्हणतात. तें औषधाच्या उपयोगीं पडतें.

१८४ कथील— कथलांत कोणचाही जिन्नस कळंकत नाहीं, म्हणून आंबट पदार्थ व पातळ तूप, मोरंबे इ० ठेवण्याला त्याचीं भाडीं करितात. कथलाचें भांडें चुलीवर किंवा आगीवर ठेवितां येत नाहीं. कारण तें लागलीच वितळून गोळा होऊन जाईल. भांड्यांना कल्हई करितात, ती कथलाची. कथलावर नवसागर घालून तें तापवून लाल झालेल्या भांड्यावर घासलें म्हणजे पातळ पाण्यासारखें होतें.

१८५ कथलाचे दागिने बाजारांत विकावयास येतात. ते अगदीं चांदीसारखे दिसतात; म्हणून गरीब लोक ते घेऊन आंगावर घालितात.

१८६ शिसें नरम असतें म्हणून दुसऱ्या धातूबरोबर भर घालण्याच्या कामीं त्याचा फार उपयोग होतो. त्याशिवाय बंदुकीच्या गोळ्या शिशाच्या करितात, आणि कांहीं लोक कल्हईच्या कामीं कथलाऐवजीं शिसें लावितात. तें लौकरच काळें पडतें. शिशाची कल्हई विषारी असते; ती करूं देऊं नये.

१८७ लोखंड ही फारच उपयोगी धातु आहे. आगगाडीचा जो एवढा प्रचंड कारखाना जगभर चालला आहे तो लोखंडामुळें होय. आगगाडीचे रूळ लोखंडाचे केलेले असतात. हजारों लाखों यंत्रें चालू आहेत तीं सगळीं लोखंडाचीं. पाण्याचे नळ, हत्यारें, तरवारी, बंदुका, तोफा,

आणि चाकू, कात्र्या, अडकित्ते, सुया हेंही सगळें लोखं-डाचें. ह्याचीच तार तंबुरीवर व सतारीवर मधुर स्वर काढीत असते. लोखंडाच्या मोठ्या अलमाऱ्या, तिजोरीच्या पेट्या, कढाव आणि कढया, तवे, झारे, पंचपात्रें किंवा कोठया, पिपें वगैरे शेंकडों हजारों जिन्नस करितात.

१८८ लोखंडाचा अर्क आणि भस्म इंग्रजी आणि देशी दोन्ही वैद्यकांत औषधाच्या कामीं आणितात. तें पौष्टिक असतें.

लोखंडाच्या पत्र्यांवर कथलाची कल्हई करून जे पत्रे होतात त्याचेच राकेल ठेवण्याचे डबे करितात. यांना पत्रा-साचे डबे म्हणतात, व प्रचारांत यांनाच जस्ती डबे म्हण-तात. या पत्रासाच्या डब्या, दिवे लावण्याच्या चिमण्या, चहाचे डबे असे अनेक जिन्नस करितात.

१८९ दोन धातूंचे पत्रे जोडून जें भांडें केलेलें असतें त्यास गंगाजमनी म्हणतात. आणि पांच चार धातू एकांत एक मिळवून त्यांचें जें भांडें करितात त्यास पंचरशी म्हणतात. अशा पंचरशी धातूंच्या पाणी पिण्याच्या पंचपात्र्या पूर्वीं पुष्कळ करीत असत. अशा मिश्र धातूंच्या मोठमोठ्या जुन्या तोफाही कोठें कोठें पाहण्यांत येतात.

---

## धडा ३६ वा.

### नाणीं.

दामाजी = दामोदराचा संक्षेप.

विठू = विठ्ठल शब्दाचा संक्षेप, विठ्ठल हें विष्णूचें नांव

आहे. विटेवर उभा म्हणून विठ्ठल अशी प्राकृत व्युत्पत्ति आहे.

१९० नाणें पाडण्याचा आणि चालवण्याचा एक राजकीय हक्क आहे. एका राजाचें नाणें दुसऱ्या राज्यांत त्याच्या ठरीव किंमतीस चालण्याचा कांहीं नेम नाहीं. पण जें नाणें सार्वभौम राजानें चालविलेलें असतें तें त्याच्या सर्व मांडलिक राज्यांत ठरीव किंमतीला चालतें.

१९१ हिंदुस्तानांत पूर्वीं कितीएक नांणीं चालू असत. त्यांत सालिम ( सेलिम ) शाही, चांदवडी, बाबाशाई इ० नाणीं फार प्रचारांत होतीं. ह्या देशी नाण्यांत विशेष असें असे कीं, त्यांच्या किंमतीइतकी चांदी त्यांत असे, आणि त्यांत दुसऱ्या धातूची भर घालीत नसत. अलीकडे सरकारी कायद्याप्रमाणें ह्या टांकसाळी बंद पडल्या आहेत.

१९२ राजा बदलला म्हणजे पुढें बदललेल्या राजाच्या शिक्क्याचें नाणें पडतें. आपले देशांतील जुनी चाल नाण्यावर राजाचें नांव आणि वर्ष लिहिण्याची आहे. इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीनें प्रथम इंग्रजी नाणें सुरतेस चालू केलें तेव्हां त्यावर राजाचा चेहेरा आणि नाण्याची किंमतही लिहिण्याची चाल सुरू केली. नवा रुपया चालू होतो तेव्हां चेहेऱ्याचा रोंख ( मोहरा ) ही बदलतात. पूर्वीच्या राजाचा चेहेरा डाव्या बाजूला रोंख ( मोहरा ) केलेला असला तर नवीन राजाचा उजवीकडे करितात.

१९३ रुपयाबरोबर शिक्का शब्द लावण्याची चाल

आहे. जसें– कलदार शिक्का – शिक्का शब्द 'शक' शब्दापासून झालेला दिसतो. मोठे पराक्रमी राजे आपल्या राज्याभिषेकापासून वर्ष-गणना सुरू करीत. जसें– विक्रम शक, शालिवाहन शक इ०. शिवाजी महाराजांनीं आपला राज्याभिषेक शक सुरू केला होता. शक बदलेल तेंव्हां अर्थात् राजमुद्रा आणि रुपयाही बदलत असे. राजमुद्रेलाही शिक्का म्हणतात. फारसी भाषेंत 'सिक्का' शब्दाचा अर्थ ठसा, मुद्रा असा आहे. त्या भाषेंत नाण्याला तो शब्द लावण्याची चाल आहे. त्यावरूनही कदाचित् आपला शिक्का शब्द झाला असेल. 'रुपया' शब्द सर्वच भाषांतून रूढ आहे. पण शिक्क्यांचीं नांवें दोन प्रकारांनीं म्हटलीं जातात. एक प्रकार-- बाबाशाही, सेलिमशाई इ०; दुसरा प्रकार आलमगिरी, अकबरी इ०.

निरखून = न्याहाळून, दृष्टि रोखून.

---

## धडा ३७ वा.

## कुऱ्हाड आणि सुई.

१९४ कुऱ्हाड नुसतें फोडण्याचें काम करिते. सुई भोंक पाडते आणि त्यास शिवून पुनः सारखेंही करते. कुऱ्हाडीला आपलें काम लांकडाच्या दांड्याचें साह्य घेतल्याशिवाय करितां येत नाहीं. एका झाडाचा दांडा कुऱ्हाडीला घेऊन आला आणि तिच्या साह्यानें त्यानें किती एक झाडांचा नाश करून टाकिला; पण तो परतंत्र झा-

त्यामुळें त्याला मग आपलें स्वतःच्या झाडाचें सुद्धां संरक्षण करण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं, म्हणून म्हण पडली आहे कीं " कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ."

असेच कांहीं मनुष्यांचे स्वभाव असतात. कोणी दुसऱ्याला मदत करून त्याकरवीं प्रथम आपल्या कुळाचा आणि मग आपलाही नाश करून घेतात. कोणी असे असतात कीं, आपण जखम केली तर ती मलमानें भरूनही काढितात. आपण पहिल्या प्रकारचें होऊं नये.

१९५ ह्या धड्यांत सुई आणि कुऱ्हाड यांचें भांडण त्या दोघींत थोर कोण ह्याविषयीं लागलें. ह्यांत थोरपणा आकृतीचा नाहीं तर गुणाचा आहे. दोन भिन्न गुणांच्या पदार्थांची उपयोगितेसंबंधानें तुलना करितां येत नाहीं. पहा, लोखंड आणि सोनें. ह्यांविषयीं कोणीं प्रश्न केला कीं, ह्यांत थोर कोण ? तर काय उत्तर देतां येईल. खरें म्हटलें तर लोखंडास थोर म्हटलें पाहिजे. उद्यां जर जगांतील सोनें नाहींसें झालें तर क्षणभरसुद्धां अडणार नाहीं. पण लोखंड नाहींसें झालें तर क्षणभरसुद्धां चालावयाचें नाहीं. इतका लोखंडाचा व्याप आणि उपयोग आहे. असें आहे तरी सोन्यापेक्षां लोखंड थोर असें म्हणतां यावयाचें नाहीं. समजा एक गाय दूध देते तितकेंच एक बकरी देते, आणि बकरीला बाळगणेंही फार कमी खर्चाचें आहे, पण गाईची थोरवी बकरीला नाहीं. शरीराच्या एकंदर अवयवांत डोळे थोर कीं पाय थोर, असा जर कोणीं प्रश्न

केला तर ह्याचें कांहीं समाधानकारक उत्तर देतां येणार नाहीं. डोळे पाहिजेत आणि पायही पाहिजेत. व्यवहारांत कुऱ्हाडही पाहिजे आणि सुईही पाहिजे. तसेंच गायही पाहिजे आणि शेळीही पाहिजे. हीं सर्व उपयोगी आहेत म्हणून थोर आहेत.

---

## धडा ३८ वा.

### बाग.

१९६ राघोपंत–राघो हें रघूचें रूप आहे. रघु नांवाचा एक प्रसिद्ध सूर्यवंशीं राजा होऊन गेला. कालिदास कवीनें त्याच्या वंशावर एक काव्य केलेलें आहे, त्यास रघुवंश म्हणतात. दशरथ राजाचा मुलगा राम हा ह्याच कुळांतल्या रघूप्रमाणें मोठा पराक्रमी निघाला, म्हणून ह्यास राघव, रघुनाथ अशा नांवानें रामायणांत पुष्कळ जागीं संबोधिलें आहे.

१९७ वासू, वाशा, वासुदेव हीं कृष्णाचीं नांवें आहेत. कृष्णाच्या बापाचें नांव वसुदेव होतें म्हणून त्यास वासुदेव म्हणत.

१९८ बाग आणि बागाईत—घरासभोंवतीं शोभेकरितां लावलेला तो बाग; आणि ज्यांत केवळ फुलें, फळें इ० लावून उत्पन्न घेण्याचा उद्देश असतो तें बागाईत. बागाईत मिश्र फळफुलांचें असते; किंवा एकेकऱ्याचेंही असतें. जसें शेवती बाग, नारळी बाग इ०. बागाइताला

पाणी द्यावें लागतें. जें केवळ पावसाच्या पाण्यावर पिकतें त्यास जिराईत म्हणतात.

१९९ बागेचें साधारण स्वरूप असें असतें कीं, चार पांच प्रकार एके जागींच दिसून यावे.

१ फुल-झाडें.

२ फळ-झाडें.

३ चित्र विचित्र पालवीचीं झाडें आणि लता, वेली.

४ भाज्या.

५ मोठालीं सावलीचीं झाडें.

२०० फुलझाडांत—गुलाब, जुई, चमेली, मोगरा, चांफा, पारिजातक, बकुळी, शेवंती, निशिगंध, इ० मुख्य होत. गुलबास, झेंडू, कण्हेरी हीं हलक्या प्रतीचीं पण रंगीबेरंगी सुशोभित फुलांचीं झाडें असतात. कांहीं झाडांना फुलें नसतात, पानेंच त्यांचीं सुवासिक असतात. जसें-केतकी, केवडा, दवणा, मरवा, पाच इ०. कमळाचीं फुलें मोठ्या तलावाशिवाय होत नाहींत.

२०१ फळ-झाडांत—डाळिंब, पेरू, आंबा, केळें, लिंब, संत्रा, अननस, अंजीर, द्राक्ष, चिंच, कौठ, शेवगा, फणस इ० प्रमुख होत. कांकड्या, खरबुजें, कलिंगडीं हीं नद्यांचे कांठीं रेतींत मात्र होतात.

२०२ भाज्या—ह्यांच्या कांहीं वेली असतात आणि कांहीं झाडें असतात. तसेंच कांहीं भाज्या फलमय असतात आणि कांहीं नुसत्या पालेभाज्या असतात. वांगीं, घोसाळीं, का-

रलीं, पडवळें, भेंड्या, बटाटे, कोबी, वाटाणे, भोपळा, चंवळी, घेवडा, इ० फळभाज्या प्रमुख होत. मेथी, चुका, चाकवत इ० पानभाज्या होत. कांहीं भाज्यांचीं फळें किंवा मुळें आणि पाले दोन्हीं कामीं येतात. जसें-मुळे, करमकल्ला, शलगम इ०.

२०३ सावलीच्या झाडांत-वड, पिंपळ, महू, औदुंबर, अशोक, लिंब, शिसव, टेंभुरणी, पिंपरी इ० श्रेष्ठ होत.

---

## धडा ३९ आणि ४० वा.

### झाडें.

पुरुष = ६ फूट उंची धरितात.

परडें = परस, वाडगें, वाडा. घराच्या मागील खुली जागा.

२०४ कांहीं झाडें नुसतीं फुलांचीं असतात, त्यांना फळें येत नाहींत. जसें मोगरा. कांहीं नुसतीं पानांचींच असतात. त्यांना फुलें येत नाहींत. जसें दवणा, मरवा, विलायती ओवा, अमरवेल इ०. फुलझाडांच्या पानांना कांहीं वास नसतो पण फळझाडांच्या पानांला त्या फळांचा वास अवश्य येतो.

झाडांचें बीं किंवा डाहाळ्या कापून जमिनींत लाविल्या असतां त्यांचीं झाडें होतात. डाहाळ्या कापून लावणें त्यास कलम लावणें आणि कापणें त्यास कलम करणें म्हणतात.

झाडें आपल्या पानांच्या साह्यानें हवेंतून आणि उन्हांतून पोषक द्रव्यें शोषीत असतात, आणि सांजसकाळ पानांच्या

द्वारेंच द्रव रूपानें आपल्यांतला अशुद्ध मळ बाहेर टाकीत असतात, म्हणून पहाटेस किंवा तिनीसांजा झाडाला शिवूं नये म्हणजे झाडाजवळ जाऊं नये असा निर्बंध आहे.

झाडांपासून आपल्याला अनेक प्रकारचे उपयोग होतात. जसें सांवली, सुगंध, औषधी, घराचें सामान, आराशी [ घर सजविण्याचें ] सामान, जळण इ०.

असें सांगतात कीं, स्वर्गांत इंद्राचे बागेंत एक कल्पवृक्ष ह्या नांवाचें झाड आहे. त्याचा गुण असा आहे कीं, त्याच्याखालीं जाऊन जी इच्छा करावी ती लागलीच परिपूर्ण होते.

आपल्या लोकांत कांहीं झाडें पवित्र आणि कांहीं मंगलकारक मानिलीं आहेत. जसें वड, पिंपळ, तुळशी, बेल इ०; किंवा आंबा, दुर्वा इ०. वडाच्या झाडाची वडपौर्णिमेला बायका पूजा करितात. वड हा महादेवाला, पिंपळ विष्णूला, औदुंबर दत्तात्रयाला, रुई गणपतीला, आणि कदंब कृष्णाला आवडतो.

हिंदूची त्रिस्थळी म्हणून जीं ३ क्षेत्रें प्रयाग, काशी, गया हीं प्रसिद्ध आहेत, त्या तिन्हीं जागीं एक एक प्राचीन वडाचें झाड आहे, त्यास अक्षय वट म्हणतात. काशीस त्याचें कांहीं फारसें माहात्म्य नाहीं. प्रयागास यात्रेकरूंना त्याचें दर्शन आणि गयेस त्याखालीं श्राद्ध करणें आवश्यक असतें. पौराणिक कथा अशी आहे कीं, तिन्ही स्थळीं हें वडाचें एकच झाड आहे. त्याचें मूळ प्रयागास मध्य किंवा स्कंध काशीस आणि शाखा गयेस आहे.

# धडा ४१ वा.

## वेल.

बिलगणें—चिकटणें.

२०५ दुध्या भोपळा—ह्याची लांब कांकडीसारखी आणि वाटोळीं गडव्यासारखीं फळें असतात. लांब फळाला लौकी आणि वाटोळयाला तुंबी ( तुंबडी ) म्हणतात. दुध्या भोपळ्याची भाजी रविवारीं खाऊं नये, अशी एक चाल आहे.

तुंब्या अनेक कामाला येतात. त्या जवळ असल्या म्हणजे पाण्यांत बुडण्याची अगदीं भीति नाहीं. तुंब्या कापून सतारीला आणि तंबुरीला लावतात. पंढरपूरचे तुंबे ह्या कामाला प्रसिद्ध आहेत. त्यांचे कमंडलू व इतर भांडींही करून संन्यासी—बैरागी तीं वापरतात.

भोपळ्याचा दुसरा प्रकार लाल भोपळा. ह्यास काळा भोपळा असेंही म्हणतात. हे भोपळे मोठाल्या मृदंगाएवढे देखील होतात. त्यांचा वर्ण मनोहर आणि रुचि गोड असते. उत्तरहिंदुस्थानांत आणि विशेषतः मारवाडांत जेथें भाज्या फारशा होत नाहींत तेथें ह्या भोपळ्याची फारच कदर ( योग्यता ) असते. श्रीमान् लोक शेंकडों शिंक्यांवरून वर्षाच्या बेगमीपुरते भोपळे लटकावून ठेवितात. काशीयात्रा करणारे लोक यात्रा झाल्यानंतर बहुधा ह्या भोपळ्याची भाजी खात नाहींत. ह्याच कारणानें कीं काय कोण जाणे, ह्या फळास काशीफळ असेंही नांव पडलें आहे.

भोपळ्याचा तिसरा प्रकार भुरा कोहळा. ह्याच्या पा-

ण्यानें निरनिराळ्या डाळींचे पापड करितात, गिराचा पाक करितात व सांडगे घालतात. भुऱ्या कोहोळ्याची ' पेठा ' ह्या नांवाची मिठाई आग्र्यास फार नामी करितात.

तोकडी = लहान, विरळ, आखूड.

धुमारा = कोब.

दोरखंड = रसी.

---

## धडा ४२ वा.

### आंबा.

२०१ आंबे हिंदुस्तानांत सर्वत्र होतात; तरी संयुक्त प्रांतांत अयोध्या, लखनौ, कानपूर, फैजाबाद ह्या भागांत ते पुष्कळच आहेत. आंब्यांची साधारण फसल उन्हाळ्यांत येते. तरी कांहीं झाडांना पावसाळ्यांत आंबे येतात. आंबे पुढें मागें फळास येऊन सहा महिने तर सारखे येतच असतात; पण कांहीं झाडें बारामाशीं असतात; त्यांना बाराही महिने फळें येतात. आंबे बहुधा एके वर्षी थोडे आणि दुसरे वर्षी पुष्कळ येतात. आंबे लहान मोठे निरनिराळ्या आकृतींचे आणि निरनिराळ्या रंगांचे येतात. त्यांतील कांहीं जातींचे आंबटच असतात, आणि कांहीं अत्यंत मधुर असतात: कांहीं आंबे रसाचे आणि कांहीं गराचे असतात. आंब्यांच्या कांहीं विशेष जाती प्रसिद्ध आहेत. जसें-हापूस, पायरी, लंगडा, गोमांतकी इ०. मुंबईला बहुधा १२ ही महिने आंबे मिळतात अशी प्रसिद्धि आहे.

२०७ आंबा सर्वांग सुंदर आणि उपयोगी आहे. त्याचीं पानें मंगलकारक समजतात. त्याच्या पानांच्या माळा करून मंगलकार्याला दारांवरून तोरणासारख्या बांधतात. विवाहोत्तर वधुवर गौरीहराची पूजा करून आंबा शिंपितात. इमारती उपयोगी लांकडांत सागवानाखालीं आंब्याचा नंबर पहिला आहे. त्याचीं फुलें म्हणजे मोहोर फार सुगंधी आणि सुंदर असतो. तो देवाला आवडतो म्हणून तो वसंतपंचमीला देवाला वहातात. आंब्याचा मोहोर वसंताचा जणू चोबदार आहे. तो आपला सुवास आसमंतात् पसरून वसंताचें आगमन सूचित करित असतो. कच्च्या आंब्यांचीं अनेक प्रकारचीं लोणचीं, मोरंबे, सरबतें, व चटण्या करितात. आंब्याच्या रसाची बर्फी उत्तम बनते. त्याच्या पोळ्या करून वाळवून ठेवितात त्यास साठ म्हणतात. त्याच्या कोई भाजून तशाच किंवा पीठ करून खातात.

२०८ ह्या धड्यांत आंबा कसा झाला हें सांगितलें आहे. आपण बाजारांतून सहज आंबा घेऊन येतों आणि लागलीच खाऊं लागतों पण तो आपल्या हातांत येईपर्यंत त्याचे किती तरी संस्कार झालेले असतात. असेंच सर्व वस्तूंचें आहे. उदाहरणार्थ—आपण कोट रोज आंगांत घालतों, पण तो आपल्या आंगांत आला कसा याचा विचार केला म्हणजे चमत्कार वाटतो. एक कामकरी दिवसभर श्रम करितो तेव्हां त्याला ४।६ आणे मिळतात. पण एकादा अर्ज लिहिणारा कारकून एक कागद लिहिला कीं ४।६

आणे मिळवितो. तेव्हां त्या कामकऱ्याला त्याचें आश्चर्य किंबहुना हेवा वाटणें साहजिक आहे. कारण त्या कारकुनाला एवढ्याशा कामाचे इतके पैसे मिळाले असें त्यास वाटतें. पण तें एवढेंसें काम करण्याला त्याला किती ज्ञान मिळवावें लागलें आहे आणि तें मिळविण्याला किती पिढ्यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत ह्याची कल्पना त्यास नसते.

---

## धडा ४३ वा.

## गाय आणि म्हैस.

२०९ गायीला हिंदू लोक पवित्र मानून पूजितात. विशेषतः ब्राह्मणांच्या बायका वसूबारसेला सवत्स गायींची पूजा केल्याखेरीज अन्न ग्रहण करीत नाहींत. गाय दूध देऊन मातेसारिखें पोषण करिते, म्हणून तिला गोमाता म्हणतात. गाईमुळें शेतीचें आणि ब्राह्मणामुळें धर्माचें पालन होतें, म्हणून क्षत्रिय राजांनीं गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावें, असा धर्म आहे. गाईचें रूप दीन, अनुकंप, लाचारीचें मानिलें आहे. एकाद्या मनुष्याची गरिबी दाखवायाची तर तो 'गाय' आहे असें म्हटल्यानें समजते. गाईची सेवा इच्छित फलदायक होते. दिलीप राजानें वसिष्ठ ऋषींच्या गाईची सेवा केली होती. तिच्या प्रसादानें त्यास रघु हा पुत्र झाला असें कालिदासानें रघुवंश काव्यांत वर्णिलें आहे. गाईच्या दानाचें महापुण्य सांगितलें आहे स्वर्गांत देवांजवळ एक गाय आहे, तिला कामधेनु म्हणतात. ही

कामधेनुही कल्पवृक्षाप्रमाणेंच कल्पिलें फळ देणारी आहे. ह्या कामधेनूची एक कन्या भरद्वाज ऋषींच्या आश्रमांत होती. तिच्या साह्यानें त्यांनीं भरताचें आदरातिथ्य केल्याची कथा वाल्मीकींनीं आपल्या रामायणांत फार हृदयंगम सांगितली आहे. कामधेनूच्या इच्छितफलदातृत्वामुळें एकाद्या जवळ गडीमाणूस हरकाम्या, आज्ञा पाळणारा असा असला म्हणजे म्हणतात कीं, अमक्या अमक्याला कामधेनु लाधली आहे.

मेवाडांतील श्रीनाथद्वाऱ्याचें गाईचें खिल्लार दर्शनीय आहे.

२१० गाईचें दूध जवळ जवळ मनुष्याचे दुधासारखेंच असतें, म्हणून तें लहान अर्भकांना सुद्धां मानवतें.

घरांत गाई वासरें असणें आणि रोज दूध दुभतें होणें उत्तम गृहस्थाश्रमाचें एक लक्षण आहे. एका कवीनें म्हटलें आहे कीं, ज्या घरांत दहीं घुसळण्याचा शब्द ऐकूं येत नाहीं, ज्या घरांत लहान लहान मुलें खेळतां बागडतांना दिसत नाहींत आणि ज्या घरांत हरि—भगवंताची चर्चा नाहीं तीं घरें भरण्यासारखीं होत.

२११ म्हशीमध्यें दूध देण्याशिवाय आणखी कांहींही गुण नाहींत. तिचें दूध गाईच्या पेक्षां अंमळ चट्ट आणि जड असतें. खवा करण्यास आणि लोणी काढण्यास म्हशीचेंच दूध चांगलें.

२१२ गाय ज्यास्तीहून ज्यास्ती ५ शेरपर्यंत एके वेळीं दूध देते, पण म्हैस १० शेरपर्यंत देते.

ह्या धड्यांत गाय आणि म्हैस ह्या दोन सारख्याच दूध देणाऱ्या चतुष्पाद जनावरांत साम्य व फरक कोणते हें दर्शविलें आहे.

---

## धडा ४४ वा.

### करडूं आणि कोकरूं.

संधि=वेळ. हिंदुस्तानी भाषेंत मोका.

कळप=झुंड, समुदाय.

ध्यान=लक्ष्य.

ह्या धड्यांत करडूं आणि कोकरूं ह्यांच्या अवयवांत सारखेपणा किती आहे आणि विशेष काय आहेत हें सांगितलें आहे.

२१३ ह्या धड्यापासून आपल्याला शिकावयाचें तें हें कीं, दुसरा एकादें काम करितो एवढ्याच करितां आपणही तें काम करूं लागूं नये. कारण तें आपल्याला साधलें नाहीं म्हणजे नुकसान होऊन लोकांत हंसेंही होतें; आणि त्या करण्यांत केव्हां केव्हां आपलें मूळचें असतें तेंही जातें. जें आपल्याला साजेल, साधेल, आणि करणें आवश्यक असेल तेंच आपण करावें. दुसऱ्यानें सरी घातली म्हणून आपण दोरी घालूं नये.

---

## धडा ४५ वा.

### दूध.

कस=सत्त्वांश. स्निग्धता, तुपाचा अंश.

२१४ मुलांनीं दूध पिववेल तितकें प्यावें. दुधाची सवय नसली तर पहिल्यानें ढाळ होतात म्हणून संवय होईपर्यंत थोडें थोडें कितीएक वेळां करून प्यावें.

सड=थान, पण सडणें=गळणें, नासणें, कुजणें; आणि तांदुळ कुटण्यालाही सडणें म्हणतात.

२१५ गवळी दूध आणितो तो सगळे स्वच्छतेचे नियम पाळीत नाहीं, आणि दूध काढिल्याबरोबर आणितो असेंही नाहीं. ह्याशिवाय तें दूध कितीएक गाईचें किंवा म्हशींचें अथवा दोन्हींचें मिश्र असतें, आणि तो त्यांत पाणी घालण्यासही चुकत नाहीं. म्हणून गवळ्यानें आणिलेलें दूध कढवून उकळी फुटेपर्यंत तापविल्याशिवाय पिऊं नये. पितांना त्यांत थोडी साखर घातली तर चांगली. चहा वारंवार पिण्याऐवजीं दूध पिणें किती चांगलें आहे !

२१६ दुधाच्या आंगीं असा एक गुण आहे कीं, त्यांत जें पाणी घालावें त्यासही तें आपल्यासारिखें करितें. इतकें कीं, तें मिळविलेलें पाणी कांहीं केल्या वेगळें करितां येत नाहीं. एका कवीनें ह्या संबंधानें अशी कल्पना केली आहे कीं, दूधपाण्याची मैत्री झाल्यावर पाणीही दुधाचा उपकार विसरत नाहीं. असें मिश्र दूध चुलीवर ठेवेलें म्हणजे पाणी प्रथम जळूं लागतें. दूध आपल्या मित्राची ही दशा

पाहिल्यावर भांड्यांतून उडी मारून तें आपल्या मित्राच्या शत्रूला मारण्यासाठीं त्या ( विस्तवा ) वर हल्ला करितें. त्याला आपण उतू येणें म्हणतों.

२१७ दुधाचें तूप हें अगदीं उत्तम स्वरूप आणि ताक हें खालच्या प्रतीचें स्वरूप आहे; म्हणजे तूप हें सत्त्व आहे आणि ताक कोंडा आहे. तूप खाल्ल्यानें शक्ति येते, पण भूक मंदावते. दुधानें पोट साफ राहून भूक मंदावत नाहीं. शिवाय तुपानें आंगीं जडताही येते; म्हणून दूध पिण्यावरच विशेष भरमार ठेवावा. दुधाच्या सर्व पदार्थांत ताक हें अगदीं हलक्या दर्ज्याचें आहे, तरी तें नुसतें पिण्यास व कढी करून खाण्यास फार चांगलें लागतें. शिवाय संग्रहणी आणि कांहीं इतर रोगांवर त्याचा औषधासारखा उपयोग होतो.

---

पुणे मराठी ग्रंथालय

## धडा ४६ वा.

न. नारायण पेठ, पुणे

### कुत्रा.

" फार दिवस झाले. " कशाला ? राजा असावा असें वाटलें ह्या गोष्टीला.

चालतें व्हावें=निघून जावें.

एकदम=एका क्षणाचा उशीर न लावतां. दम=श्वास. हा फारसी शब्द आहे. मराठींत एक आणि दम हे दोन शब्द जोडून ' एकदम ' शब्द ' अविलंबित ' ह्या अर्थी वापरला जातो. फारसींत त्यांचा संधि त्याप्रमाणें न होतां

ते निरनिराळे पहिला विशेषण आणि दुसरा नाम असेच उपयोगांत येतात.

आधीं=पहिल्यानें.

२१९ ह्याही धड्याचा उद्देश मागील कोकरा-करडाच्या धडयाप्रमाणें कुत्र्याचे अवयव आणि गुणधर्म वर्णन करण्याचा आहे.

२२० कुत्रा बहुधा माणसाच्या आश्रयानें असतो. तो फार संतोषी असतो. मांजरही माणसाच्या आश्रयानें असतें. पण असें म्हणतात कीं, मांजराची इच्छा अशी असते, माणसें गेलीं म्हणजे आपण खाऊं आणि कुत्र्याची अशी असते कीं, माणसें ज्यास्त जमलीं तर आपल्याला ज्यास्त खावयास मिळेल. कुत्रें फार इमानी असतें, तें आपल्या पोशिंद्याला सोडून दुसरीकडे जात नाहीं. अपरिचित माणसाला घरांत येऊं देत नाहीं. तें त्याच्या मालमत्तेचें आणि मुलांबाळांचें संरक्षण करितें. कुत्र्यांनीं, चोर आणि चोरांनीं पुरलेलें द्रव्य दाखवून दिल्याच्या पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. कुत्रा स्वामिभक्त असतो. आपल्या धन्याला राग आलेला किंवा दुःख झालेलें त्यास समजतें. तो मोठा मानी आहे. धन्यानें अधिक्षेप करून जर त्यास खाणें दिलें तर तो खात नाहीं. कुत्र्यांनीं आपल्या धन्याप्रमाणें उपास-तापास केल्याच्या आख्यायिकाही प्रसिद्ध आहेत. कुत्रा कवाईत शिकतो आणि चेंडू आणून देणें, तोंडांत काठी धरणें, किंवा कंदील

घेऊन बरोबर चालणें इ० कामें करितो. त्याची झोंप फार सावध असते. कुत्र्याला आपल्या शेपटाचा फार अभिमान असतो. तो तें नेहमीं वर वांकडें करून चालतो. भीतीचा प्रसंग आला म्हणजे मात्र तो तें खालीं करून घेतो. ' कुत्र्याचें शेपूट सदा वांकडें ' अशी म्हण पडली आहे. कुत्रा आपल्या आळींत किंवा आपल्या सत्तेखालील भूमींत आपल्या जातभाईस येऊं देत नाहीं. आला तर भांडण नेमानें व्हावयाचेंच. मग तो आलेला कुत्रा किती मोठा आणि सशक्त कां असेना ! कुत्र्याची एक खोड असते कीं, एक कुत्रा ओरडूं लागला म्हणजे दुसरा, दुसऱ्याचें ऐकून तिसरा, ह्याप्रमाणें शब्द जाईल तेथपर्यंत सगळेच कुत्रे ओरडत सुटतात. पण पहिला कुत्रा कां ओरडतो आणि आपल्यास ओरडण्यास कांहीं कारण आहे कीं नाहीं, हें तो पहात नाहीं. पिसाळलेल्या कुत्र्याचें डसणें फार वाईट. त्याचे दांत विषारी असतात. पिसाळलेल्या कुत्र्यानें चावलेला मनुष्य फार दिवस जगत नाहीं; आणि मरेपर्यंत वेड्याखुळ्यासारखे तो चार करीत असतो.

कुत्र्यांच्या अनेक जाती आहेत, कांहीं कुत्रे शिकारी असतात. ते श्वापदें धरून आणितात. कांहीं कुत्रे पाणबुडे असतात. ते पाण्यांत पडलेली वस्तु बाहेर काढून आणितात, आणि कांहीं जातीचे कुत्रे गाड्यांनाही लावितात.

२२२ कुत्रें गलिच्छ राहतें. तें आपली ओकारी आपण खातें. तें एकादें हाडूक चघळीत बसतें म्हणून अस्पर्श

मानिलें आहे. कुत्रें घरांत बाळगलें तरी त्यास देवघरांतून सैंपाकघरांतून वावरूं देत नाहींत. युरोपियन लोक कुत्र्याचे बरेच शौकी असतात. जनरल जिरार्ड म्हणून सेंट्रल इंडिया हार्स मध्यें सुमारें १८८० त कमांडिंग असे, त्यानें पांच-पन्नास कुत्र्यांचा एक रिसालाच बाळगलेला होता आणि त्याचें प्रेम त्यांवर पुत्राप्रमाणें असे. त्या साहेबाला शिकारीचा फारच नाद होता. स्वारी नेहमीं खांद्यावर बंदुका आणि सभोंवतीं दहा पांच त्यांचे प्रिय पार्षदगण अशी फिरायची ! असो. आपलेकडे राजा युधिष्ठिराची कथा श्वानवात्सल्याविषयीं प्रसिद्ध आहे. असें सांगतात कीं, धर्मराज स्वर्गाला जाऊं लागले तेव्हां त्यांचा लाडका कुत्राही बरोबर जाऊं लागला. स्वर्गस्थ देवदूत त्या कुत्र्याला जाऊं देतना; तेव्हां धर्मराज म्हणाले कीं, कुत्र्याशिवाय मला स्वर्गवासही आवडावयाचा नाहीं. जर माझ्या कुत्र्याला येऊं दिलें नाहीं तर मला तो स्वर्ग नको !

---

## धडा ४७ वा.

## पांखरें.

२२३ कांहीं प्राणी जलचर, कांहीं स्थलचर आणि कांहीं नभीचर आहेत. जलचर म्हणजे पाण्यांत राहणारे; जसें—मच्छ, मगर, सुसरी इ०. स्थलचर म्हणजे जमिनीवर राहणारे; जसें मनुष्यें आणि जनावरें. नभीचर म्हणजे अधांत्री वायूंत राहणारे; जसें—पक्षी. ह्या प्रत्येक प्राण्याच्या

शरीररचनेंत असा कांहीं विशेष असतो कीं, त्यांना त्या त्या स्थळीं राहतां येतें. जलचरांना आणि पक्ष्यांना जरी पाय असतात तरी त्यांची स्थिति जमिनीवर शक्य नाहीं.

२२४ पक्ष्यांमध्येंही अनेक जाती आणि धर्म आहेत. मित्रभाव आहे, आणि शत्रुभावही आहे. त्यांच्या उडण्याच्या शक्तीचें मान निरनिराळया प्रमाणांत असतें, जनावरांत जसा सिंह तसा पक्ष्यांत अत्यंत बलवान् आणि आकृतीनें मोठा असा गरुडपक्षी आहे. आकृतीनें उंटाएवढेही मोठे पक्षी लोकांनीं पाहिल्याचीं वर्णनें आहेत. रामायणांत महा पराक्रमी संपाति आणि जटायु ह्या पक्ष्यांच्या कथा आहेत. जनावरांचे भंगी जसे डुकर, तसे पक्ष्यांचे गिधाड हे भंगी आहेत. ते सगळी घाण खाऊन साफ करून टाकीत असतात. राजहंसपक्षी सर्वांत सुंदर आणि जातीनें श्रेष्ठ मानिला आहे. म्हणतात कीं, हे पक्षी मानस सरोवरावर राहून प्रवाळ किंवा मोत्येंच खातात. हंसामध्यें दूध आणि पाणी वेगळें करण्याची शक्ति आहे. पाण्याचे मिश्रणांतून तो दूध तेवढें पितो आणि पाणी तसेंच राहूं देतो. नळ-दमयंतीचें लग्न लावून देण्यांत राजहंसानें केवढें काम केलें हें त्याच्या आख्यानांत वर्णिलें आहे. पक्ष्यांत गाणारे आहेत, वाजवणारे आहेत, व नाचणारे आहेत. डांकेचें काम करणारे आहेत, ळढवय्ये आहेत, ध्यानी आहेत आणि आणखीही असे विशिष्ट गुण बाळगणारे आहेत.

पक्ष्यांमध्यें कावळा अस्पृश्य मानिला आहे. त्याचें घ-

राच्या आंतील भागांत येणें किंवा घरावर बसून नेमानें शब्द करणें अशुभ समजलें जातें. पण मृताच्या १० वे दिवशीं त्याला दिलेल्या पिंडास कावळ्यानें शिवण्याचें मोठें माहात्म्य आहे. ब्राह्मण लोक रोज वैश्वदेव केल्यानंतर काकबली देत असतात. कावळ्याच्या एकाच डोळ्यांत बाहुली असते पण ती दुसऱ्या डोळ्यांतही त्यास आणितां येते. सीतेला एका कावळ्यानें त्रास दिला होता म्हणून रामानें रागानें त्याचा एक डोळा नाहींसा केला अशी रामायणांत कथा आहे. कावळा फार दीर्घजीवी आहे. त्याच्या आयुष्याची परमावधि १००० वर्षें आहे असें म्हणतात. घुघूनें शब्द करणें, पाकोळीनें घिरट्या घालणें अशुभ सूचक आहे.

२२६ सर्वपक्षी घरटीं करितात पण त्यांत बया नांवाच्या पक्ष्याचें घरटें फार कुशलतेनें केलेलें असतें.

---

## धडा ४८ वा.

### पोपट आणि कावळा.

२२७ कलिंगडें = ह्यांस टरबूजही म्हणतात. हें खरबुजाच्या जातीचें असतें. कोकणांतील आणि उत्तर हिंदुस्तानांतील गंगायमुनेच्या कांठीं कलिंगडें फार मोठमोठीं होतात.

उपटावा = हिकमतीनें काढून घ्यावा.

लुच्चा = ठग.

२२८ ह्या धड्यांत सुद्धां मागील करडा—कोकराच्या

धड्यांप्रमाणें पोपट आणि कावळा यांत सकृद्दर्शनीं आकारानें साम्य दिसतें तरी किती तफावत आहे हें दाखविण्याकरितां दोघांच्याही अवयवांचें व चालीरीतींचें वर्णन केलें आहे.

---

## धडा ४९ वा.

### रंग.

२२९ ' पाहा तर खरी ' = येथें ' खरी ' म्हटल्यानें हा शब्द ताईचें विशेषण झाला आहे. ' खरें ' असें म्हटलें असतें तर तें पहा ह्या क्रियेचें विशेषण झालें असतें आणि तें अधिक खुलतें.

पिंजर = हळकुंड लिंबाच्या रसांत भिजवून कुटतात त्या चूर्णास पिंजर, कुंकू म्हणतात.

शाडू = चुनखडी.

२३० कांहीं रंगांचे खडे आयतेच जमिनींत सांपडतात. जसें, चुनखडी, गेरू, शेंदूर, मनशीळ, हिंगूळ इ०. आणि कांहीं रंग झाडांच्या मुळया पानें, किंवा फुलें यांपासून करितात. आतां विलायती रंगांचे आयते डबे बाजारांत मिळूं लागल्यापासून लोक फुलांपानांपासून रंग काढण्याची कटकट करीनासे झाले आहेत.

२३१ प्राणिमात्रांचीं शरीरें रंगीत कातडीनें आच्छादित असतात. तथापि उद्भिज्ज आणि पशु-सृष्टीमध्यें जितकें रंगाचें वैचित्र्य आणि सौंदर्य असतें तितकें मनुष्यसृष्टींत

दिसून येत नाहीं. माणसांच्या कातडीला एकच रंग असतो. त्यांत जर दुसऱ्या रंगाची कोठें भेसळ किंवा ठिपके असले तर तें विरूप समजलें जातें. आफ्रिकेंत सगळींच माणसें काळीं, चिनांत पिंगट रंगाचीं, आणि युरोपांत तांबड्या रंगाचीं असतात. हिंदुस्तानांत काश्मीर आणि गुजराथ यांतील लोक प्रायः गोरे आणि मद्रासी सर्व काळे असतात. मूळच्या आंगाच्या रंगाला आणखी शोभविण्यासाठीं मागें एका काळीं लोक वरून रंग लावीत असत. आतां कांहीं रानटी जाती मात्र तसें करितात. सुधारलेल्या लोकांतही अझून कांहीं चाली अवशिष्ट दिसतात. जसें—गंध किंवा मृगमद—लेपन, मेंहदी लावणें, अंजन करणें, गोंदवणें इ०. हिंदु लोकांत तर बहुधा बायको गोंदवल्याशिवाय क्वचित् राहते. युरोपांतही हें गोंदवण्याचें वेड अजून बरेंच आहे. तेथें पुरुषही पशुपक्ष्यांचीं चित्रें हातांवर वगैरे गोंदवितात आणि गोंदणारांचा एक धंदाच आहे. तथापि सामान्यतः आतां रंगीत कापडांनीं शरीर शोभविण्याकडे लोकांचा विशेष कल आहे.

२३२ मूळचे रंग थोडे आहेत तरी ते हलके भारी प्रमाणांत उपयोगिल्यानें आणि एकमेकांत मिसळल्यानें त्यांचे शेकडों प्रकार झाले आहेत. नुसता गुलाबी रंग ४०।४५ प्रकारचा होतो.

२३३ रंगाची पूड बाजारांत आयती मिळूं लागल्यानें रंगाचें काम सोपें झालें आहे तरी त्यांतही पुष्कळ कसब

आहे. रंग पक्का करणें, त्यांत चकाकी आणणें, रेशीम, लोंकर, व निरनिराळ्या प्रकारचीं सुतें यांना निरनिराळे रंग देणें, एकाच कापडांत अनेक रंगाच्या छटा उठवणें ह्या विद्याच आहेत. मातीवर रंग चढवणें, कागदावर रंग भरणें, लांकडावर किंवा धातूवर निरनिराळे रंग बसवणें ह्यासुद्धां निरनिराळ्या विद्या आहेत; आणि ह्या विद्या दिवसेंदिवस आपले येथून लोपत चालल्या आहेत.

२३४ बायकांना सौंदर्यास्तव आणि धर्म म्हणूनही रंगीत वस्त्र परिधान करणें विहित केलें आहे. विधवा स्त्रियांनीं मात्र पांढरें वस्त्र किंवा तांबडेंच वापरावें असा नियम आहे. हिंदुस्तानांत अगदीं गरिबापासून तों श्रीमंतांपर्यंत हा नियम पाळितात.

२३५ रंगाच्या अंगीं सौंदर्याला मदत करण्याशिवाय संरक्षणाचेही कांहीं धर्म आहेत. छत्री काळ्या रंगाची करितात. ती ह्यासाठीं कीं, त्या रंगांत उष्णता धरून ठेवण्याचा गुण आहे. आपण निळ्या रंगाची कांच डोळ्याला लावतों ती उन्हापासून दृष्टीचें संरक्षण व्हावें या साठींच. पांढरा रंग प्रकाशाला मदत करितो.

२३६ रंग शुभ अशुभ दाखविण्याचेंही एक चिन्ह आहे. रेलवेवरून रात्रीच्या वेळीं लाल-हिरवा-पांढरा या रंगांच्या कंदिलांनीं आणि दिवसा त्याच रंगाच्या कापडाच्या निशाणांनीं खुणा करितात त्या तुम्हीं पाहिल्या असतील. त्यांत लाल रंग जोखीम किंवा भयदर्शक आहे. ब्राह्मणांनीं

स्नानसंध्येचे वेळीं काळ्या रंगाचे दोरे घातलेलें देखील वस्त्र नेसूं नये किंवा जवळ बाळगूं नये असा नियम आहे. इंग्रज लोकांत अशुभ किंवा सुतक--दर्शनाकरितां काळें फडकें डाव्या हातास बांधण्याची चाल आहे. कोणाचा मृत्युलेख लिहावयाचा तर त्याच्या सभोंवतीं काळ्या रेघा मारतात; आणि ज्याचा नातलग मेलेला असतो तो तर वर्ष-सहा महिने सगळा पत्रव्यवहार कृष्ण-रेखांकित कागदांनीं करीत असतो.

---

## धडा ५० वा.

### पाळणा.

२३७ चालत्या किंवा घडीच्या पाळण्याला घोड-पाळणा आणि ज्या आडव्या दांडयाला हा पाळणा अडकवितात त्याला घोडा म्हणतात.

२३८ पाळणा रिकामा हालवूं नये, नाहींतर तान्ह्याच्या पोटांत दुखतें. तसेंच त्याला पाठ लावूं नये, नाहींतर पुढें पाळणा रिकामाच पडतो अशी बायकांची समज आहे. तान्हें निजलें असेल तेव्हां फार मोठाले झोंके त्यास देऊं नयेत. मोठ्या मुलांनीं पाळण्यांत बसून किंवा त्यावरून उड्या मारून त्यास सैल करून टाकूं नये. तान्हें वारंवार मुततें म्हणून त्यास संभाळणाऱ्यानें त्याचें बाळंतें वरचेवर पहात जावें, आणि त्याच्या आंगाला डांस चिलटें ढेकूण डसतात कीं काय तें पहावें.

त्यास उचलायचें तें मानेखालीं हात देऊन उचलावें. त्याच्या तोंडांत दाणादुणा, किंवा गोड-तिखट असें कांहीं देऊं नये. अगदीं तान्ह्या मुलाला देखील गाणें आवडतें तरी प्रथम त्याच्या निजण्याची सोय करून मग हळू हळू झोंके देत गाणीं म्हणावीं. पाळणा कापडी फुलें आणि पांखरें यांनीं सजवावा. पण आणखी अडगळ किंवा टोपडीं-आंगडीं पाळण्यावर टाकून ठेऊं नयेत.

[illegible]नालय
२७ न नारायण
क्र. नं. २८७६५

[illegible]राठी ग्रंथालय
[illegible] क्र. ११०१